वामनदादा कर्डक
साहित्य संमेलनात
अर्जुन डांगळे यांनी
केलेले भाषण

सा. रे. पाटील
समाजभूषण पुरस्कार
स्वीकारताना अशोक बंग
यांनी केलेले भाषण

मिलिंद बोकील यांच्या
साठीनिमित्त मकरंद दीक्षित
या तरुणाचा लेख

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
साधना

Date of issue
शनिवार,
७ मे २०२२
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४४)

# हिंदुत्ववादाचे तीन प्रवाह

## हमीद दलवाई

मुस्लिम समाज इथे अस्तित्वात नसता तर हिंदुत्ववाद्यांनी धर्मनिरपेक्षतेविषयी कोणती भूमिका घेतली असती? पाकिस्तानात हिंदू फारसे अस्तित्वात नाहीत, इतर प्रबळ अल्पसंख्याकही अस्तित्वात नाहीत आणि तरीही तिथे इस्लामी राज्य स्थापन करण्याची आकांक्षा बाळगणारे सामर्थ्यवान मुस्लिम पक्ष अस्तित्वात आहेत. त्याचप्रमाणे भारतात मुस्लिम समाज अस्तित्वात नसता तरी धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्था हे या देशाचे ध्येय राहिले असते आणि या ध्येयाला विरोध करणारे हिंदुत्ववादी अस्तित्वात असतेच.

हिंदुत्ववादी म्हणवणारी ही मंडळी पुन्हा वेगवेगळ्या विचारसरणींत विभागली गेली आहेत. वैदिक काळाला आदर्श मानणारे आर्यसमाजी, चातुर्वर्ण्याच्या चौकटीवर श्रद्धा ठेवणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदू राष्ट्रवादाच्या प्रेरणा लाभलेले हिंदू महासभावादी अशा तीन वर्गांत स्थूलमानाने हिंदुत्ववादी विभागले गेलेले आहेत. हिंदू राज्याची घोषणा करणारा रामराज्य पक्ष आता संपुष्टात आल्यामुळे त्याचा वेगळा विचार करण्याचे कारण नाही.



हिंदुत्ववाद्यांतील हे तीन प्रवाह तीन व्यक्तींनी घातलेल्या भिन्न वैचारिक पायांवर आधारलेले आहेत. स्वामी दयानंद हे आर्य समाजाचे प्रणेते होते आणि के. ब. हेडगेवार व मा. स. गोळवलकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वैचारिक पाया दृढ केला आहे. हिंदू राष्ट्रवादाच्या, हिंदू महासभेच्या घोषणेचे जनक वि. दा. सावरकर होते. हिंदुत्ववाद्यांच्या ज्या चळवळी होत्या किंवा अस्तित्वात आहेत, त्या प्रामुख्याने या तीन व्यक्तींच्या सिद्धांतांवर आधारलेल्या आहेत.


नव्या युगातील करिअर्सचे एकमेव प्रवेशद्वार!
MKCL
www.mkcl.org
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
• २० वर्षांची समृद्ध शैक्षणिक परंपरा
• १ कोटी ४० लाखांहून अधिक उत्तीर्ण विद्यार्थी
• शासकीय सेवेत प्रवेशासाठी MS-CIT अनिवार्य
• अभ्यासक्रम कालावधी: १४४ तास
• घरी स्मार्टफोनवर थिअरी शिका आणि केंद्रात संगणकावर प्रात्यक्षिके व सराव करा
• केंद्रातील संगणकावर एमएस ऑफिस आणि इतर टूल्सवर प्रात्यक्षिके व सराव
• इ लर्निंग आणि पुस्तकाचे माध्यम: मराठी/इंग्रजी/हिंदी
• महाराष्ट्रातील ४५०० + अधिकृत अध्ययन केंद्रांमध्ये अभ्यासक्रम उपलब्ध
• MS-CIT कोर्स शिकण्याचे पर्याय:
• केंद्रात/घरी; कंप्यूटर / स्मार्टफोनवर
• ५० गुण सातत्यपूर्ण अंतर्गत मूल्यमापनासाठी आणि ५० गुण अंतिम ऑनलाईन परीक्षेसाठी
• MSBTE आणि MKCL यांचे संयुक्त प्रमाणपत्र
करिअर व जॉब ओरिएंटेड क्लिक कोर्सेस!
Job Readiness
Accounting
Digital Arts
Designing
Programming
Management
Hardware & Networking
New Collar Jobs
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
klic.mkcl.org
नये जमाने कि डिग्री!
ठळक वैशिष्ट्ये व मिळणारे फायदे:
• 'कंपनीत प्रत्यक्ष काम, कामातून ज्ञान व ज्ञानातून अधिक फलदायी काम' या तत्त्वावर आधारित शिक्षणक्रम.
• इंग्रजी माध्यमातील पदवी अभ्यासक्रम
• ३ वर्षे किंवा ६ सेमिस्टर्स स्वयं-अभ्यास + कंपनीत काम
• ३ वर्षांच्या शिष्यवृत्तीद्वारे कंपनीतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव
• प्रत्येक सेमिस्टरमध्ये ४ ई लर्निंग विषयांच्या अभ्यासक्रमांद्वारे सैद्धांतिक ज्ञान
• कामातून ज्ञानप्राप्ती व ज्ञानप्राप्तीतून फलदायी काम
• ३ वर्षांच्या शिष्यवृत्तीकाळात मासिक स्टायपेंड
• कंपनीतर्फे ३ वर्षांच्या कार्यानुभवाचे प्रमाणपत्र
• BBA (SM) - इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र
• B.Sc (CSA) - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र
BBA@ Workplace
Work-based Degree by IGNOU & MKCL
ignou.mkcl.org
BSc@ Workplace
Work-based Degree by YCMOU & MKCL
ybsc.mkcl.org

# अनुक्रम

Follow us :
weeklysadhana.in
facebook.com/weeklysadhana/
twitter.com/WeeklySadhana
YouTube/WeeklySadhana

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
७ मे २०२२
वर्ष ७४ / अंक - ३८

संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**

व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**

मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिकमालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तकविक्री केंद्र)**
Ph.No. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एकवर्षांसाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते **क्र.60025586634, IFSC MAHB 0000001, बँकऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

४ **मुखवटा राज ठाकरेंचा, चेहरा भाजपचा!**
... संपादकीय

७ **हिंदुत्ववाद्यांचे तीन प्रवाह**
... हमीद दलवाई

१३ **महाकवी वामनदादा कर्डक साहित्य संमेलनातील भाषण**
... अर्जुन डांगळे

१९ **शेतकी क्षेत्र : वेध (अव)दशेचा, शोध दिशेचा**
... अशोक बंग

२५ **आपणांबाहेरी । न लगे ठाव धुंडावा**
... मकरंद ग दीक्षित

३१ **'कोबॉल्ड', 'नोम्स' आणि 'यक्ष'!**
... स्वाती राजे

३५ **वाहनांचे बनावट सुटे भाग : प्रवाशांना धोका (भाग १)**
... आनंद करंदीकर

३९ **नकोसा स्पर्श नकोच : आपलीशी वाटणारी पुस्तिका**
... नीलिमा जाधव-बंडेलु

संपादकीय

# मुखवटा राज ठाकरेंचा, चेहरा भाजपचा!

मार्च महिन्यात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल लागले. त्यातील पंजाब वगळता अन्य चारही राज्यांत भाजपला सत्ता मिळवता आली. त्यापैकी गोवा, उत्तराखंड व मणिपूर ही तीन राज्ये लहान आहेत. पण उत्तर प्रदेश हे राज्य देशातील सर्वांत मोठे असून, लोकसभेचे सर्वाधिक मतदारसंघ तिथे असल्याने केंद्रीय सत्ता मिळविण्यासाठी ते सर्वांत महत्त्वाचे राज्य मानले जाते. त्या राज्यात पूर्ण बहुमत आणि सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळाल्याने भाजपला आकाश ठेंगणे वाटू लागले आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी त्या राज्यात भाजपनेत्यांनी साम-दाम-दंड-भेद या कूटनीतीचा अवलंब तर केला होताच, पण धार्मिक विद्वेषाच्या वातावरणाला खतपाणी घातले होते. आता पुढच्या विधानसभा निवडणुका अन्य काही राज्यांत होणार आहेत, त्याला साधारणत: वर्षभराचा अवकाश आहे. त्यात गुजरात हे प्रमुख राज्य आहे आणि पंतप्रधान व गृहमंत्री यांची प्रतिष्ठा तिथे पणाला लागणार आहे. कारण सलग वीस वर्षे भाजपची सत्ता त्या राज्यात राहिली आहे, मागील विधानसभा निवडणुकीत तिथे भाजपची दमछाक काँग्रेसने केली होती. त्यामुळे यावेळी त्या राज्याबाबत अधिक सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता भाजपला, विशेषत: पंतप्रधान व गृहमंत्री यांना वाटणे साहजिक आहे. शिवाय त्या निवडणुकांनंतर वर्षभराने म्हणजे २०२४ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुका होणार आहेत.

अशा पार्श्वभूमीवर भाजपला पुढील रणनीती आखायची आहे. आणि त्याच प्रक्रियेचा भाग म्हणून अन्य राज्यांत व देशातही धार्मिक ध्रुवीकरणाला चालना देण्यासाठी भाजप प्रयत्न करतो आहे. भाजपनेते व सरकारमधील मंत्री व पंतप्रधान वा मुख्यमंत्री हे काम कधी उघडपणे तर कधी शिताफीने करीत आले आहेत. पण एका मर्यादेपलीकडे त्यांना ते करता येत नाही. कारण त्यामुळे ते शस्त्र बुमरँग होण्याची शक्यता असते. म्हणून अन्य घटकांना हाताशी धरून समाजमन कलुषित करणे व अन्य राजकीय पक्षांना अस्वस्थ करून सोडणे, ही रणनीती राबवावी लागते. आणि ही रणनीती राबवताना प्रत्येक राज्यात वेगवेगळे घटक हाताशी धरून वेगवेगळ्या मुद्द्यांवर ध्रुवीकरण करायचे असते. त्यामुळे केंद्र सरकारचे विविध आघाड्यांवरील अपयश तर झाकले जातेच; पण भाजपविरोधी पक्षांना वा भाजपची सत्ता नसलेल्या राज्यांना अस्थिर करता येते. अर्थातच, यात व्यापक रणनीतीचाही भाग आहेच, तो म्हणजे मूळचा हिंदुत्ववादी अजेंडा पुढे रेटण्याचा. त्याचीच परिणती म्हणून पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका ऐन रंगात आलेल्या असताना कर्नाटक राज्यात हिजाबच्या मुद्द्यावरून वाद पेटवण्यात आला, चिघळवण्यात आला. आणि आता त्याच प्रक्रियेचे पुढचे पाऊल म्हणून महाराष्ट्रात मशिदीवरील भोंगे उतरवणे हा मुद्दा वादाचा बनवून, चांगलाच पेटवण्यात आला आहे. त्यासाठीचा मुखवटा जरी राज ठाकरेंचा असला तरी त्यामागचा चेहरा भाजपचा आहे, हे आता लपून राहिलेले नाही.

राज ठाकरे शिवसेनेतून बाहेर पडले त्याला आता सोळा वर्षे झाली आहेत. अगदी बालपणापासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या अंगाखांद्यावर खेळलेल्या राज यांच्याकडे बाळासाहेबांची हुबेहूब नक्कल म्हणूनच सुरुवातीपासून पाहिले गेले. दिसण्यापासून वागण्या-बोलण्यापर्यंत आणि व्यंगचित्रे

काढण्यापासून विचार मांडण्यापर्यंत. पण अस्सल ही अस्सल असते आणि नक्कल ती शेवटी नक्कलच, हे राज यांच्याबाबत पुन्हा पुन्हा अधोरेखित झाले आहे. आज जरी शिवसेना हा पक्ष सौम्य भासत असला तरी शिवसेनेचा वारसा आणि राज ठाकरे यांचा वारसा एकच आहे आणि तो स्पृहणीय नाही, याचे भान हरपून चालणार नाही. राज यांनी २००६ मध्ये शिवसेना सोडली तेव्हा जाहीर केले होते की, बाळासाहेब हाच माझा आदर्श आहे आणि राहणार! खरेच होते ते, त्यापेक्षा वेगळे राजकारण त्यांना करताच येणार नव्हते. सेनेतून बाहेर पडल्यावर त्यांच्या कार्यकर्त्यांनी काही ठिकाणी केलेली तोडफोड तेच सांगत होती. मात्र त्या काळातही उदारमतवादी व पुरोगामी समजले जाणारे काही लोक राज यांच्याकडे मोठ्या आशेने बघत होते. त्यांनी ‘महाराष्ट्र नवनिर्माण सेना’ हे आपल्या पक्षाचे नाव धारण केले, ‘उद्याच्या महाराष्ट्राची ब्ल्यू प्रिंट तयार करणार’ अशी भूलथाप मारली आणि ‘मला महाराष्ट्रातील शेतकरी जीनची पँट घालून ट्रॅक्टर चालवताना पहायचाय’ असे गुलाबी स्वप्न दाखवले होते. त्यांच्या त्या वेळच्या भाषणांना भुलणाऱ्या वर्गाला उद्देशून तेव्हा आम्ही (युवा संपादक या नात्याने) याच संपादकीय स्तंभातून ‘राज ठाकरे यांच्याविषयी सहानुभूती हा भाबडेपणाच ठरेल!’ या शीर्षकाखाली विवेचन केले होते, तेव्हा साधनाच्या अनेक पुरोगामी हितचिंतकांना ‘ही अतिरिक्त शंका’ वाटत होती.

प्रत्यक्षात काय घडत आले? पुढील तीन वर्षांत मनसेच्या शाखा गावोगाव निघाल्या, बाळासाहेबांनी उद्धवच्या पारड्यात वजन टाकल्याची सहानुभूती राज यांच्या वाट्याला आली. त्याचा परिणाम २००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दिसला. काँग्रेस-राष्ट्रवादी आणि शिवसेना-भाजप या दोन आघाड्यांच्यामध्ये असलेला थोडासा अवकाश राज यांच्या पक्षाने काबीज केला, तेव्हा मनसेला १३ जागा मिळाल्या. पदार्पणातच एवढे यश म्हटल्यावर राज यांचा स्वत:च्या ताकदीवरचा भ्रम बळावला. त्यांच्या आमदारांनी विधानसभेत पदार्पण करताना पहिल्याच दिवशी अबू आझमी या समाजवादी पक्षाच्या आमदाराला मारहाण केली. कशावरून, तर त्यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ ही मराठीऐवजी हिंदीतून घेतली म्हणून! तेव्हा मनसेच्या चार आमदारांना निलंबीत केले गेले होते. महाराष्ट्राचे नवनिर्माण करायला निघालेल्या पक्षाने विधानसभेतील सुरुवात अशी केली होती. तेव्हा त्यांना हे कळले नाही, पण त्यांच्या सहानुभूतीला घरघर लागण्याचा तो प्रारंभबिंदू होता. त्या पाच वर्षांत त्या १३ आमदारांनी नेमकी किती पावले टाकली हे काही पुढे कळले नाही. परिणामी २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेला एक जागा मिळाली आणि त्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत एकही जागा मिळाली नाही. २०१९ च्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीतही मनसेची हीच स्थिती कायम राहिली. असाच प्रकार महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत झाला. २०१२ च्या महापालिका निवडणुकीत बृहन्मुंबई, नाशिक, पुणे, कल्याण-डोंबिवली इत्यादी पाच-सात महापालिकांमध्ये २० ते ३० या दरम्यान जागा मिळालेल्या मनसेला २०१७ च्या महापालिका निवडणुकांमध्ये त्या सर्व ठिकाणी ५ पेक्षा कमी किंवा त्यादरम्यान जागा मिळाल्या. आणि नवे काही करता आले नाही ते वेगळेच! हे खरे आहे की, राज्यात चार मोठ्या बलाढ्य पक्षांच्या स्पर्धेतून मनसेला फार यश मिळणे अवघड होते, पण पदार्पणातील यश टिकवता आले नाही ही नामुष्कीची बाब आहे. नेत्याचे व पक्षाचे आणि त्यांच्या तथाकथित भूमिकांचे हे अपयश आहे. खरे तर ‘भूमिका’ हा शब्द राज यांना व त्यांच्या पक्षाला वापरणे म्हणजे अतिशयोक्ती करण्यासारखी आहे, इतके हास्यास्पद वर्तन त्यांचे राहिले आहे. दोन मोठी उदाहरणे तर इतिहासात नोंदविता येतील अशी- २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मनसेने काही उमेदवार राज्यात उभे केले आणि राज ठाकरे प्रचारात सांगत सुटले, ‘आमचा निवडून आलेला उमेदवार नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान होण्यासाठी पाठिंबा देणार!’ अशा प्रकारची भूमिका प्राचीन काळातील एखाद्या लहरी राजानेच घेतली असेल. कारण कोणीही सामान्य मतदार ते ऐकून असाच विचार करणार की, ‘मग मी नरेंद्र मोदींनी उभे केलेल्या उमेदवारांनाच मत देतो की! त्यांचा उमेदवार असताना तुमच्याकडे कशाला येऊ, मोदींच्या उमेदवाराची मते कमी करायला?’ त्यानंतरच्या म्हणजे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत तर मनसेने दुसऱ्या टोकाची लहर दाखवली. ‘लाव रे तो व्हिडिओ’ ही कँपेन आणि त्यावेळची राज यांची भाषणे एकाच मुद्याभोवती फिरत होती, तो म्हणजे ‘मोदी व शहा या जोडीला पराभूत करा, म्हणजे भाजप सोडून अन्य कोणालाही मते द्या’. राज यांच्या त्या भाषणांमुळे व प्रचार पद्धतीमुळे तेव्हा समस्त भाजप विरोधकांना आणि त्यातही पुरोगामी उदारमतवादी वर्तुळाला राज यांच्याविषयी प्रेमाचे भरते आले होते. त्यातही गंमत अशी की, मनसेचा एकही उमेदवार उभा न करता राज यांचा हा सनसनाटी प्रचारदौरा चालू होता. त्यामुळे काहींना राज यांच्यात परोपकारी महापुरुषाने शिरकाव केल्याचा साक्षात्कार अनेक लहान-थोरांना झाला होता. तेव्हा काहींना असे वाटले होते की, त्यानंतर लगेच येणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा

निवडणुकीसाठीची ही धूर्त खेळी आहे. म्हणजे परोपकारी राजकीय नेता अशी प्रतिमा झाल्यावर महाराष्ट्र विधानसभेत मोठा वाटा राज यांना मिळेल. पण त्या विधानसभेत २८८ पैकी एक जागा मनसेला मिळाली. त्यानंतर राज यांना केंद्र सरकारच्या सक्तवसुली संचालनालयाने (इडी) जी नोटीस धाडली, त्यामुळे ते कोषात गेले. आणि आता त्या कोषातून बाहेर पडण्यासाठी भाजपनेच त्यांना पुढे केले आहे किंवा पाठबळ दिले आहे.

हा सारा प्रवास काय सूचित करतो आहे, काय निष्कर्षाप्रत घेऊन जातो आहे? राज यांना, त्यांच्या सल्लागारांना व पक्षातील नेत्यांना भूमिकाच निश्चित करता येत नाही, म्हणजे ते गोंधळातून बाहेर पडू शकलेले नाहीत. किंवा प्रत्येक निवडणुकीत ते अन्य पक्षांशी तडजोडी करून काही देवाण-घेवाण करीत आहेत. ती देवाण-घेवाण कशा प्रकारची आहे हे त्यांचे त्यांना माहीत. म्हणजे कोणत्या तरी पक्षाशी आतून संगनमत असल्याशिवाय राज व मनसे यांना वाटचाल करता आलेली नाही, हे आता उघड सत्य आहे. आधी सेना-भाजप विरोधात लढण्यासाठी काँग्रेस व राष्ट्रवादीचा छुपा व मूक पाठिंबा, नंतर अन्य पक्षांच्या विरोधात भाजपचा छुपा पाठिंबा, त्यानंतर भाजपच्या विरोधात काँग्रेस-राष्ट्रवादी यांचा छुपा पाठिंबा आणि आता महाविकास आघाडीच्या विरोधात लढण्यासाठी भाजपचा जवळजवळ उघड पाठिंबा अशी वाटचाल मागील १६ वर्षे मनसेची राहिली आहे. असे दुर्भाग्य वाट्याला येणे ही कोणत्याही जबाबदार व स्वाभिमानी राजकीय नेत्यासाठी लाजीरवाणी बाब आहे. मात्र त्यांचा आवेश नेमका उलटा आहे. पण जनता इतकीही दुधखुळी नसते, तिने तरी अधिक काळ व पुन्हा पुन्हा फसगत का करून घ्यावी? वस्तुत आता राज यांची व त्यांच्या पक्षसंघटनेची अवस्था निष्प्रभ व निस्तेज म्हणता येईल अशी आहे. विधानसभेत अस्तित्व नाही, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तुरळक काही ठिकाणी आहे, पक्षाच्या शाखा ओसाड आहेत, कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य नाही, अधूनमधून काही भावनिक मुद्दे उकरून काढून व राज यांची सभा आयोजित करून गर्दी जमवून काहीशी धुगधुगी निर्माण केली जाते, पण काही काळानंतर ती पूर्ववत होते. महाराष्ट्राची ब्ल्यू प्रिंट करायला निघालेल्या पक्षाला स्वत:ची वेबसाईटसुद्धा नीट उभारता आलेली नाही, जी काही अर्धवट आहे तिच्यावर विविध स्वयंसेवी संस्थांच्या अहवालातील वा पत्रकांमधील मुद्दे उचलून मागण्यांची जंत्री सादर केलेली आहे. त्या जंत्रीला काही एक सूत्र आहे असे कुठेही दिसत नाही, आणि वाक्यरचना व प्रुफ तपासणी हे प्राथमिक कामही नीट केलेले नाही. त्यामुळे मनसेची दखल घेत राहावे असे काही नाही, मात्र त्यांचे उपद्रवमूल्य आहे. 'उपयुक्ततामूल्य नसेना, उपद्रवमूल्य हीच आमची ताकद' असे त्यांना अभिमानाने मिरवायचे असेल, आणि त्यावर मिळणाऱ्या टाळ्यांवर खूष व्हायचे असेल तर ते त्यांचे समाधान मात्र कोणालाही हिरावून घेता येणार नाही. असो!

तर राज ठाकरे यांनी मशिदीवरील भोंगे उतरवणे हा मुद्दा मागील महिनाभर लावून धरला आहे. त्यामुळे राज्यातील शहरी भागांत काळजी, भीती, चिंता, तणावसदृश्य परिस्थिती जाणवत आहे. नवनीत राणा व रवी राणा या खासदार-आमदार पती-पत्नीने त्यांच्यात सूर मिसळला आहे. उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारने दहा हजार मशिदीवरील भोंगे उतरवणे किंवा आवाज कमी करणे अशी कारवाई केल्याची खरी/खोटी बातमी आली आहे. या सर्वांमागे भाजपचे नेतृत्व ठामपणे उभे आहे, हे लपवण्याचे कष्ट त्यांनी घेतलेले नाही. नारायण राणे पिता-पुत्र मागील काही महिने निरर्थक उद्योग करीतच आहेत. गुणरत्न सदावर्ते या बाणेदार व धडाकेबाज वकिलानेही आता तुरुंगातून सुटल्याबरोबर 'जय श्रीराम' ही घोषणा आत्मसात केल्याची बातमी आली आहे. एकूण या सर्व प्रक्रियेत भाजपला गमवायचे काही नाही. असे लहान-मोठे उद्रेक होत राहतील. मुळातच अनैसर्गिक असलेली राज्यातील महाविकास आघाडी कसाबसा गाडा चालवत आली आहे. स्वत:पलीकडे विचार त्यांना करता येत नाही. स्वत:ला बुडण्यापासून वाचवणे आणि उपलब्ध वेळेत शक्य तेवढे पदारात पाडून घेणे यासाठी ते परस्परांचे हात धरून आहेत. या गदारोळात कायदा व सुव्यवस्था बिघडली असे कारण दाखवून राज्य सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लावता येईल का, याचा अंदाज केंद्र सरकार घेत आहे. 'आधी देशाचे हित, मग पक्षाचे हित' असे म्हणणारा भाजप आपल्या पक्षासाठी देशाची दीर्घकाळ जुळत आलेली लोकशाही संरचना मोडीत काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. कोणत्या प्रकारच्या राष्ट्रवादात हे बसते, त्यांचे त्यांनाच माहीत. पण राष्ट्रवाद ही जर सकारात्मक संज्ञा असेल तर तिच्यात भाजपचा राष्ट्रवाद बसत नाही, हे निश्चित! त्यामुळे स्यूडो सेक्युलॅरिझम ही संज्ञा भाजपने काँग्रेसला लावली, त्याचप्रमाणे स्यूडो नॅशनॅलिझम ही संज्ञा भाजपला लावता येईल.

या सर्व प्रक्रियेत देशाचे नुकसान होणार आहे हे खरे, पण हा देश पूर्णत: भाजपच्या आहारी जाईल हे कदापि शक्य नाही. आता सुजाण हिंदू समाजाने काय करावे हा प्रश्न आहे, पण मुस्लिम समाजाने काय करावे हा अधिक गहन प्रश्न आहे. त्याचे उत्तर, त्यांनी प्रतिगामीत्वाच्या बाबतीत हिंदू समाजाशी स्पर्धा करू नये इतकेच देता येईल!

चिकित्सा

हमीद दलवाई

# हिंदुत्ववाद्यांचे तीन प्रवाह

मुस्लिम जातीयवादाच्या उग्र स्वरूपाला दंड थोपटून आव्हान देण्याचा प्रयत्न करणारा एक हिंदू वर्ग अस्तित्वात आला आहे. हा वर्ग स्वत:ला हिंदुत्ववादी या नावाने ओळखतो. मुस्लिम समाजाचे सर्वंकष आक्रमण हिंदू समाजावर होत आहे, ते परतवून लावणे, शक्यतो मुस्लिम समाजाचा पाडाव करणे, मुस्लिम आक्रमणाने मलिन झालेली सिंधूपर्यंतची ही भूमी पुन्हा भारतमातेला जोडणे हे आपले परम कर्तव्य आहे– अशी श्रद्धा हिंदुत्ववादी मंडळी बाळगून असतात.

मुस्लिम समाजाच्या संकुचित धर्मवादाला आणि जातीयवादाला विरोध करणे हे काही पाप नाही. पण या विरोधाचे स्वरूप कोणते असावे, हा प्रश्न आहे. धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेच्या चौकटीत मुस्लिम समाजाच्या धर्मनिरपेक्षताविरोधी वर्तनाला विरोध करीत राहणे हा एक मार्ग ठरतो. तसे केले तर आपण आपोआपच धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेची चौकट बळकट करण्याच्या प्रक्रियेला हातभार लावतो. तेव्हा आपण धर्मनिरपेक्ष असतो, समाजव्यवस्थेचे आपले निकषच धर्मनिरपेक्षतेचे असतात. पण हिंदुत्ववाद्यांचा मुस्लिम धर्मवादाला आणि जातीयवादाला होणारा विरोध या मार्गात बसत नाही. कारण एक तर धर्मनिरपेक्षतेची चौकट त्यांना मान्य नाही. धर्मनिरपेक्षता याचा मुस्लिम अनुनय असा सोइस्कर अर्थ त्यांनी लावून घेतला आहे. आपली एक वेगळी विचारसरणी आहे आणि धर्मनिरपेक्षतेची विचारसरणी ही आपल्या हिंदुत्ववादी विचारसरणीच्या मुळाशी येत आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. थोडक्यात, मुस्लिम जातीयवादाच्या संरक्षणाचा पहिला तट धर्मनिरपेक्षतेची राजवट हा आहे आणि तो जमीनदोस्त केल्याखेरीज मुस्लिमांशी सरळ दोन हात करता येणार नाहीत, असेच ते मानीत आले आहेत.

मुस्लिम समाज इथे अस्तित्वात नसता तर हिंदुत्ववाद्यांनी धर्मनिरपेक्षतेविषयी कोणती भूमिका घेतली असती? पाकिस्तानात हिंदू फारसे अस्तित्वात नाहीत, इतर प्रबळ अल्पसंख्याकही अस्तित्वात नाहीत आणि तरीही तिथे इस्लामी राज्य स्थापन करण्याची आकांक्षा बाळगणारे सामर्थ्यवान मुस्लिम पक्ष अस्तित्वात आहेत. त्याचप्रमाणे भारतात मुस्लिम समाज अस्तित्वात नसता तरी धर्मनिरपेक्ष

> वस्तुस्थिती अशी आहे की, सावरकरांची विज्ञाननिष्ठा ही हिटलरच्या जातीची होती. जीनांची तथाकथित आधुनिकतादेखील याच जातीची होती. दुसऱ्यावर मात करणे, दुसऱ्यांना आपल्या धाकाखाली नमविणे याकरिता त्यांना शास्त्रांचा आणि ज्ञानाचा उपयोग करून घ्यायचा होता. कोणी तरी प्रबळ असणारच असेल आणि सबळ दुर्बलांवर मात करतात असे असेल; तर आपण सबळ का होऊ नये, असे सावरकरांनी कित्येकदा म्हटले आहे. मोठा मासा छोट्या माशाला गिळतो, हे उदाहरण त्यांनी कित्येक वेळा दिलेले आहे. मोठा मासा छोट्या माशाला गिळतो हे खरे, परंतु माणूस म्हणजे मासा नव्हे. माशांचे नियम माणसाला लावता येत नाहीत, हे सावरकरांना कळलेले नाही. जगात समतेचा–न्यायाचा जो प्रवाह आहे, त्याविरुद्धच हे सावरकरांचे तत्त्वज्ञान होते.

समाजव्यवस्था हे या देशाचे ध्येय राहिले असते आणि या ध्येयाला विरोध करणारे हिंदुत्ववादी अस्तित्वात असतेच.

हा मुद्दा थोडा अधिक स्पष्ट करणे आवश्यक आहे. धर्मनिरपेक्षताविरोधी मुस्लिम प्रवृत्तींशी आमचा झगडा आहे, इतकेच म्हणून हिंदुत्ववादी मंडळी थांबत नाहीत; 'मुस्लिम परके आहेत', ही या विरोधामागची भूमिका आहे. बाहेरून ते येथे आले, येथील भूमी त्यांनी जिंकली, येथील हिंदूंना बाटवून मुसलमान केले, येथे अन्यायाने राज्य केले; हा इतिहासाचा क्रम पुन्हा उलटा फिरवायचा आहे, ही ईर्ष्या हिंदुत्ववाद्यांच्या बोलण्यातून व लेखनातून व्यक्त होते, तेव्हा काही प्रश्न सहजच उपस्थित होतात. एक तर मुस्लिम समाजाच्या सध्याच्या वागण्यापुरता त्यांचा आक्षेप मर्यादित नाही. मुस्लिम समाजाच्या अस्तित्वालाच त्यांचा विरोध आहे, ही वृत्ती ते कळत-नकळत व्यक्त करीत असतात. त्यांना धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्था मान्य नाही. उलट हिंदू राज्य किंवा हिंदूंचे वर्चस्व असलेले राज्य अस्तित्वात यावे, असे त्यांना वाटते. म्हणजे व्यक्तींची समानता त्यांना अमान्य आहे. बहुधा चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्था भारतात असावी, या श्रद्धेने ते पछाडलेले आहेत. हिंदूंची राज्यव्यवस्था याचाच अर्थ चातुर्वर्ण्याधिष्ठित राज्यव्यवस्था असा घ्यावयाचा आहे. एरवी हिंदुत्ववाद्यांत उच्चवर्णीयांचा आणि चातुर्वर्ण्यवाद्यांचा भरणा का असावा?

हिंदुत्ववादी म्हणवणारी ही मंडळी पुन्हा वेगवेगळ्या विचारसरणींत विभागली गेली आहेत. वैदिक काळाला आदर्श मानणारे आर्यसमाजी, चातुर्वर्ण्याच्या चौकटीवर श्रद्धा ठेवणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदू राष्ट्रवादाच्या प्रेरणा लाभलेले हिंदू महासभावादी अशा तीन वर्गांत स्थूलमानाने हिंदुत्ववादी विभागले गेलेले आहेत. हिंदू राज्याची घोषणा करणारा रामराज्य पक्ष आता संपुष्टात आल्यामुळे त्याचा वेगळा विचार करण्याचे कारण नाही.

हिंदुत्ववाद्यांतील हे तीन प्रवाह तीन व्यक्तींनी घातलेल्या भिन्न वैचारिक पायांवर आधारलेले आहेत. स्वामी दयानंद हे आर्य समाजाचे प्रणेते होते आणि के.ब.हेडगेवार व मा.स.गोळवलकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वैचारिक पाया दृढ केला आहे. हिंदू राष्ट्रवादाच्या, हिंदू महासभेच्या घोषणेचे जनक वि. दा. सावरकर होते. हिंदुत्ववाद्यांच्या ज्या चळवळी होत्या किंवा अस्तित्वात आहेत, त्या प्रामुख्याने या तीन व्यक्तींच्या सिद्धान्तांवर आधारलेल्या आहेत.

त्यातील आर्य समाजाचा प्रभाव पंजाब व उत्तर प्रदेशाचा पूर्व विभाग यात एके काळी खूप होता आणि आजही आहे. गुजरातेत जन्मलेल्या स्वामी दयानंदांच्या आर्य समाजाने पंजाबमध्ये मूळ धरावे याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पंजाबमधील त्या वेळच्या सामाजिक स्थितीत याचे उत्तर सापडेल. आपल्या विशिष्ट स्वभाववैशिष्ट्यांमुळे पंजाबात मुसलमान आणि शीख समाज ठसठशीतपणे उठून दिसत होते. पंजाबमधील हिंदू समाजात ह्या वैशिष्ट्यांची उणीव होती, त्या मानसिक अस्वस्थतेमध्ये आर्य समाजाच्या शिकवणीमुळे ही उणीव भरून निघेल, असे त्याला वाटले. आणि आपल्याला आपल्या अस्मितेची एक नवी खूण मिळाली, या हिंदूंमध्ये निर्माण झालेल्या भावनेमुळे पंजाबमधील हिंदू समाजात आर्य समाजाने मूळ धरले.

स्वामी दयानंद यांनी 'सत्यार्थप्रकाश' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ म्हणजे बायबल, कुराण इत्यादी इतर धर्मग्रंथांची निंदा-नालस्ती आहे. युक्तिवाद त्यात भरपूर आहेत. धार्मिक आवाहन कमी आहे. स्वामीजींनी वेदकाळ हा हिंदूंचा आदर्श किंवा सुवर्णकाळ मानला आहे. त्यामुळे वेदकाळापर्यंत मागे जाणे अपरिहार्य ठरले. वेदकाळात जातिसंस्था नव्हत्या, मूर्तिपूजा नव्हती; यामुळे मूर्तिपूजा आणि जातिव्यवस्था हटविण्याची मोहीम आर्य समाजाने आरंभली. एका परीने आर्य समाजाने हिंदू समाजात अंतर्गत सुधारणा निश्चितपणे घडवून आणल्या, परंतु खिलाफत चळवळीच्या काळात झालेल्या दंगली आणि स्वामी श्रद्धानंदांचा एका मुसलमानाने केलेला खून यामुळे आर्य समाजिस्ट लोक कडवे मुस्लिमविरोधक बनले. असे म्हणता येईल की, या दोन घटना घडल्या नसत्या तरी आर्य समाजिस्ट मुस्लिमविरोधी बनलेच असते. कारण गतेतिहासाच्याही मागे जाऊ पाहणाऱ्या ईर्ष्येचा, मागे जाण्याचा तो अनिवार्य परिपाक होता. आज आर्य समाजिस्ट फारसे प्रभावी राहिले नाहीत. पंजाबमध्ये फाळणी झाल्यानंतर परिस्थितीच बदलली आणि शीख-हिंदू तणाव सुरू झाले. आर्य समाजिस्टांनी शीखविरोधाचे राजकारणही सतत केले आहे. यामुळे पंजाबी सुभ्याच्या मागणीच्या वेळी या मागणीला विरोध करणाऱ्यांत आर्य समाजिस्ट आघाडीवर होते. बहुतेक आर्य समाजिस्ट आता जनसंघात गेले आहेत. काही काँग्रेसमध्येही आहेत. *(१९७२ मध्ये हरियानाच्या आर्य समाजिस्ट असलेल्या शिक्षणमंत्र्यांनी मुला-मुलींनी संयुक्त शिक्षण घेण्याच्या पद्धतीवर बंदी हुकूम घातला. काँग्रेसमधील हे आर्य समाजिस्ट काँग्रेसच्या*

*अधिकृत धोरणाविरुद्ध अधूनमधून अशा प्रकारे वागताना दिसतात.)*

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी केली, तेव्हा युरोपात फॅसिझमच्या उदयाचा काळ होता. इटलीत मुसोलिनीने सत्ता काबीज केली होती आणि जर्मनीत हिटलर प्रबळ होत होता. या अतिरेकी राष्ट्रवादी चळवळींचा परिणाम म्हणजे धर्मवादावर आधारलेल्या स्वयंसेवक संघटना होत. हिंदूंत अशी संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रूपाने उभी राहिली. मुसलमानांत खाकसार या नावाने उदयाला पावली. *(डॉ.अल्लामा मश्रिकी हे खाकसार संघटनेचे सूत्रधार होते. ते बर्लिन विद्यापीठाचे पदवीधर होते.)* युरोपातील राष्ट्रीय चळवळीचे वेडेवाकडे परिणाम भारतातील धार्मिक चळवळीवर होणे स्वाभाविक होते. कारण येथे प्रादेशिक राष्ट्रभावना पुरेशी बळकट झालेली नव्हती, हिंदू-मुस्लिम तणाव होते. आणि राष्ट्रवादाला धर्मवादाचे अधिष्ठान दिल्याखेरीज त्या संघटना वाढणे मुश्किलीचे होते. डॉ. हेडगेवार यांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटनाही या पायावर उभी राहिली आणि वाढली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेदेखील इतिहासाकडे मागे नजर लावली होती. पण मुसलमानांकडे बघण्याचा दृष्टिकोन आर्य समाजाशी मिळता-जुळता असला तरी हिंदू समाजाच्या स्वरूपाविषयी या दोन संघटनांत मतभेद होते. चातुर्वर्ण्य हा स्वयंसेवक संघाचे सरसंचालक श्री.गोळवलकर गुरुजी यांनी हिंदू धर्माचा पाया मानला होता. आंतरजातीय विवाहांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कधीच उत्तेजन दिले नाही. गोळवलकर गुरुजी किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टीने वेदकाळ आदर्श ठरतो. दुर्दैवाने हिंदूंच्या अध:पतनाचा तो काळ होता, तो हिंदूंचा आदर्श काळ समजून ते कवटाळून बसले- अजूनही बसलेले आहेत. मात्र मुस्लिम हे आक्रमक आहेत, परके आहेत, त्यांना घालवून दिले पाहिजे, त्यांचे आणि हिंदूंचे कधीच पटणार नाही- ही गोळवलकरांची मते ठाम होती. आपल्या 'We or Our Nationhood defined' या पुस्तकात त्यांनी हिटलरने ज्यूंच्या केलेल्या ससेहोलपटीची स्तुती केली आहे. ते म्हणतात, ‘दोन सांस्कृतिक गटांचे पटत नसेल तर एकाने दुसऱ्याला घालवून देण्यात काहीच गैर नाही. भारताने आपल्यासमोर हे उदाहरण ठेवले पाहिजे.’

खाकसार आणि अहरार इत्यादी मुस्लिम संघटना दंगलींना उघड-उघड उत्तेजन देत आणि दंगली घडवून आणीत, हे मागच्या विवेचनात आलेच आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ दंगली क्वचितप्रसंगी घडवून आणीत असावा, असे मानण्याइतका पुरावा उपलब्ध आहे. सांगलीचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून बाहेर पडलेले एक मित्र सांगतात, ‘‘सांगलीतल्या किमान दोन दंगली संघवाल्यांनी घडवून आणल्या हे मला माहीत आहे.’’ (हे मित्र आपले अनुभव साहित्यरूपाने प्रकट करणार असल्यामुळे त्यांचे नाव जाहीर करणे मी इष्ट मानीत नाही.)

वि.दा. सावरकर हे हिंदुत्ववाद्यांतील अग्रणी होते. त्यातल्या त्यात तुलनेने ते आपल्या विचारांना शास्त्रीय बैठक देत होते. त्यांना अस्पृश्यता अमान्य होती. चातुर्वर्ण्य मान्य नव्हते. खरे तर ते ईश्वराचे अस्तित्वही मान्य करीत नव्हते. विज्ञानाची कास धरण्यामुळेच समाजाची प्रगती होईल, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांना हिंदू धर्माचे राज्य अभिप्रेत नव्हते आणि तरीही भारत हे हिंदू राष्ट्र आहे, ही घोषणा त्यांनीच केलेली आहे. सनातन्यांचे विरोधक सावरकर हे अशा तऱ्हेने हिंदू राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. या बाबतीत त्यांची तुलना जीनांशीच होऊ शकते.

आता सावरकर हयात नाहीत आणि त्यांनी जोपासलेला हिंदू महासभा हा पक्ष जवळजवळ संपुष्टात आला आहे, परंतु महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजात सावरकरांच्या विचारांचा जबरदस्त प्रभाव आहे. आणि महाराष्ट्रात जनसंघाच्या मागे ब्राह्मण समाज एकमुखाने उभा राहण्याचे कारण सावरकरांचा वैचारिक प्रभाव निश्चितपणे आहे.

सावरकरांच्या विचारांची दिशा स्पष्टपणे समजावून घेणे येथे आवश्यक ठरेल. ह्यामुळे या देशाचा राष्ट्रवाद, सामाजिक उभारणी, शासकीय स्वरूप यांच्याविषयी हिंदुत्ववाद्यांच्या कल्पना प्रातिनिधिक स्वरूपात लक्षात येतील. या दृष्टीने सावरकरांनी १९३७ मध्ये अहमदाबाद येथे हिंदू महासभेच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण त्यांच्या विचारसरणीचा ठाव घेण्यास पुरेसे आहे. त्या वेळी मुस्लिम समाजाच्या मागण्या ‘आम्हाला आमच्या संख्येपेक्षा अधिक प्रतिनिधित्व असावे,’ ह्या स्वरूपाच्या असत. सावरकरांनी मुसलमानांना अधिक प्रतिनिधित्व द्यायला या भाषणात विरोध केला आहे. माणशी एक मत या न्यायाने राज्यकारभार चालला पाहिजे, असे ज्या तऱ्हेने आपण म्हणतो; त्या तऱ्हेने (अखंड भारतातील) पंचवीस टक्के मुसलमानांना पंचवीस टक्केच प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, असे त्यांनी आग्रहाने

म्हटलेले आहे. भारत सर्व धर्मीयांचे होईल, प्रत्येकाला त्यात समान अधिकार राहील, असेही त्यात म्हटलेले आहे. परंतु पुढे त्यांनी गमतीदार घोटाळे केले आहेत. ते म्हणतात की– हे 'हिंदू राष्ट्र' होईल आणि 'सीमा' प्रांताच्या (त्या वेळच्या वायव्य सरहद्द प्रांताच्या) अफगाण सीमेवर अफगाणांनी (म्हणजेच मुसलमानांनी) पठाणांनी भारताविरुद्ध उठाव करू नये, म्हणून या हिंदू राष्ट्राचे सामर्थ्यवान हिंदू सैन्य सीमेवर सुसज्ज असेल.

येथे काही प्रश्न मनात उपस्थित होतात. व्यक्तींची समानता असणारे हिंदू राष्ट्र होणार होते, म्हणजे काय होणार होते? सीमेवर हिंदू सैन्य उभे राहणार होते म्हणजे मुसलमानांना सैन्यात प्रवेश नव्हता काय? असे असल्यास ते व्यक्तींच्या समानतेचे राज्य कसे होते? लोकशाही राज्यव्यवस्था होणार की नाही? अखंड भारतात पाच मुस्लिम बहुसंख्याक प्रांत राहिले असते. यामुळे तेथील कारभारात स्वाभाविकपणे मुसलमानांचा वरचष्मा असता. या पाच प्रांतांत लोकमतानुसार कारभार चालणार होता, की मध्यवर्ती प्रबळ हिंदू सरकारचा कारभार राहणार होता? भारताची राज्यव्यवस्था कोणत्या स्वरूपाची असणार होती? या राज्याच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप कोणते राहणार होते?

सावरकरांनी अनेकदा विज्ञानावर भर दिलेला आहे, परंतु राष्ट्रउभारणीच्या संदर्भात औद्योगिकीकरणाला फार महत्त्व प्राप्त होते आणि त्यांच्या सर्व लिखाणात औद्योगिकीकरणाचा, शेतीविकासाचा व अर्थविषयक बाबींचा उल्लेखही आढळत नाही. तरीही भारताने एक कोटींचे सैन्य उभारले पाहिजे, असे ते म्हणत. आज जगात कोणत्याही राष्ट्राने एवढे प्रचंड सैन्य उभे केलेले नाही. अगदी शीत युद्धाच्या तणातणीच्या काळात रशिया व अमेरिकेचे सैन्य अनुक्रमे चाळीस लाख व सत्तावीस लाख असे होते. आणि औद्योगिक दृष्ट्या ही जगातील दोन बलाढ्य राष्ट्रे आहेत, हे ध्यानात घेतले पाहिजे. चीनची लोकसंख्या आपल्यापेक्षा अधिक आहे आणि तरीही चीनचे सैन्य आज चाळीस लाखांच्या आसपास आहे. मग एक कोटी सैन्य भारताने कसे उभे करायचे? त्यांना अन्न कोठून द्यायचे? त्यांना शस्त्रे कोठून आणायची? सावरकरांना या प्रश्नांची उत्तरे देण्याची गरज कधी भासली नाही, कारण त्यांचे राखीव अनुयायी त्यांच्या विधानांवर टाळ्या पिटीत राहिले. त्यांनी कधी सावरकरांनी मांडलेल्या विचारांच्या शक्याशक्यतेचा विचारच केलेला नाही. या देशाची अर्थव्यवस्थाच अप्रगत अवस्थेत होती आणि आजही ती काही अंशी तशीच आहे. तिला गती आणणे, हाच देशाला सामर्थ्यवान करण्याचा एकमेव मार्ग आहे. अमेरिकेची ताकद अमेरिकेच्या अफाट शेती उत्पादनात आणि औद्योगिक शक्तीत आहे. अमेरिकेचे सैन्य हे त्या औद्योगिक आणि शेतीविषयक ताकदीचे प्रतीक आहे. केवळ सैन्य वाढवून देश सामर्थ्यवान होत नाही; स्वयंभू अर्थव्यवस्था निर्माण केल्यानेच देश सामर्थ्यवान होईल, हे सावरकरांना कधी उमगलेच नाही.

वस्तुत: या देशात समानता असेल आणि हिंदू राष्ट्रही असेल, या परस्परविरोधी विधानांचा विचार केला की, सावरकरांचा वैचारिक दृष्टिकोन स्पष्ट होतो आणि तो म्हणजे मध्ययुगीन प्रेरणांवर आधुनिक विज्ञानाचे केलेले कलम अशी त्याची घडण आहे, असे वाटू लागते.

सावरकरांच्या विज्ञाननिष्ठेचाही नीट विचार होणे आवश्यक आहे. ते आधुनिक होते, अस्पृश्यतेला विरोध करीत होते, हिंदू जातिव्यवस्थेच्या विरुद्ध होते. पण त्यांना अभिप्रेत असलेला आधुनिकतावाद हिंदू समाज सामर्थ्यशाली व्हावा आणि त्याने इतरांवर मात करावी याकरता आहे. 'मोठा मासा छोट्या माशाला गिळतो, बलवानच जगात शिल्लक उरतो–' अशाच प्रकारची वाक्ये त्यांच्या लिखाणात किंवा भाषणात सतत विखुरलेली आहेत. मोठा मासा छोट्या माशाला गिळतो, ही एक कटू वस्तुस्थिती झाली; परंतु मोठ्या माशाने छोट्या माशाला गिळू नये, छोट्या माशालाही जगता आले पाहिजे, ही भूमिका मांडणे आणि तिचा आग्रह धरणे हा आजच्या जगात समानतेचे युग आणण्याच्या प्रयत्नाचा भाग होतो. या बाबतीत सावरकर कोणत्या पक्षाचे होते?

हिंदूंनी बलिष्ठ व्हावे, असे म्हणायला कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. हिंदूंनी विज्ञाननिष्ठ बनावे म्हणजे त्यांना आधुनिक हत्यारे वापरता येतील व इतरांचा पाडाव करता येईल, असे त्यांचे प्रतिपादन आहे. अस्पृश्यता हटवायची ती हरिजनांना मूलभूत हक्क लाभावेत म्हणून नव्हे, तर हिंदूंनी बलिष्ठ व्हावे म्हणून. या दृष्टमुळे ते जीनांच्या जवळ येतात. जीनांची आधुनिकता आणि सावरकरांची आधुनिकता यात पुष्कळ साम्य आहे. सावरकरांच्या आधुनिकतेला मुस्लिमविरोधाची बैठक लाभलेली आहे. या त्यांच्या आधुनिक विचारांच्या बैठकीचा संदर्भ ध्यानी घेतला म्हणजे त्यांना मुस्लिम समाजाची भीती वाटत होती,

हे लक्षात येते. भारतीय मुस्लिम समाजाच्या तीनपट मोठा असलेला हिंदू समाज कालांतराने नष्ट होणार आहे, मुसलमान समाज त्याला गिळंकृत करणार आहे, अशा भीतीने ते पछाडलेले होते. मग अफगाणितस्तान भारतीय मुसलमानांच्या संगनमताने भारतावर हल्ला करणार आहे, असे त्यांना वाटू लागले आणि ते भारतीय वृत्तपत्रांतून अफगाणिस्तानच्या अमीराला हल्ला न करण्याची ताकीद देत. त्याला असाही इशारा देत की, 'आम्ही एकटे नाही. नेपाळ हे हिंदू राष्ट्र आमच्या मदतीला धावून येईल.' राष्ट्रवादाच्या प्रेरणांविषयी कमालीचे अज्ञानी असलेल्या सावरकरांची ही विधाने हास्यास्पद होती. पुढे फाळणी झाल्यानंतर अफगाणिस्तान-पाकिस्तान संबंध दुरावले आणि अफगाणिस्तान भारताच्या जवळ आले; तर नेपाळ-भारत संबंध हळूहळू तुटक-तुटक होत गेले आणि भारत-पाक वादात अधूनमधून ते पाकच्या बाजूने उभे राहू लागले. नेपाळ काय किंवा अफगाणिस्तान काय, ही दोन्ही राष्ट्रे आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांनुसार आपली धोरणे आखीत असतात, परंतु या प्रेरणा सावरकरांना कधी उमगल्या नाहीत. म्हणून ते आपल्या कोशातच राहिले आणि त्यांचे आकर्षण महाराष्ट्रातील ब्राह्मणांभोवती मर्यादित राहिले.

महाराष्ट्रातील ब्राह्मणांना सावरकरांचे आकर्षण वाटणे साहजिकच होते. कारण उत्तर भारतातील मुसलमानांप्रमाणेच सत्ता व ऐश्वर्य भोगलेला हा वर्ग आहे. पेशवाईची स्वप्ने अधूनमधून त्यांना पडतातच. सावरकरांनी या स्वप्नांना वाट करून दिली आणि म्हणून ते त्यांचे नेते बनले. सावरकरांनी पेशव्यांच्या इतिहासावर कधीही टीका केलेली नाही, हे इथे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. त्यांनी शिवाजीमहाराजांवर टीका केलेली आहे. महाराजांनी मुसलमानांना बाटवून हिंदू करून का घेतले नाही, असा त्यांचा त्यांच्यावर आक्षेप आहे. खरे म्हणजे पेशव्यांनीही तसे काही केलेले नाही. उलट पानिपतच्या लढाईत पेशवाईला फार हादरा बसला. अब्दालीच्या स्वारीच्या वेळी पेशव्यांनी केलेल्या राजनैतिक आणि लष्करी डावपेचांच्या चुकांविषयी इतिहासकारांनी खूप लिहिले आहे. सावरकरांनी मात्र या सर्व ब्राह्मणी इतिहासाची टिमकी वाजविण्याचा प्रयत्न केला आहे. एरवी सदाशिवभाऊ दिल्ली जिंकल्यानंतर दिल्लीच्या तख्तावर विश्वासरावांना बसविणार होते, अशी मसलत झाली होती- अशा भाकडकथा सावरकरांनी लिहिल्या नसत्या. ही विधाने करताना त्यांना काही ऐतिहासिक पुरावा देण्याची आवश्यकता भासली नाही. आपल्या अंध ब्राह्मणभक्तीचे असे हास्यास्पद प्रदर्शन सावरकरांनी केलेले आहे. तरीही सावरकर हे सावरकरभक्तांकडून सामाजिक समानतेचे पुरस्कर्ते समजले जातात.

सावरकरांच्या या अंध मुस्लिमविरोधाचे स्वरूप नीट समजावून घेतले पाहिजे. आरंभीच्या सशस्त्र क्रांतीच्या प्रेरणेने भारावलेल्या काळात ते मुस्लिमविरोधक नव्हते. १८५७ च्या युद्धावर त्यांनी लिहिलेल्या पुस्तकात मुस्लिमविरोधाचा अंशही आढळत नाही. 'अभिनव भारत' या तरुणपणी स्थापन केलेल्या क्रांतिकारकांच्या संघटनेत तर शिकंदर हयातखान हेदेखील होते. पुढे अंदमानला कैद्यांवर मुस्लिम पहारेकरी अत्याचार करताना त्यांनी पाहिले आणि त्यामुळे ते हळूहळू मुस्लिमविरोधी झाले. मुस्लिम समाजासंबंधी त्यांनी आक्षेप घेणे चुकीचे नव्हते. मुस्लिम समाजाचा धर्मवाद, जातिवाद याबाबत सावरकरांशी मतभेद होण्याचे कारण नाही. (प्रस्तुत पुस्तकात त्याचे विवेचन झालेले आहे.) हिंदूंत तशीच समान आंदोलने प्रबळ असतील, तरच मुस्लिम जातिवादाला आळा बसेल, अशी त्यांची चुकीची मते होती. म्हणूनच पाकिस्तानची घोषणा झाल्यानंतर सावरकरांनी हिंदू राष्ट्राची घोषणा केली. देशात पंचवीस टक्के मुसलमान राहतात, त्यांच्या पाकिस्तानच्या मागणीला विरोध करताना त्यांना राष्ट्रवादात सामावून कसे घ्यायचे, या संबंधात सावरकरांनी काहीच म्हटलेले नाही. पाच प्रांतांत बहुसंख्याक असलेले मुसलमान धाकदडपशाहीने नमले असते, अशी त्यांची रम्य कल्पना होती. या मुसलमानांना बदलायचे कसे, यासंबंधीदेखील ते काही सांगत नाहीत. मात्र ते बदलले पाहिजेत, असा ते आग्रह धरतात आणि कौतुकाने केमाल पाशाचे उदाहरण सांगतात. 'मुसलमान हा एक समाजघटक आहे आणि त्याला सामाजिक स्थित्यंतराचे नियम लागू आहेत,' हे त्यांनी कधी लक्षात घेतले नाही. बदलत्या इतिहासाची दखलही ते घेताना दिसत नव्हते. आणि हिंदू-मुसलमान समाजाच्या स्थित्यंतराची ते लावीत असलेली मापे दुटप्पी होती.

अस्पृश्यता ही रूढी बदलण्याचे प्रयत्न केले पाहिजेत, असे ते म्हणत असत. म्हणजे समाजबदलाच्या नियमाप्रमाणे हिंदू समाजाला अवधी देण्याची त्यांची मागणी होती. पण मुसलमानांना मात्र हा निकष लागू नव्हता. त्यांची चीड जगात होणाऱ्या कुठल्याही अन्यायाविरुद्ध नव्हती;

मुसलमानांनी हिंदूंवर अन्याय करू नये, एवढी ती मर्यादित होती. हिंदूंनी हिंदूंवर सतत अन्यायच केलेले आहेत, परंतु याची पोटतिडीक त्यांच्या लिखाणात वा भाषणात कधी जाणवली नाही. एकदा डॉ.आंबेडकरांनी मुसलमान होण्याची धमकी दिली. तेव्हा सावरकरांनी त्यांना मुसलमान होण्यापासून परावृत्त करण्याविषयी जे पत्र लिहिले, ते मासलेवाईक आहे. त्या पत्रात सावरकरांनी इतिहासातील एका घटनेचा दाखला दिला आहे. कुठल्या तरी मुस्लिम राजाने केलेल्या आक्रमणाच्या वेळी हिंदू धर्मरक्षणार्थ हरिजन कसे बेभान होऊन लढले याचे त्यात रसभरीत वर्णन आहे. वस्तुत: हरिजन हे हिंदूंचे गुलाम होते. या गुलामांनी केलेल्या हिंदू धर्माच्या रक्षणाची फुशारकी सावरकरांनी मारावी, ही गंमत आहे. हरिजनांनी ब्राह्मणांच्या लढाया लढवाव्यात आणि त्यांच्या दास्यमुक्तीसाठी कोणी टाहो फोडला तर त्याला सबुरीचा सल्ला द्यावा, असा हा खास ब्राह्मणी खाक्या होता.

सावरकरांचा प्रभाव आता वैचारिक दृष्ट्या महाराष्ट्रात ब्राह्मणवर्गापुरता मर्यादित राहिला आहे. त्यांनी गोहत्येचे समर्थन केले आहे. रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात सामाजिक सुधारणेचे काही लेख त्यांनी लिहिले. त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या सामाजिक सुधारणेचे कार्य जरी अंगीकारले, तरी त्यांचे ऋण त्यांनी फेडले असे होईल; परंतु तसे होत नाही. आज त्यांचेच अनुयायी गोहत्याबंदीची चळवळ करताना दिसत आहेत. सावरकरांचे हे खरे अपयश आहे. कारण त्यांच्या मागे येणारी मंडळी तशी विज्ञाननिष्ठ नव्हतीच. सावरकरांच्या मुस्लिमविरोधामुळे ही सनातनी मंडळी सावरकरांकडे आकर्षित झालेली होती. त्यांना सावरकरांच्या इतर कार्याचे काही अगत्य नव्हते. यामुळे जनसंघाला पुढे महाराष्ट्रातील ब्राह्मणांत प्रचंड प्रमाणात रंगरूट मिळावयास सावरकरांचे तत्त्वज्ञान उपयोगी पडले.

वस्तुस्थिती अशी आहे की, सावरकरांची विज्ञाननिष्ठा ही हिटलरच्या जातीची होती. जीनांची तथाकथित आधुनिकतादेखील याच जातीची होती. दुसऱ्यावर मात करणे, दुसऱ्यांना आपल्या धाकाखाली नमविणे याकरिता त्यांना शास्त्रांचा आणि ज्ञानाचा उपयोग करून घ्यायचा होता. कोणी तरी प्रबळ असणारच असेल आणि सबळ दुर्बलांवर मात करतात असे असेल; तर आपण सबळ का होऊ नये, असे सावरकरांनी कित्येकदा म्हटले आहे. मोठा मासा छोट्या माशाला गिळतो, हे उदाहरण त्यांनी कित्येक वेळा दिलेले आहे. मोठा मासा छोट्या माशाला गिळतो हे खरे, परंतु माणूस म्हणजे मासा नव्हे. माशांचे नियम माणसाला लावता येत नाहीत, हे सावरकरांना कळलेले नाही. जगात समतेचा-न्यायाचा जो प्रवाह आहे, त्याविरुद्धच हे सावरकरांचे तत्त्वज्ञान होते. त्यामुळे पेशवाईच्या इतिहासाचा अहंकार बाळगणाऱ्या महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाने आत्मसात केलेली ही आधुनिकता दुटप्पी आहे. तो मांसाहार करतो- नव्हे, बाहेर क्वचित काही ब्राह्मण गोमांसही भक्षण करतात. जनसंघाच्या सनातन धर्मप्रवृत्तीवर क्वचितच त्याचा विश्वास असेल. कुठलीच व्रतवैकल्ये तो करीत नाही आणि एक ऋचादेखील त्याला म्हणता येत नाही. तरीही महाराष्ट्रात जनसंघाचा तोच अनुयायी आहे. ही दुटप्पी आधुनिकता हा सावरकरांनी महाराष्ट्राला दिलेला वारसा आहे. एका परीने सुशिक्षित मुसलमान नमाज पढत नाहीत, धर्म जाणत नाहीत आणि कमालीचे हिंदुद्वेषी आहेत; त्यांच्याशी महाराष्ट्रातील या ब्राह्मणवर्गाचे साम्य आहे. एक वर्ग जीनांची भलावण करतो, तर दुसऱ्याची सावरकरभक्ती जाणवण्यासारखी आहे.

OO

*(१९३२ ते ७७ असे ४५ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या हमीद दलवाई यांनी अखेरच्या काळात जे पुस्तक लिहिले त्याचे नाव- 'राष्ट्रीय एकात्मता व भारतीय मुसलमान'. आजारपणामुळे त्यांना त्यावर शेवटचा हात फिरवता आला नाही आणि काही भर टाकावयाची होती, तीही टाकता आली नाही. त्यामुळे ते पुस्तक त्यांच्या हयातीत प्रकाशित होऊ शकले नाही. मात्र त्यांच्या मृत्यूनंतर २५ वर्षांनी म्हणजे २००२ मध्ये मेहरुन्निसा दलवाई यांनी ते हस्तलिखित ग.प्र.प्रधान व भाई वैद्य यांच्या स्वाधीन केले. त्यांनी ते साधना प्रकाशनाकडून आणले, त्याच्या दोन आवृत्त्या साधनाकडून आल्या. तिसरी आवृत्ती सुगावा प्रकाशनाकडून आली. आणि आता चौथी आवृत्ती पुन्हा साधना प्रकाशनाकडून येत्या ३ मे रोजी (दलवाईंचा स्मृतिदिन) प्रकाशित होत आहे. त्या पुस्तकातील 'हिंदुत्ववाद' या अखेरच्या लेखातील पूर्वार्ध येथे प्रसिद्ध करीत आहोत. हा भाग येथे घेण्यासाठी एक औचित्य पुस्तकाची नवी आवृत्ती येत आहे हे तर आहेच; पण दुसरे औचित्य अधिक महत्त्वाचे आहे, ते म्हणजे हिंदुत्ववादाच्या नावाखाली पुन्हा एकदा हा देश उन्मादावस्था अनुभवतो आहे. –* **संपादक***)*

थेट सभागृहातून

अर्जुन डांगळे

# महाकवी वामनदादा कर्डक साहित्य संमेलनातील भाषण

आंबेडकरी जलशांचे प्रेरणास्थान हे सत्यशोधकी जलसे आहेत. परंतु ज्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी शाहिरीद्वारे कष्टकऱ्यांचा, शोषितांचा आवाज बुलंद केला. लोकनाट्य सादर करून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ऊर्जा भरली त्याची प्रेरणादेखील आंबेडकरी जलसे आहे. म्हणजे सत्यशोधकी जलसे-आंबेडकरी जलसे आणि पुढे शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे, गव्हाणकर यांच्या लालबावटा कलापथकामार्फत महाराष्ट्रात पेरलेला झंझावात यात एक सूत्र आणि सांस्कृतिक नाते दिसते. (यासंदर्भात मी 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे : निवडक वाङ्मय' या संपादित पुस्तकाच्या प्रस्तावनेत सविस्तरपणे लिहिले आहे.)

साधारणत: १९३० ते १९४५ असा हा जलशाचा कालखंड आहे. अनेक कलावंतांनी हे कार्य अत्यंत निष्ठेने केले. त्यामध्ये भीमराव कर्डक, पांडुरंग गोविंद पवार, दिनकर भिमाजी भोसले, रामचंद्र हनमंत अंडागळे, शिवराम सावळाराम गडकरी, रामचंद्र नामदेव सोनावणे, केरूजी घेगडे, अर्जुन भालेराव, केशव सुका आहेर, पतीत पावन दास, अमृतबुवा बावस्कर, कवी शेखर, कवी धोंडिराम निकम, कोंडदेव श्रीराम खोलवडीकर अशा अनेकांचा समावेश आहे.

या जलशांचा काळ ओसरल्यानंतर आंबेडकरी विचारांचा आणि चळवळीचा प्रसार करण्यासाठी गायक कलावंतांचा कालखंड आला. स्वत: वामनदादा या विषयी लिहितात, १९५६ साली धर्मांतर झाले. आम्ही बौद्ध झालो. नवा विचार, नवा आदर्श घऊन सन्मानाने, ताठ मानेने जगू लागलो. नवशिक्षितांची एक पिढी तयार झाली. या दरम्यान जलसा मंडळे अस्त होऊ लागली. जलसा नंतरची दुसरी पिढी बैठ्या गायन पार्ट्यांची. राजानंद गडपायले, श्रीधर ओव्हळे, सदानंद वांद्रे, धरमदास मोहिते, नागपूरचे नागोराव, दिनबंधू, दलितानंद, लक्ष्मण केदार आणि वामन कर्डक हे बैठ्या गायनातील पहिल्या पिढीचे कवी.

या कवींचे वैशिष्ट्य असे की, दिनबंधू आणि श्रीधर ओव्हळ हे कवी सोडल्यास बाकीचे सगळे कवी आपल्या

१५ ऑगस्ट १९२२ ते १५ मे २००४ असे ८२ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या वामनदादा कर्डक यांच्या गीतांनी महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीला आणि एकूणच डाव्या पुरोगामी चळवळीला पाच-सहा दशके ऊर्जा पुरवली आहे. त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सध्या चालू आहे. त्यानिमित्ताने बुलढाणा येथे २३ एप्रिल २०२२ रोजी 'महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय साहित्य संमेलन' आयोजित केले होते. त्या संमेलनाचे अध्यक्ष अर्जुन डांगळे होते. त्यांच्या लिखित भाषणातील उत्तरार्ध येथे प्रसिद्ध करीत आहोत.
**- संपादक**

रचना स्वत: सादर करीत. स्वत: गीतलेखन करून ती स्वत: सादर करणाऱ्या कवी गायकांची एक वैभवशाली परंपरा आंबेडकरी चळवळीत आहे. या वैभवशाली आणि संपन्न परंपरेत अनेक कवी-गायक आहेत. त्यामध्ये किसन खरात, हरेंद्र जाधव, शंकर कांबळे, भिमदास हिंदळेकर, विठ्ठल उमप, उत्तम मुळे, नवनीत खरे, भिकू भंडारे, भगवंत चोपडे, साहेबराव कोकाटे, राजस जाधव, प्रतापसिंग बोदडे, विष्णु डांगे, प्रभाकर पोखरीकर, राम मोरे, रंगराज लांजेवार, प्रकाश पाटणकर, विष्णु शिंदे ह्या कवी गायकांचा उल्लेख करावा लागेल. याशिवाय या बैठ्या- गायन पार्ट्यांमध्ये आणि मैफल गाजविणाऱ्यांमध्ये श्रावण यशवंते, प्रल्हाद शिंदे आणि गोविंद म्हशीलकर यांचा खास आणि प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. अशा या आंबेडकरी विचारांचे, स्वरांचे झंझावात म्हणजे वामनदादा कर्डक. तुफानातील दिवा सातत्याने प्रकाशित राहील, त्याचे नाव महाकवी वामनदादा कर्डक होय. त्यांच्या नावाने भरविल्या गेलेल्या ह्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मला दिले आहे, हा मी माझा बहुमान समजतो. आणि या संमेलनाची उभारणी करणाऱ्या संयोजकांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

वामनदादा सारख्या महाकवीचा, लोककवीचा, शाहिराचा, प्रतिभेच्या उत्तुंग झेप घेणाऱ्या ह्या ज्येष्ठ कलावंतांचा मला सहवास लाभला हे माझ्या आयुष्यातील तेजस्वी क्षण होत. नाशिक मध्ये गेल्यानंतर त्यांची हमखास भेट घ्यायचो. अनेकदा भेट होत नसायची, कारण सतत ते पायाला चाके लावून फिरत असायचे. पण मुंबईत चेंबूरला लालडोंगर भागात आल्यावर त्यांचा दीर्घ-सहवास मिळायचा. चर्चा-गप्पा व्हायच्या. जेष्ठ गायक कवी लक्ष्मणदादा केदार, प्रतापसिंग बोदडे सारखे प्रतिभावंत कवी, गायक आणि अनेक तरूण कवी-गायक, कार्यकर्ते असत. ते दिवस चळवळीचे होते. वामनदादा आणि मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामध्ये जवळ जवळ तीन चार वर्षे एकत्र काम केले आहे. वामनदादांच्या ठायी असलेल्या सामाजिक जाणीवेचे भान किती प्रखर आहे याचे मला एकदा प्रत्यंतर आले. कांताराम सोनावणे यांच्या आग्रहावरून साहित्य संस्कृती मंडळाची एक बैठक मुलुंडला त्यांच्या घरी ठेवण्यात आली होती. मंडळाचे अध्यक्ष रा. रं. बोराडे, अरूण साधू, दया पवार, डॉ. निर्मलकुमार फडकुले, वामनदादा, मी असे सदस्य उपस्थित होते. त्यावेळी मी माझ्या 'पॉयझन्ड ब्रेड' या इंग्रजी संपादित पुस्तकाचे काम करीत होतो. मिटींग संपल्यानंतर मी आणि वामनदादा मुलुंड स्टेशनवर आलो. या पुस्तकात वामनदादाची कविता मला समाविष्ट करायची होती. कोणती कविता द्यावी ह्याविषयी मी गोंधळलेला होतो. कारण वामनदादांच्या अनेक रचना ह्या प्रचंड ताकदीच्या आणि आशयाच्या होत्या. मी वामनदादांना माझी खंत सांगितली. ते म्हणाले, बसा आणि त्या प्लॅटफार्मवर आम्ही बाकड्यावर बसलो. ते म्हणाले, तुम्ही बाबासाहेबांच्या विचारांचे साहित्य इंग्रजीत आणता तर बाबासाहेबांच्या चळवळीचे घोषवाक्य काय होते? मी म्हणालो, शिका, संघटित व्हा, संघर्ष करा. मग अशी कविता घ्या. मी म्हणालो, कोणती? वामनदादा मिश्किलपणे हसले आणि म्हणाले, बाबासाहेबांच्या चळवळीचा मूळ गाभा म्हणजे शिक्षण, 'माझ्या पेंद्याला शाळेत घाला' ही कविता घ्या आणि मी हो म्हटलं. पुढे ते म्हणाले, तुम्ही ती कविता शोधाल तेव्हा शोधा, आता पेन घ्या आणि ती कविता वामनदादा मला सांगत होतो, मी लिहित होतो. मुलुंड स्टेशनच्या प्लॅटफार्मनंबर दोनच्या बाकड्यावर बसून एक महाकवी मला ती कविता ऐकवत होता. आणि वामनदादांनी केलेल्या कवितेची निवड किती सार्थ होती हे तो ग्रंथ प्रकाशित झाल्यावर मला अभिप्रायातून दिसते. हा प्रसंग मी मुद्दाम सांगतो. वामनदादा सरळसोट जगले. प्रतिष्ठेची, अहंकाराची, झूल त्यांनी पांघरली नाही. वामनदादांच्या ह्या साध्या सरळ जगण्याचा अनुभव आपल्यापैकी अनेकांना आला असेल.

वामनदादा म्हणजे आंबेडकरी गीत काव्याचा महानायक आणि महाकवी होय. पाच हजारांहून अधिक गीते त्यांनी लिहिली. हिंदीतून रचना केल्या. वामनदादांच्या गीताविषयी अनेकांनी लिहिले आहे. त्याविषयी अधिक सखोलतेने लिहिण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

वामनदादांच्या गीतांनी आंबेडकरी चळवळीतल्या पिढ्यांना ऊर्जा दिली. माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या आंबेडकरी जाणीवा वामनदादांच्या गीतांनी प्रखर केल्या. एका अर्थाने वामनदादा हे आंबेडकरी चळवळीच्या सांस्कृतिक आणि प्रबोधन चळवळीतील ऊर्जाकेंद्र (पॉवर हाऊस) होते असे म्हटले तर अनुचित ठरणार नाही. त्यांच्या गीतातील ऊर्जा ही आजही मिळते आहे आणि भावी पिढ्यांना मिळत राहील यात शंका नाही.

मी जेंव्हा वामनदादांच्या गीतरचनेचे सामर्थ्य नेमके कशात आहे याचा धांडोळा घेतो तेंव्हा ह्या प्रतिभासंपन्न आणि विचारांची उत्तुंग झेप असलेल्या कवीचे सामर्थ्य कशात आहे तर ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी गाढ, अगाध, प्रेम, निष्ठा, जिव्हाळा आणि बांधीलकी होय.

वामनदादांच्या गीतातून संवेदनशीलता आणि बांधिलकीचा प्रत्यय येतोच पण त्या गीतांमधून आविष्कृत होणारे भावविश्व, विचारविश्व हे बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या चळवळी केल्या, जे लढे दिले, संघर्ष केला, ज्या ऐतिहासिक घटना घडल्या त्या सर्वांचे पडसाद त्यांच्या ह्या गीतांच्या विशाल महासागराच्या पोटात दडलेले आहे. अगदी बाबासाहेबांच्या जन्मापासून ते माणगाव परिषद, काळाराम मंदिर सत्याग्रह, पुणे-करार, धर्मांतराची घोषणा, येवल्याची परिषद, रिपब्लिकन पक्ष आणि त्यातील गटबाजी, विचारांचे आक्रमण, ग्रामीण कष्टक़री स्त्रियांचे भावविश्व, सुशिक्षित दलितांची बेजबाबदार मनोवृत्ती, बौद्ध तत्वज्ञान, आर्थिक सामाजिक विषमतेविषयी चिड, निसर्गाची मानवी भाववृत्तीशी सुरक्षित सांगड, पुढाऱ्याच्या दांभिकतेवर ओढलेले आसूड असे अनेक विषय आहेत.

हा प्रचंड महाकाय अवकाश आपल्या प्रतिभासंपन्न गीतातून कवेत घेणारा हा महाकवी मानवमुक्तीचा लढ्यातील ठेवा होय. वामनदादांनी माणूस हा केंद्रबिंदू मानला होता. वामनदादांच्या गीतांच्या मुळाशी सखोल अशी वैचारिक जाणीव होती. वामनदादा 'माझ्या जीवनाचं गाणं' ह्या आत्मचरित्रात म्हणतात, ''मी चातुवर्ण्याची चौकट मोडली तसाच मी काव्यशास्त्राच्या चौकटीतून मुक्त आहे. तरी गाणं म्हटलं की यमक आलंच. संपूर्णपणे यमकाचं बंधन तोडता येणार नाही. मी संगीत शास्त्राचे नियम देखील तोडले आहेत. तरी आमच्या गाण्याला देखील एक शास्त्र आहे. बुद्ध, फुले, आंबेडकर जमेल तसे गायनातून सांगतो एवढेच माझे काम. तर मानवी जीवनाच्या कप्प्याकप्प्यात शिरून मी लिहित आलोय. मी माणसाचंच गाणं गात आलोय. आणि माणसांनी ते मान्य केलंय एवढं मात्र खरं की मी प्रेमाच्या परवडीची गाणी गात नाही आणि माझं गाणं फारसं बोचरंसुद्धा नसंत. मी वाङ्मयीन मूल्यांची मुळीच पर्वा केलेली नाही. एक तळमळ म्हणून माझी गाणी प्रकाशित करीत आलोय.''

वामनदादा हा माणसाचं गीत गाणारा महाकवी. त्यांच्या एकूण समग्र गीतांचा आढावा एका भाषणात घेणं



अशक्यप्राय आहे. कारण त्यांची समग्रशील रचना ही आशयसंपन्न आणि बहुआयामी आहे. गेयता हे त्यांच्या गीतरचनेचे वैशिष्ट्य आहे. पण गीत गेय करण्यासाठी आशयाशी वा विचारांशी तडजोड करणारी नाही. साधारणत: मराठी साहित्यातील रचना ही अव्वल ठरते ह्याचे कारण हे की, बहुसंख्य मराठी गेय कविता ही निसर्ग आणि मानव यांच्यातील भाववृत्तीचा आविष्कार आहे. वामनदादांच्या गीतातून निसर्ग-मानव आविष्क्रांत होतोच पण त्याही पलिकडे त्यांच्या गीतातून जो सामाजिक आशय व्यक्त होतो. त्या गीतातील ठासून भरलेल्या परिवर्तन ऊर्जेतून लयबद्धता, गेयता कमी होत नाही. म्हणून मराठी पारंपरिक गेय कवितांपेक्षा वामनदादांची गेयता ही अव्वल ठरते. या दृष्टीने देखील अभ्यासकांनी वामनदादांच्या गीत रचनेतील ह्या पैलूंवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे असे मला वाटते. मागे उल्लेख केल्याप्रमाणे त्यांच्या गझला तसेच हिन्दी गीत रचनांवरदेखील अभ्यासपूर्ण लिखाण होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

वामनदादांच्या गीत रचनेच्या विविध पैलूंचा आणि वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना एक गोष्ट ठळकपणे जाणवते. ती म्हणजे बाबासाहेबांबद्दल आणि त्यांच्या

चळवळीवर असलेली त्यांची अपार आणि प्रखर निष्ठा होय. बाबासाहेबांवर लिहितांना वामनदादांची प्रतिभा आणि कल्पकता एका उंचीवर जातांना दिसते. एक अद्भुत विलोभनीय सृष्टी ते आपल्यापुढे उभे करतात.

बाबासाहेबांच्या जन्माविषयी ते लिहितात

चकित जाहले वरती अंबर
नजर तयाची खिळली भूवर
म्हणे कुणाचे आज स्वयंवर
पडला मांडव अवघा भूवर
नभांगणाहून नटले भूवन
पुनवेचेही गेले मी पण
चंद्र लाजला लपू लागला
असा सोहळा भूमीवर आजला

किंवा भीमजयंतीविषयी लिहिताना वामनदादा म्हणतात.

पहाट झाली प्रभा म्हणाली
भीम जयंती आली
चांदाची चांदणी येऊन खाली
वारा भीमाला घाली

बाबासाहेबांवरील ह्याच अपार निष्ठेतून वामनदादांनी बाबासाहेबांना अनेक रूपात रेखाटले आहे. बाबासाहेब कधी लेकराची माता होतात, कधी काळाशी झुंज घेणारा योद्धा होतात, कधी ज्ञानदाता होतात, तर कधी दीनदुबळ्यांच्या अंत:करणावर उमटलेला अमीट ठसा होतात.

बाबासाहेबांनी इथल्या सामाजिक-धार्मिक व्यवस्थेच्या वरवंट्याखाली चिरडल्या जाणाऱ्या अस्पृश्य गणल्या गेलेल्या वर्गासाठी लढा दिला असला तरी त्यांचा मूलत: लढा मानवमुक्तीचा होता आणि लढा तितक्याच नेटाने, निडरपणे, निर्भयपणे पुढे चालविणे हे वामनदादांच्या कवितेचे सूत्र आहे. म्हणून ते म्हणतात

भीमवाणी पडली माझ्या कानी
तीच वाणी ठरली माझी गाणी
आम्ही तुझे संतान भीमा
आम्ही तुझे संतान
तुझा वारसा पुढे न्यावया करू जीवाचे दान

हा वारसा पुढे का न्यावयाचा आहे कारण, वामनदादा म्हणतात

जखडबंद पायातील साखळदंड
तटातट तुटले तू ठोकताच दंड
झाले गुलाम मोकळे
भीमा तुझ्या जन्मामुळे

बाबासाहेबांनी इथल्या विषमतेविरूद्ध, शोषणाविरूद्ध जी झुंज दिली, जो संघर्ष केला. त्या गौरवशाली संघर्षाचे चित्रण वामनदादांनी अनेक गीतांतून केले आहे. याच संघर्षातून गुलामगिरीतून मोकळे झालेले गुलाम आज माणूस म्हणून समाजात ताठ मानेने जगत आहेत. परंतु सनातनी, प्रतिगामी, उच्चवर्णीय मानसिकतेला हे सहन होत नाही. सातत्याने प्रतिक्रांतीचे प्रयत्न होत आहेत. ही प्रतिक्रांती रोखण्यासाठी, तिच्याविरूद्ध लढण्यासाठी आपल्या गीतातून स्फूर्ती देतात. म्हणून म्हणतात..

तुफानातील दिवे आम्ही
तुफानातील दिवे
तुफान वारा, पाऊसधारा
मुळी न आम्हा शिवे
हल्ल्यावरती होते हल्ले
अभंग आमुचे बालेकिल्ले
तसाच ताठर माथा आमुचा
जरा न खाली लेवे

वामनदादांची प्रतिभा, काव्यशक्ती, गीतरचना ही केवळ भूतकाळात रममाण होणारी नव्हती. बाबासाहेब आंबेडकरांना इथल्या समाजव्यवस्थेमध्ये जी उतरंड उद्ध्वस्त करायची होती, समता मूल्याधिष्ठित समाजाची उभारणी करण्यासाठी सामाजिक पुनर्रचना करायची होती. बाबासाहेबांच्या ह्या नवसमाज निर्मितीचा आविष्कार वामनदादांच्या पुढील गीतातून होतो.

पहा पहा रे जग हे सारे
पाऊल टाकी रोज पुढे
जुने पुराने जुल्मी वाडे
कुजलेली कुजकी झाडे
उन्मळती हे कोसळती हे
सारे मातीआड दडे
नवी पालवी पुन्हा फुटावी
सृष्टी सारी पुन्हा नटावी

आपले प्रेरणास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर असंख्य लिहिले गेले. वामनदादा आणि नामदेव ढसाळ या दोघांच्या कविता लक्षणीय आहेत. आज या निमित्ताने वामनदादांना भीम कसा दिसत होता ते पाहू.

कापराची काया चांदण्याची छाया

माऊलीची माया होता माझा भीमराया
सात ठिगळाच्या बंडीचा,
भीम माझा खिसा होता
वादळी वाऱ्यामधी तोफेच्या माऱ्यामधी
पाहिला भीम आम्ही रणी लढणाऱ्यांमधी
नको म्हणू काही भीम आहे सर्व ठायी
आहे त्याची किर्ती, किर्तीला मृत्यू नाही

वरील गीताच्या ओळीचे नीट अवलोकन केल्यास एक स्पष्टपणे जाणवते की वामनदादांची गीते निव्वळ विभूतीपूजक नाहीत. तर त्या महापुरूषाच्या विचारांबद्दल त्यांची वैचारिक परंपरा जपणारी आहे आणि ते खरेही आहे. बाबासाहेब त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर देखील आपल्यासोबत आहे असे जाणवते. मग ते आपल्याला त्यांनी लिहिलेल्या ग्रंथाच्या पानापानातून भेटतात, भारतीय संविधानात दिसतात, सामाजिक हक्काच्या, न्यायाच्या लढाईत ते दिसतात.

वामनदादांनी बुद्ध, फुले, कबीर यांच्या विचारांचा, तत्त्वज्ञानांचा गीताद्वारे आविष्कार केला आहे. तसेच आर्थिक विषमतेवर देखील हल्ला केलेला आहे.

सांगा आम्हाला बिर्ला, बाटा, टाटा कुठं हाय हो
सांगा धनाचा साठा, आमचा वाटा कुठं हाय हो

हे गीत आज परिवर्तनवादी, समतावादी चळवळीचे गीत झाले आहे. कुसुमाग्रजांचे 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' किंवा साने गुरूजीचे, 'आता उठवू सारे रान' हे गीत जसे चळवळीत अजरामर झाले आहे तेच स्थान चळवळीत वामनदादांच्या या गीताला आहे. या गीताच्या संदर्भात माझी एक आठवण आहे. ती या प्रसंगी सांगणे उचित वाटते. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने देण्यात येणारी गौरववृत्ती वामनदादांना प्रदान करण्याचा कार्यक्रम नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयात आयोजित केला होता. कविवर्य कुसुमाग्रज मुख्य पाहुणे होते. अनेक दिग्गज साहित्यिक उपस्थित होते. वामनदादांना काही गीते पेश करण्याचा आग्रह झाला. साजवाज काहीच नव्हता. दादांनी आपल्या पहाडी आवाजात दोन-तीन गीते सादर केली. 'सांगा आम्हाला बिर्ला-बाटा' हे गीत सुद्धा सादर केले. सगळे सभागृह प्रभावीत झाले. मराठीतील प्रसिद्ध कादंबरीकार अरूण साधू हे देखील होते. ते तर इतके प्रभावित झाले की त्यांनी दोन-चार दिवसांतच वामनदादांवर लेख लिहून स्पेनचा क्रांतीकारक कवी (मला नाव आठवत नाही) यांच्याशी वामनदादांची तुलना केली.

वामनदादांची राहणी सरळ साधी होती. कुठलाही बडेजाव नव्हता. भीमगीते हा त्यांचा श्वास होता. पण ते बोलण्यात स्पष्ट होते. कधी कधी तर न रूचणाऱ्या गोष्टींबद्दल ते फटकळपणे बोलत. पण त्यांचे मन निर्मळ होते. आणि म्हणूनच समाजातील चळवळीतील न रूचणाऱ्या गोष्टीबद्दल ते स्पष्ट लिहित. विशेषत: समाजातील सुशिक्षित उच्च-मध्यमवर्ग ज्यांनी समाजापासून नाळ तोडलेली आहे किंवा जे पुढारी समाजाच्या ताकदीवर मोठे झाले आहेत पण समाजाकडे, चळवळीकडे दुर्लक्ष करीत आहे, अशा लोकांची परखडपणे हजेरी वामनदादांनी आपल्या गीतातून घेतली आहे. आंबेडकरी विचारांबद्दल त्यांना तडजोड अमान्य होती. अशा समाजापासून दुरावत चाललेल्या लोकांना वामनदादा प्रश्न विचारतात.

भीम गेल्यापाठी काय काय केलं?
काय काय लावलं पणाला?
काय काय लावलं पणाला?
विचार आपुल्या मनाला?

समाजामध्ये जी कर्तृत्वहिनता वाढत चाललेली होती त्याबद्दल वामनदादांना खंत होती. ती खंत ते स्पष्टपणे बोलून दाखवितात. ते म्हणतात

कालचे रिकामे आताचे निकामे
जगतात आई तुझ्याच नामे
इथे वामन खरे तेच गाई
तुझीच कमाई आहे ग भिमाई
कुणाचेच इथे काही कष्ट नाही

ही खंत त्यांना उद्वेगाच्या पातळीवर नेते. स्वत:लाच दोष देऊ लागते. आपणच म्हणजे समाजाने, चळवळीने आपल्यातला भीम उणा केला आहे असे सांगते आणि म्हणून ते म्हणतात

मला चीड येत नाही हाच माझा गुन्हा
दोष देऊ कुणा सांगा दोष देऊ कुणा

या देशात, इथल्या समाजव्यवस्थेने शूद्रांना जशी अमानवी वागणूक दिली त्याचप्रमाणे इथल्या स्त्रीवर्गाला देखील दुय्यम दर्जाचे स्थान देण्यात आले आहे. विशेषत: ग्रामीण भागातील स्त्री वर्गाचे दास्य विदारक आहे.

वामनदादांनी निसर्गाच्या सान्निध्यात कष्ट करणाऱ्या स्त्रीयांच्या वेदनेचा शोध घेतला आहे. 'चल ग हिरणी

तुरूतुरू' हे त्यांचे गाणे प्रसिद्धच आहे. पण 'नदीच्या वाट चूनचून काटं' ही कविता कुणाच्याही संवेदनशील मनाला टोचत राहते. या कवितेच्या काही ओळी उदधृत करतो. वानमदादा म्हणतात.

नदीच्या वाटं चूनचून काटं
चुनचुन करती पायी
पोर चालत राही
सांजच्या पारी, गवताचा भारा
ओझ्यात राही, वाकून जाई
तशीच ओझी वाही

वामनदादांची गीते बहुआयामी-बहुप्रसव आहेत. पण त्यातील आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची गीते ही प्रसरणशील आणि प्रस्फुटीत आहे. म्हणजे थोड्या आणि मोजक्या शब्दांत ते ज्या गीताच्या ओळी लिहितात त्यातून आशयाची अनेक कंपणे ध्वनीत होतात. वामनदादांच्या गीताचे हे सामर्थ्य स्थळ आहेच, पण सौंदर्यस्थळदेखील आहे. मोजक्या शब्दांचा ते आशयाचा अवकाश साकारतात. त्यांच्या गीतातून ठायी ठायी हा प्रत्यय येतो. अशा किती तरी ओळी आहेत, त्या आपले भावविश्व हादरवून सोडतात, अस्वस्थ करतात. त्यातील काही ओळी देत आहे.

उद्धरली कोटी कुळे। भीमा तुझ्या जन्मामुळे
भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयाच्या न्यारेच टोक असते.
दोष देऊ कुणा, माझ्यातल्या भीम मीच केला उणा

वामनदादाबद्दल आणि त्यांच्या गीताबद्दल खूप बोलता येईल. या निमित्ताने त्यांच्या गीताच्या काही पैलूला अधोरेखित केले आहे.

शेवटी वानमदादा हा माणसाचे गीत गाणारा कवी होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटनेमध्ये 'एक माणूस-एक मूल्य' हे जे जीवनमूल्य आणि धारणा दिली आहे त्यासाठी त्यांनी आपली प्रतिभा, कला समर्पित केली. माणसावरील अन्यायाविरूद्ध मग ते जाती, धर्म-पंथ वा लिंगाच्या आधारे असो, वामनदादांनी आपली लेखणी चालविली. त्यांनी तडजोड केली नाही. एका अर्थाने बाबासाहेब आंबेडकरांनी जो सामाजिक न्यायाचा अथक संघर्ष केला त्या संघर्षातील त्यातील वैचारिक- सांस्कृतिक क्षेत्रातील ते महानायक होते. त्यांची कविता आजही समकालीन वाटते. युग सुसंगत वाटते. कारण माणूस हा ताठ मानेने जगला पाहिजे, सन्मानाने जगला पाहिजे, स्वाभिमानाने जगला पाहिजे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांचा जागर वामनदादांनी आपल्या गीतांतून-जगण्यातून केला आहे. आज वामनदादांना त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विनम्रपणे, अभिमानाने अभिवादन करताना वाटते. आजचे जे वास्तव आहे ते पाहून वामनदादांनी पुन्हा लिहिले असते.

वाट फुलेंची सोडून
आंबेडकरांना सोडून
तुला चालताच इयाचं नाय
मनूचं अंगड टोपडं
तुला घालताच इयाचं न्हाय
किंवा..
कोण राखील आता भीमाचा मळा
वाळूनी चालला उभा हा जोंधळा

वामनदादा एका भूमिकेत जगले. संघर्षात जगले. आपण आजचे आंबेडकरी विचारांचे लेखक-कवी-कलावंत आजच्या सामाजिक-सांस्कृतिक वास्तवात कसे जगणार आहोत? वामनदादांची गीते हा महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचा अमोल ठेवा आणि दस्तऐवज आहे. वामनदादावर चळवळीतील अनेक नामवंत लेखक-समीक्षकांनी लिखाण केले. सुरूवातीच्या काळात वामनदादांच्या गीतांची छोटी-छोटी पुस्तके देखील प्रकाशित केली आहेत. पण सगळ्यात महत्त्वाचे आणि ऐतिहासिक काम माधवराव गायकवाड आणि प्रा.डॉ.सागर जाधव यांनी वामनदादांच्या गीतांचे जे पाच खंड प्रकाशित केले आहे ते होय. वामनदादांनी स्वत: म्हटले आहे, 'माधवराव नसते तर माझी कविता जनतेसमोर आली नसती.' या दोघांच्या कष्टाला, कर्तृत्वाला आणि त्यांच्यातील सामाजिक जाणिवेला वामनदादांच्या शताब्दीनिमित्ताने भरविण्यात आलेल्या साहित्य संमेलनाच्या वतीने सलाम करतो. वामनदादांच्या समग्र गीतांचे खंड प्रसिद्ध व्हावेत ही महाराष्ट्रातील तमाम लेखक कलावंतांची इच्छा आहे आणि त्यासाठी माझ्यासारखे चळवळीतील लेखक-कलावंत नक्कीच सक्रीय होतील असा माझा विश्वास आहे.

**अर्जुन डांगळे,** मुंबई
Mob. 9820503154

अशोक बंग

# शेतकी क्षेत्र : वेध (अव)दशेचा, शोध दिशेचा

‘समाज भूषण’ या महाराष्ट्र पातळीच्या पुरस्कारानं मला सन्मानित केले जात आहे, याचं मला विशेष महत्त्व वाटतं, हे मला स्पष्ट केलं पाहिजे. ‘भूषण’ या शब्दातील ‘भू’ हे मातीशी जुडलेले आहे. भूमीशी जुडलेल्या आणि शेतकी क्षेत्राची जाण असलेल्यांकडून हा पुरस्कार दिला जात आहे हे याचे महत्त्व आहे.

हा पुरस्कार, त्यासोबत एक लाख रुपये रक्कम आणि हे मानपत्र स्वीकारताना माझ्या अंतरीच्या भावना व विचार व्यक्त करू इच्छितो. कारण ते मुद्दे साऱ्या महाराष्ट्राने आणि देशाने संवेदनशीलतेने समजून घेणे अगत्याचे आहे. प्रत्येकाचा आणि सर्वांचा शेतीशी अतूट संबंध आहे - दररोज तीन वेळा, वर्षातले ३६५ दिवस ताटावर बसताना तो संबंध घट्ट होतो. काय भावना व विचार आहेत माझ्या मनात?

एक- शेतकी समाजाला वंदन! शेतकी समाजात समावेश आहे. शेतकरी बाया, माणसे, शेतमजूर, गावातले कारागीर, कामगार- थोडक्यात शेतीवर राबणारे सर्व घटक, शिवाय शेतीमधले प्रयोगवीर, सत्य उलगडून दाखवणारे व नवी तंत्रे शोधणारे वैज्ञानिक, तंत्रज्ञ, नेतृत्व देणारे नेते, दिशादर्शक मंडळी, इत्यादी...

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा १९५० मध्ये देशाचे खाद्यान्न उत्पादन पाच कोटी टन होते, ते शेतकी क्षेत्राने आता या वर्षाला ३१ कोटी टनांच्याही वर नेऊन पोहोचवले (संदर्भ १).

१४० कोटींजवळ आलेल्या लोकसंख्येचे पोट भरणारे हे अन्नदाते असणाऱ्या या क्षेत्राला वंदन! १४० कोटींना दिवसांतून तीन वेळ, वर्षातले ३६५ दिवस, वर्षानुवर्षे. आणि ही जबाबदारी आपल्या खांद्यावर वाहणारे देशभक्त आहेत अन्नसुरक्षा आघाडीचे सैनिक- शेतकरी, शेतमजूर बाया-माणसे. आणि ज्या क्षेत्रात ते हे अतुल्य देशभक्तीचे काम करतात ते आहे शेतकी क्षेत्र.

सूर्यापासून येणाऱ्या प्रकाश ऊर्जेला वापरून जिथे जिथे हिरवे आहे व हिरवे शेतकी क्षेत्राने वाढवले आहे तिथे सर्वत्र पाण्याचे फोटोलिसिस करून, म्हणजे पाण्याचा अणू $H_2O$ मधील हायड्रोजन आणि ऑक्सिजन वेगळे करून व हवेतील कर्बवायू $CO_2$ त्यात मिसळून सजीव सृष्टीला वापरण्याजोग्या ऊर्जेचा मूल पदार्थ ग्लुकोज तयार करण्याचे

आप्पासाहेब सा. रे. पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ २०१५ पासून शेती, सहकार, शिक्षण, समाजकार्य इत्यादी क्षेत्रांत विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला समाजभूषण पुरस्कार प्रदान केला जातो. २०२० चा पुरस्कार अशोक बंग यांना तर २०२१ चा पुरस्कार शरद पवार यांना देण्यासाठी, २ एप्रिल २०२२ रोजी, श्री दत्त सहकारी साखर कारखाना, शिरोळ, जि.कोल्हापूर येथे एक भव्य समारंभ आयोजित केला होता. सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते व महाराष्ट्राचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली हे पुरस्कार प्रदान केले गेले. त्यावेळी पुरस्कार स्वीकारल्यावर अशोक बंग यांनी केलेले हे भाषण आहे.

मूलभूत कार्य घडते. यासाठी हातभार लावून मोलाची सर्जनशील कर्तबगारी करणारे, सृष्टीत जैवभार निर्मितीस भारी योगदान देणारे हे शेतकी क्षेत्र. या क्षेत्रातील मंडळींना वंदन!

अभिनंदनसुद्धा करायचे आहे, कोरोनाच्या महाअरिष्टात देशाचा आर्थिक विकास दर (ग्रोथ रेट) – २३ असा रसातळाला काही काळ पोहोचला असताना, देशाला कडेवर उचलून कोलमडण्यापासून वाचवणारे आणि + ३ (अधिक तीन) च्या विकासदराचे ऑक्सिजन अर्थचक्राला देणारे ते हेच शेतकी क्षेत्र.

अभिवादनही करायला हवे. रामायणातील सीता गर्भार असताना तिला पुन्हा वनवासात पाठवण्याचा निर्णय रामराजाने घेतला. तेव्हा त्या विराट राज्यात फक्त १० फुटांची साधी खोलीही सीतेला रामरायाने देऊ केली नाही. ज्या सीतेने राज्यमहाल सोडून त्यापूर्वी रामाच्या वनवासात रामाला साथ दिली त्या सीतेच्या नावाने संपत्ती म्हणून एवढीशी कायदेशीर जागाही रामराज्यात नव्हती. जे रामराजाला शक्य झाले नाही ते क्रांतिकारी काम इतिहासात पहिल्यांदा शेतकऱ्यांनी करून दाखवले. कोणते ते काम? क्रांतदर्शी शरद जोशींच्या नेतृत्वात 'घामाला दामाची' न्याय्य मागणी करताना, आपण स्वतः शेतकऱ्यांनी कुणावरही अन्याय करता कामा नये म्हणून शेतात आणि घरात आपल्या सोबत राबणाऱ्या घरच्या कारभारणीचे नाव जमिनीच्या मालकीपत्रावर (सातबारावर) नोंदवून तिला कायदेशीर हक्काचा न्याय मिळवून दिला. आणि हे अभूतपूर्व काम शे-दोनशे शेतकऱ्यांनी नव्हे, लाखभर शेतकऱ्यांनी, हजाराच्या वर गावांमध्ये करून दाखवले. क्रांतीचे शिवधनुष्य पेलून दाखवले. शरद जोशींच्याच नेतृत्वात त्याच काळात पुढे राजकीय नेतृत्वातही महिलांना सहभागी करून घेण्याकरिता निवडणुकीत महाराष्ट्रभर सर्व जागांवर महिला उमेदवार उभे करून अर्थचक्र-परिवर्तनासोबतच राजकीय सत्ताचक्र परिवर्तनाची अभूतपूर्व नवक्रांती करून दाखवणारे, तेही हे कृषिक्षेत्रच. यासाठी अभिवादन! वंदन, अभिनंदन, अभिवादन!

अशा या महत्त्वाच्या आणि दिव्यत्वाची कामे करणाऱ्या शेतीक्षेत्राला भेडसावणाऱ्या अडचणी आणि आव्हानांमुळे त्यांच्या धडधडणाऱ्या हृदयाचे स्पंदन समजून साऱ्या देशाचे सहस्पंदन घडले पाहिजे.

**सद्य:स्थिती व दशा (की अवदशा?)**

धडकी भरणारी अशी काय आहे शेतकी क्षेत्राची धडधड? शेतकी क्षेत्राची अवदशा झाली आहे आणि हलाखीची स्थिती आहे. अहोरात्र राबवणारे, उन्हापावसांत तुडवले जाणारे, उद्योजकता व कौशल्ये अंगी असलेले, कमी साधनांतही प्रचंड बुद्धिमत्तेने जुळवणूक करणारे हे क्षेत्र बाहेरील दोन जुलुमांनी ग्रस्त, त्रस्त आणि उद्ध्वस्त होत आहे.

एक- सुलतानी जुलूम. सरकारी धोरणांद्वारे सरकारचा जुलूम आणि बाजाराचा जुलूम. शेतकऱ्यांच्या शेतमालाची लुटीची चटक लागलेल्या आणि फुकटच्या स्वस्ताईला चटावले गेलेल्या बाजारातील ग्राहकांचा, उपभोक्त्यांचा जुलूम. असा हा सुलतानी जुलूम शेतकी क्षेत्राला सातत्याने सावत्र वागणूक देतो.

त्याचा पहिला पुरावा : देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) शेतकी क्षेत्राला मिळणारा अन्याय्य अल्प वाटा. स्वातंत्र्य मिळाले त्यादरम्यान सुरुवातीला तो वाटा ५२ टक्के होता, आता तो १५-१६ टक्क्यांच्या जवळपास असतो (संदर्भ-२). देशातले अर्धे-अधिक लोक शेतीसाठी खपतात ५० टक्क्यांच्या वर, पण त्यांच्या घामाचे व उद्योजकतेचे दाम केले जाते फक्त १५टक्के इतके तुटपुंजे.

दुसरा पुरावा : देशाच्या नियोजनात (planned economy) शेतकी क्षेत्राला दिली जाणारी तरतूद १९५१ ते १९५६ या पहिल्या पंचवार्षिक योजनेत १५टक्के होती, ती आता ३ ते ५टक्के इतकी खाली घसरलेली आहे. म्हणजे पाच पट घसरण (संदर्भ-३).

तिसरा पुरावा : अर्थव्यवस्थेतील बँकांचे नॉन परफॉरमिंग असेट्स (NPA) निकाली काढण्यासाठी 'गरजू व नाडलेल्यांना' सवलत म्हणून कर्जमाफी देताना २०१८ पर्यंतच्या गेल्या चार वर्षांत काय घडले (सरकारने काय घडवले?)

शेतीक्षेत्राला कर्जमाफीचा खुळखुळा : प्रसार माध्यमांत आलेल्या बातमीप्रमाणे सरकारचेच तत्कालीन वित्त राज्यमंत्री यांनी संसदेत दिलेल्या कबुलीप्रमाणे वर्ष २०१८ पूर्वीच्या चार वर्षांत २१ सरकारी बँकांनी जवळपास तीन लाख कोटी रुपयांची (म्हणजे तीन वर बारा शून्ये) 'थकीत' कर्जे माफ केलीत (संदर्भ-४). लक्षात घेण्याचे असे की कोविड संकट येण्याच्या आधीचा हा काळ. ही माफी मुख्यतः व्यापारी क्षेत्राला २८ टक्के आणि उद्योग क्षेत्राला ६५




टक्के  बहाल केली आहे. त्यात बहुतेक प्रत्येक एकेक ‘दुर्बळ’ कर्जदार १०० कोटी रुपयांच्या वर आहेत! सरकारची ही प्रवृत्ती व धोरणे वर्षागणिक वाढत आहेत, आणि हे आकडे त्यानंतर फुगतच आहेत. नोंद घेण्याची बाब अशी की, अन्नदाता कृषिक्षेत्राला माफीचे प्रमाण फक्त ७ टक्के इतके नाममात्र आहे. पण हलकल्लोळ आणि बोंब मात्र शेतीक्षेत्राच्या नावे!

ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोशिएशनचे सहसचिव तुळजापूरकर यांनी आरोप केला आहे की, या क्षेत्रांना ही बहाली करण्यासाठी सरकारने तेव्हाच्या गेल्या चार वर्षांत तीन लाख कोटींच्यावर भांडवल बँकांना दिले. म्हणजे सर्वसामान्यांनी दिलेल्या करातून आणि ग्राहकांवर बँकांनी वारेमाप शुल्क आकारून आणि सामान्यांच्या बचत खात्याच्या व्याजदराला कात्री लावून सर्वसामान्यांच्या खिशातून काढण्याची (खिसेकापूची) कामगिरी केली.

एका दाण्यापासून हजार दाणे उत्पादन करणारे एकच असे हे खरेखुरे उत्पादनवाढीचे क्षेत्र आहे. देशाला प्रचुर सौर ऊर्जेचे वरदान आहे. दर चौरस फुटाला दररोज सरासरी बाराशे किलो कॅलरी सौर ऊर्जा एवढी प्रचंड देणगी या देशाला आहे. पण तरीही शेतकी क्षेत्र हलाखीत आहे. कारण वरील सर्व जुलुमांचा प्रचंड डोंगरही अन्नदात्यांना वाहावा लागतो आणि त्याखाली ते चिरडले जात आहेत.

**नाही दाम, नाही जाण, नाही सन्मान**

शेतकी क्षेत्रातील घामाला नाही दाम, शेतीक्षेत्रातील उद्योजकतेबाबत समाजाला नाही जाण आणि अन्नदात्याला नाही सन्मान. हातात भिकेचा वाडगा घेऊन आपल्याच मारेकऱ्यांच्या समोर खाली मान घालून तिष्ठत बसवले आहे शेती क्षेत्राला, दीन याचक म्हणून.

यामुळे शेतीक्षेत्राला दीनता आणि दैन्य यांचे ग्रहण कायमचे लागले. सर्व सरकारे, सर्व राजकीय पक्ष हे जवळपास सारखेच. शरद जोशींनी १९८०च्या प्रारंभी म्हटले होते, ‘शेतकऱ्यांचे मरण, हेच सरकारचे धोरण’. दुर्दैवाने आजही तत्त्वतः तेच धोरण आहे.

‘खंडीभर लुटून मूठभर सवलती देणारी’ सरकारी धोरणे राबवणारी नोकरशाही व कर्मचारीवर्ग यांचा जुलूमसुद्धा वरताण आहे. हे सर्व कमी की काय म्हणून, मधाची बोटे चाटवून चकव्यांना भुलवणारी राजकारणी मंडळी जोडीला कमी नाहीत. अजूनही, शेतमालाच्या उत्पादन खर्चाचा हिशोब व त्यावर आधारित शेतमालांचे किमान आधार मूल्य म्हणजे MSP ठरवताना काही खर्च सरकारे चलाखीने वगळतात. अनेक सरकारी संस्था, विद्यापीठे व संशोधन संस्था, स्वामिनाथन आयोग यांनी वेळोवेळी केलेल्या अभ्यासांचे निष्कर्ष आहेत की सरकार ठरवते त्यापेक्षा उत्पादन खर्च प्रत्यक्षात दीडपट तरी आहे. त्यावर ५० टक्के नफा शेतकऱ्याला मिळावा ही रास्त मागणी तर फार दूरची बात आहे. शेतीक्षेत्राच्या कामकऱ्यांनी प्रचंड संख्येत आपले म्हणणे निर्विवादपणे मांडले, सरकारच्या लाठ्या-काठ्या खाऊन अपंग झालेत, रक्त सांडले, जीव दिलेत. एवढे सर्व होऊनही आजही हमीभाव ठरवताना A-2 (म्हणजे फक्त नगदीने केलेले खर्च) व FL (म्हणजे नगदी न दिलेले- पण कुटुंबातील मंडळींचे श्रम) हेच खर्च फक्त धरावेत एवढी मर्यादित वाटचाल सरकारने केली. पण अजूनही अन्य अनेक छुपे खर्च व भक्कम खर्च धरून सर्वसमावेशक असा C-2 खर्च धरून रास्त आकडा मानण्यास सरकार तयार नाही. नियोजन आयोगाचे रमेश चंद यांनी लिहिले की हे इतर खर्च धरू नयेत. म्हणजे, पर्यायाने अन्नदाता क्षेत्राने देशाला स्वस्तात खाऊ घालावे व त्यासाठी आपले रक्त-मांस ओरबाडू द्यावे. खरे तर कर्जमाफीच्या

तात्पुरत्या दिखाऊ मलमपट्ट्यांची गरजच राहणार नाही, शेतमालांना खऱ्या संपूर्ण उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव (म्हणून आजच्यापेक्षा पुरेसा जास्त भाव) जाहीर होणे व तो खरोखर शेतकऱ्याच्या हाती पडण्याची पूर्ण तजवीज होण्याची गरज आहे. आपले उत्पादन बाजारात व्यापाऱ्याला विकायला दिल्यानंतर, व्यापाऱ्याकडून मालाच्या विक्रीची रकम शेतकऱ्याला मिळण्याऐवजी, शेतकऱ्यालाच 'उलटी पट्टी'ची वसुली येणारे एकमात्र क्षेत्र हे शेतकी क्षेत्र आहे. दैवाचा दुर्विलास नव्हे, हा आहे जुलुमाचा पाश.

याला म्हणतात आवळा देऊन कोहळा काढणे. चिमूटभर सूट आणि गाडीभर लूट.

एका साहेबाने एक गाय पाळली. गाईला हिरवा चारा लागे. त्याशिवाय दूध कशी देणार? वर्षभर हिरवे कुठून आणावे म्हणून हुशार साहेबाने एक चलाख युक्ती केली. गाईच्या डोळ्यांवर हिरवा चश्मा चढवून दिला. आता गाईला जिकडे-तिकडे सर्व हिरवेगार दिसे. बघायला हिरवे पण तोंडात घ्यावे तर कोरडे व सुके. अशी स्थिती आहे शेतकीक्षेत्राची. देशामधे इतर क्षेत्रांमधील लोकांची भरभराट व विकास होतो, सेन्सेक्स वर चढतो, जीडीपी वर जातो, भक्कम पगारवाढी व भत्ते नियमितपणे हक्क म्हणून मिळत असतात, इतर क्षेत्रांना देशांतर्गत कमाईचा लायन्स शेअर मिळतो, पण देशाच्या अन्न-सुरक्षा सैनिक देशभक्तांचे हे शेतकी क्षेत्र इतके पराक्रम व कर्तबगारी करत असूनही सुक्यावर नि कोरड्यावर.

**दुसरा जुलूम, आसमानी जुलूम :**

आसमानी जुलूम आधीपासून होता. पण, जागतिक हवामान बदलाच्या संकटामुळे हा जुलूम आता कैक पटींनी वाढला आणि सतत वाढतच जात आहे. फक्त तापमान वाढणे एवढेच हे मर्यादित नसून गरमी-थंडी, पाऊसमान, पावसाचे वाटप, अतिरेकी हवामान, वातावरणातील ओलावा व आर्द्रता, गारपीट, वादळ-तुफान, विजा या सर्वांची उग्रता तीव्र होत आहे आणि शिवाय, वारंवारता, अनियमितता, विस्तार क्षेत्र व प्रदीर्घ कालिकता हे सर्व सतत वाढीवर आहेत. या सर्वांचा मारा शेतीक्षेत्रावर सर्वांत जास्त होतो. भारत सरकारच्याच हवामान खात्याने (आय.एम.डी.) केलेल्या अभ्यासाप्रमाणे विसाव्या शतकात १९०० ते १९९९ या काळातील १०० वर्षांत ३२ वर्षे शेतीला तीव्र प्रतिकूल हवामान होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मीटिऑरॉलॉजी (IITM) यांचे निष्कर्ष आहेत की, स्वातंत्र्य मिळाल्यापासून वर्ष २०११ पावेतोच्या जवळपास ६० वर्षे कालखंडपैकी गेल्या तीस वर्षांत भारत देशात पीक हंगामात तीव्र अवर्षण २७ टक्के वाढले आणि तीव्र अतिवृष्टीच्या घटनांचे प्रमाण १४ टक्के वर्षांना वाढले, असे हे दोन्ही मिळून ४१ टक्के वर्षे म्हणजे दर तीन वर्षांत एक वर्ष तीव्र अस्मानी जुलुमाखाली शेतीक्षेत्र चिरडले जाते (संदर्भ-५). आणि आजच्या घडीला कोरडा व ओला दुष्काळ यांची वारंवारता आता भारत सरकारच्या कृषी आयुक्तांच्या कबुलीप्रमाणे महाराष्ट्रासह अनेक प्रांतांत दीडपट वाढली आहे. म्हणजे निष्कर्ष असा की आता जवळपास ५० टक्के वर्षे शेतीला प्रतिकूल हवामानाची असतात - दर दोन वर्षांतले दर एक वर्ष. असा हा आसमानी जुलूम!

परिणामी, दुष्काळात तेरावा महिना म्हणून, अजैविक ताणांच्या माऱ्याशिवाय जोडीला अनेक प्रकारचे जैविक ताण वाढले - विषाणू, बॅक्टेरिया, बुरशी, सूत्रकृमी, किडी, तणे, जंगली जनावरे व पक्षी या सर्वांची तापदायी अष्टग्रही. त्यांचे सर्वांचे नवे-नवे प्रकार व तेही वाढत्या क्षेत्रावर.

**दिशा काय असावी?**

तर शेतकी क्षेत्राची वरीलप्रमाणे अशी ही दशा. खरे तर दुर्दशा किंवा अवदशा. यावर उपाय व दिशा काय? मी या विषयांबाबत मुख्य योगदान देणाऱ्या माझ्या प्रमुख सहकारी निरंजना मारू-बंग, इतर सहकारी, तसेच गावोगावचे महाराष्ट्रातील व देशातील सहयोगी शेतकरी बायामाणसे अशा या सर्वांच्या सहचिंतनातून, अभ्यासातून व सहक्रियेतून गेल्या वीस वर्षांच्या सातत्याच्या कामातून गवसलेले निष्कर्ष असे आहेत.

एक : राज्यसत्तेच्या व अर्थसत्तेच्या धोरणांमुळे चालणाऱ्या अर्थचक्राला न्यायाच्या दिशेने फिरवणे निकडीचे आहे. त्यासाठी 'शेतकरी तितुका एक' या भावनेने सर्व भेद बाजूला ठेवून जाती, धर्म, पक्ष, स्त्री-पुरुष, लहानमोठा, जिरायत-ओलीत, ऊसवाला-कापूसवाला-सर्वांनी बळकट एकजूट करणे गरजेचे आहे. एकजुटीने क्रांतिकारी कामे आधी केली आहेतच ना! 'भीक नको, हवे घामाचे दाम' या मूलगामी घोषणेखाली यापूर्वी हे घडलेले आहे. आणि गेल्या वर्षी दिल्लीभोवती हे वर्षभर घडले.

राज्यसत्तेच्या धोरणांवर आणि अंमलबजावणीवर अनुकूल प्रभाव व बदल गरजेचे आहेत. तात्कालिक दिखाऊ आतिशबाजीऐवजी स्थायी, सातत्याचे मूलभूत परिणामकारक धोरणात्मक बदल निकडीचे आहेत.

दोन : बांधाच्या बाहेरील धोरण-बदलांशिवाय बांधाच्या आत शेतातील शेतीची तंत्रे, पद्धती इत्यादींमध्ये योग्य ते बदलसुद्धा व्हावेत. जागतिक संयुक्त राष्ट्र (यू.एन.) व अन्न व कृषिसंघटन (एफ.ए.ओ.) हे आवर्जून म्हणताहेत की, (त्यांच्याच नेमक्या शब्दांत) 'गुड प्रॅक्टिसेस' म्हणजे चांगल्या पद्धतींचा अवलंब व्हावा, ज्यातून रासायनिक घटकांचा वापर कृषिक्षेत्रात कमी करावा, कारण त्यांच्यामुळे मातीची गुणवत्ता, मानवासकट इतर सर्व सजीवांचे प्रजनन व निरोगी विकास हे तिन्ही समस्याग्रस्त होऊन रोगप्रतिकार व्यवस्था (इम्यून सिस्टिम) ला हानी होत आहे आणि कॅन्सरही फोफावतो आहे. तसेच एकल व्यापारी पिकांऐवजी बहुविध पिके, शाश्वतता जोपासणारी आणि शेती ज्यांच्यावर आधारलेली आहे त्या नैसर्गिक संसाधनांचे जतन व संवर्धन करणारी, पर्यावरणीय शेती पद्धतींची निकड आहे. बहुविध पिकांचा परस्पर सहचारी मैत्रीपूर्ण समुदाय असणे अशी स्वावलंबी शेती करावी, आणि प्रचलित रासायनिक शेतीच्या नगदी पिकाच्या एकल पीक पद्धतीऐवजी दोन-तीन तरी नगदी पिके यांचीही गुंफण त्यातच करावी.

या अशा दिशेने व तंत्राने शेती केल्यास ती शेतजमिनीला बळकटी देते, पाळीव जनावरांना पौष्टिक चाऱ्याची बळकटी मिळते व कुटुंबाला पोषणसुरक्षेची बळकटी देते. दोन-चार पिके हातची गेलीत तरी नापिकी कधीच होत नाही. इतर पिकांमुळे भरपाई होते. शेतीला विमा-कवच मिळते. पीक विमा शेतकऱ्याच्या आपल्याच हाती. अशी शेती निसर्गस्नेही व पर्यावरणपोषक ठरते. वरील सर्व बाबी जिरायत शेतीत आणि ओलिताच्या शेतीत – अशा दोन्ही शेतीत आमच्या कामांमधून सिद्ध झाल्या आहेत. आपली नगदी पिके अजिबात कमी न करता, त्यांच्या सोबत आंतरपिके व मिश्र पिके या पद्धतीने इतर खाद्यान्न पिके घेतली जातात. हे शास्त्रीय प्रयोगांनी व संपूर्ण आकडेवारीसह पंधरा वर्षे सिद्ध करून दाखवले आहे. प्रचलित सरासरी रासायनिक शेतीच्या तुलनेत उत्पादनातही कमी न होता बरोबरीचे किंवा सव्वापटीपर्यंत वाढ होते व कमाई (नफा) मध्येही सव्वापट ते दीडपट इतकी वाढ होते. या दोन्ही पैलूंच्या बाबतीत सातत्याने स्थिरता, शाश्वतता मिळते.

याचा अर्थ असा नव्हे की पारंपरिक शेतीचा पाढा वाचायचा आहे, किंवा 'हे नको, ते नको' अशा नकाराघंटांच्या निषेधात्मक शेतीचा पुरस्कार करायचा आहे. खरे तर, अंतर्गत स्थानिक घटकांची समृद्ध निर्मिती करून केली जाणारी वैज्ञानिक 'अति आधुनिक' अशी स्वावलंबी शेती पद्धती करायची आहे. अल्प बाह्य निविष्ठांवर शाश्वत शेती (Low External Input Sustainable Agriculture - LEISA) व्हावी व त्याहीपुढे सकारात्मक कृतींनी समृद्ध (High Internal Regeneration AgriC - 'HIRA' ) ही दिशा हवी.

भारतीय कृषी अनुसंधान संस्थान (IARI) दिल्लीमध्ये मी असताना हरित क्रांतीचे रोपटे रुजून जोमाने वाढत होते. तेव्हा मला वाटले की ही हरित क्रांती आता सदाहरित क्रांती (Evergreen Revolution) होण्याची गरज आहे. यामुळे ते ठिकाण सोडून या दिशेने शोध, बोध व प्रसार करण्याकरिता या कामांकडे मी वळलो. त्या काही कामांचे हे वरील निष्कर्ष.

आणि हे व्यावहारिक आहे, शक्य आहे, किफायतशीर म्हणजे फायद्याचे व बळकटी देणारे आहे; हे सिद्ध करून दाखवले आहे. अन्नदात्याच्या शेताच्या बाहेरील धोरण बदलणे गरजेचे तर आहेच आहे, पण शिवाय शेताच्या बांधांच्या आत कशी शेतीतंत्रे वापरायची हे शेतीक्षेत्रालाही करावे लागणारे काम आहे. शेतकरी ते करतीलही. त्यासाठी तशी अनुकूल व प्रोत्साहक धोरणे, योजना व तरतुदी सरकारने केल्यास तत्काळ शेतकरी किती भरघोस बदल करतात हे पुराव्यासकट या देशाने अनेक वेळा बघितलेले आहे. प्रचंड प्रमाणावर डाळींची आयात करणाऱ्या भारत देशात धोरणांची अनुकूलता होताच एका वर्षातच शेतकऱ्यांनी तूर डाळीचे उत्पादन भरघोस वाढवून दाखवले. म्हणूनच सर्वदेशीय अशी कृषि जागतिक संघटना (FAO) ताकीद देते की हे साधण्याकरिता शेतकऱ्यांसाठी जास्त पुरेसे प्रेरणादायी व बळकटी देणारी धोरणे हवी आहेत, आणि सर्वसमावेशक दृष्टी व कृती गरजेची आहे.

तीन : कुटुंबासाठी वैविध्यपूर्ण खाद्यान्नाचे स्वावलंबन – शेतकरी कुटुंब शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठांसाठी (म्हणजे बियाणे, खते, कीडनाशके, तणनाशके, संजीवके, डिझेल इ.) पिशवी घेऊन बाजारात जातो. भरीला, कुटुंबाच्या

खाद्यान्न गरजांसाठी दुसऱ्यांदा पुन्हा खरेदी करण्यासाठी पिशवी घेऊन बाजारातच जातो. जात्याच्या या दोन दगडांमध्ये भरडला जातो, शोषण होते. म्हणून कुटुंबासाठी वैविध्यपूर्ण खाद्यान्नांची पिके शेती हाताशी असलेल्यांनी स्वतःच्या शेतीतच पिकवावीत. विविध धान्ये, डाळी, तेलबिया, कंद, मसाले पिके, भाज्या, व शक्य असल्यास काही फळे- अशी ४०-४५ पर्यंत पीकसंख्या शेतात पिकवून घरी खायला वापरावी. वैविध्याने संपन्न वैभवशाली खाद्य-पोषण संपन्नतेने यामध्ये शेतकरी कुटुंब स्वावलंबी बनेल, बळकट बनेल, बाजाराद्वारे होणारे शोषण कमी होईल.

अशा प्रकारे २०-४० पिके संपूर्ण शेतभर विखरून न करता शेताच्या एका काही भागात अर्धा-एक एकरमधे वेगळा तुकड्यात करता येतो. इतर शेती नेहमीच्या पद्धतीने जशी करायची असेल तशी करण्यास अडचण होत नाही. थोडक्यात, सर्व शेतकऱ्यांना हे करण्यासारखे व व्यावहारिक आहे. माझ्या प्रमुख सहकारी निरंजना मारू यांच्या पुढाकाराने आलेली ही संकल्पना, दिशा व हे तंत्र आमच्या शेतावर तर आम्ही पंधरा वर्षांपासून अमलात आणत आहोतच, शिवाय अनेक शेतकरी तसे करीत आहेत.

काही वर्षांपूर्वी हरियाणाचे कृषिमंत्री व मुख्यमंत्री एका शेतकरी संमेलनात म्हणाले होते- ''आम्ही भारताच्या अन्नधान्याचे कोठार आहोत, पण आम्ही स्वतःच्या खाण्यासाठी आमच्या प्रांतात पिकवलेले वापरत नाही. कारण आम्हांला जाणीव आहे की किती जास्त रासायनिक व विषारी निविष्ठांचा वापर आम्ही करीत असतो. म्हणून आमच्या खाण्यासाठी आम्ही गहू मध्य प्रदेशात पिकवलेला घेतो. कारण तेथे तसे तेवढे रसायन वापरलेले नसते.''

चार : शेतीबाबत धोरणे व तंत्रे यासाठी मार्गदर्शक पंचसूत्री बनविली आहे, तिचा अवलंब झाला पाहिजे - उत्पादकता (productivity), खर्च वजा जाता कमाई देणारी (profitability), स्थिरता (stability), शाश्वतता (sustainability), व जीवनमानाचा दर्जा (Quality of life standard of living) यांची पुरेशी हमी देईल, निदान या दिशेकडे वाटचाल करेल अशी पंचसूत्री धोरणे हवीत व शेतीतंत्रे हवीत. या खऱ्या पाच कसोट्या.

सरते शेवटी, एक मूलभूत मुद्दा विचारात घ्यायला हवा. प्रत्येकाच्या, सर्वांच्या जीवनाच्या गरजा व सोयी पूर्ण झाल्या पाहिजेत हे खरेच, किंबहुना ही पायाभूत, प्राथमिक निर्विवाद अट आहे, असली पाहिजे. विशेषत: शेतकी समाजाला हे लाभावे हे पाहणे जास्तच अगत्याचे आहे. त्यापुढे विचाराचा मुद्दा, स्वतःला विचारण्याचा मुद्दा असा की जीवनाचे सार्थक, समाधान, आनंद, तृप्ती हेही सर्वोपरी आहेत. केवळ भौतिक वा वस्तुगत वाढ होत जाणे, फुगत जाणे, सुजत जाणे, आर्थिक ग्रोथ अमर्यादपणे होत जाणे हेच सर्वस्व व प्रगती वा विकास आहे काय? हीच विकासाची महत्त्वाची कसोटी आहे काय? आंधळ्या शर्यतीचे पटाचे बैल किंवा निव्वळ आर्थिक वृध्दीचे ओझे वाहणारे गाढव बनायचे आहे का?

शेतकी समाज हा खऱ्या अर्थाने साऱ्या व्यवस्थेसाठी बळकटीचा पायाभूत स्रोत आहे. एका दाण्याचे हजार दाणे करणारे, एका पेराचे शंभर पेर बनवणारे असे हे मूळ शक्तिस्थान आहे. आपल्या देशात सूर्यशक्तीचे वरदान आहे. दर एक चौरस फुटावर बाराशे किलो कॅलरी इतकी प्रचंड सौर ऊर्जा दर दिवशी मिळते. तिला वापरण्याजोगी बनवण्याचे सर्जनशील महत्कार्य करणारे निर्मितीचे दिव्य क्षेत्र आहे हे शेतीक्षेत्र. त्याला दाम आणि सन्मान मिळो! यातच सर्वांचे, इतर सर्वांचेही हित आहे.

**संदर्भ :**


१. कृषि व कृषक कल्याण मंत्रालय, भारत सरकार. फेब्रु. २०२२.

२. सांख्यिकी व क्रियान्वयन मंत्रालय, SPI, भारत सरकार. विविध वर्षे.

३. Indiabudget.gov.in.ras.org.in/ expenditure-on-the-rural-economy-in-indias-buget. Respective years.

४. The Indian Express. 1 Oct. 2018. Page 1.

५. Assessment of Climate Change over the Indian Region. 2020. IITM, Ministry of Earths Sciences, Govt. of India.



**अशोक बंग**, वर्धा

Mob. 9822228710

chetanavikaswda@gmail.com

मानवंदना

मकरंद ग. दीक्षित

# आपणांबाहेरी । न लगे ठाव धुंडावा

जन्माला आलेला प्रत्येक माणूस आणि त्याच्या आयुष्याचा पट वेगळा असतो. माणसाच्या आयुष्यात अनेक चढउतार, वेगवेगळी वळणे येत असतात. तसेच जन्मदात्या आईपासून ते सरणावर चढवणाऱ्या माणसापर्यंत त्याच्या आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळी माणसे येत असतात. आपले नातेवाईक-आप्तस्वकीय यांचे असणे जन्माधिष्ठित असते, नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने येणारी माणसे आणि त्यांच्याशी असलेले संबंध औपचारिक असतात, मित्रांचे आयुष्यातील स्थान वेगळेच असते, काही माणसे आपल्या आयुष्यात असतात; पण आपण त्यांच्या आयुष्यात नसतो. उदा; आवडता अभिनेता/अभिनेत्री, कलावंत, लेखक, राजकीय-सामाजिक आदर्श इत्यादी, पण आपला त्यांच्याशी अमूर्त/आत्मीय पातळीवर संवाद चालू असतो. पण काही माणसे एखद्या सामान्य वाटाव्या अशा घटनेने किंवा योगायोगाने आयुष्यात येतात आणि आपलं आयुष्य आपल्या नकळत समृद्ध करून टाकतात. अशी माणसे आपल्या आयुष्यात असणे हा परम भाग्याचा आणि आपल्या वर्तुळातील इतरांसाठी कुतूहलमिश्रित आदराचा विषय असतो.

प्रचंड बुद्धिमत्ता, बहुआयामी व्यासंग, पराकोटीची मूल्यनिष्ठा, कमालीची प्रसिद्धिपराङ्मुखता, मितभाषीपणा आणि 'माणसा'विषयी असलेली अविरत तळमळ या सर्व गुणांचा समुच्चय म्हणजे जेष्ठ साहित्यिक, समाज संशोधक मिलिंद बोकील.

'शाळा' कादंबरीच्या निमित्ताने मी प्रथम मिलिंद बोकील यांच्या आयुष्यात शिरलो आणि नंतर आमचा ऋणानुबंध इतका जुळला की त्यांनी माझ्या आयुष्याचा एक कोपरा व्यापून ठेवला आहे. वय, अनुभव, समज या सर्वच बाबतींत मी त्यांच्या समोर न्यून असल्याने त्यांना माझ्याकडून मिळण्यासारखे काही नव्हतेच; त्यामुळे त्यांचा माझ्याबद्दलचा निर्व्याज जिव्हाळा आणि मी त्यांचा मनापासून करत असलेला आदर याशिवाय या 'एका तपा'च्या ऋणानुबंधाला दुसरा आयाम नाही.

ललित, वैचारिक, सामाजिक संशोधन, व्यक्तिचित्रण, समाजचित्रण, संपादन, सहलेखन अशा सर्व 'ढंगां'च्या साहित्यात सकस निर्मिती करणारे त्यांच्यासारखे साहित्यिक

या लेखाचे आता औचित्य काय असा प्रश्न पडू शकतो कारण आपण उत्सवप्रिय आहोत. त्यामुळे वयाची पन्नास वर्षे झाली की आपण 'सुवर्ण महोत्सव' म्हणतो, साठीला 'हीरक महोत्सव' म्हणतो, पंचाहत्तरीला 'अमृत महोत्सव' म्हणतो. मिलिंदसर येत्या १ मे रोजी वयाची ६२ वर्षे पूर्ण करतील म्हणजेच रूढ अर्थाने हे उत्सवी वर्ष नाही. पण त्यांचे हीरक महोत्सवी वर्ष कोरोनाने झाकोळले होते आणि तेव्हा कोणीच उत्सवाच्या मानसिकतेत नव्हते. पण आता 'न्यू नॉर्मल' सुरू झाल्यावर अनेक क्षेत्रांतील तज्ज्ञ व जाणत्या व्यक्ती प्रतिपादन करत आहेत की आयुष्यातील मागची दोन वर्षे वजा करा. त्या न्यायाने हे वर्ष मिलिंदसरांचे 'हीरक महोत्सवी' वर्ष ठरते.

फारच थोडे आहेत. पुन्हा केवळ साहित्यिक अशी त्यांची ओळखसुद्धा अपूर्णच ठरते. जीवनाला विविध अंगांनी उत्स्फूर्तपणे व उत्कटपणे कसे भिडावे हे त्यांच्याकडून शिकावे.

त्यांनी इलेक्ट्रॉनिक व रेडियो इंजिनिअरिंगचा डिप्लोमा केलेला आहे, मुंबई विद्यापीठातून समाजशास्त्रात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे, पुणे विद्यापीठातून पीएचडी केलेली आहे, होमियोपॅथी मेडिसिनचा डिप्लोमा केलेला आहे आणि एखाद्या रुग्णावर उपचार करता येतील इतपत प्रावीण्य त्यात मिळवलेले आहे. हे बहुतांश लोकांना माहीत असण्याची शक्यता कमीच; कारण आत्मप्रौढी, आत्मस्तुती यांपासून हा माणूस कोसो दूर आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनादिनी आणि स्थापनावर्षात त्यांचा जन्म झाला. १९७५-१९७७ हा आणीबाणीचा आणि पर्यायाने भारतीय राजकारण समाजकारणातील उलथापालथ व घुसळण यांचा काळ. हा मिलिंद सरांच्या पौगंडावस्थेचा काळ. त्यामुळे त्यांचे जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती आंदोलनात ओढले जाणे आणि त्यांनी 'छात्र युवा संघर्ष वाहिनी'चे कार्य करणे स्वाभाविक होते. आणीबाणीनंतरच्या 'जनता सरकार'मुळे अनेकांचा भ्रमनिरास झाला. त्यामुळे बरेच लोक पुन्हा आपापल्या कामधंद्याला लागले, काहींनी पुन्हा काँग्रेसशरण होण्यात धन्यता मानली, काहींना जनसंघाची उजव्या राजकारणाची वाट हितकारक वाटली, काहींनी डाव्या पक्षांची वाट धरली, काहींनी समाजवादाची कास धरून समाजकार्यात/समाजसेवेला स्वत:ला वाहून घेतले, काहींनी 'Das Capital' ला प्रमाण मानून क्रांतीची वाट धरली. फारच थोड्या लोकांनी भ्रमनिरास करून न घेता आणि कोणताही 'इझम' कवटाळून न घेता मूलभूत संशोधन, वस्तुनिष्ठ अभ्यास, परस्पर सहकार्य, सकारात्मक दृष्टिकोन आणि प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन, लोकसहभागातून लोकशाही मूल्यांना/प्रक्रियेला अधिक तावून सुलाखून सर्वसमावेशक विकासाचा मार्ग पत्करला; अशा 'जाणत्या जनां'चे मिलिंद बोकील हे अग्रणी प्रतिनिधी.

तर वयाच्या पौगंडावस्थेतच 'जाणत्या' झालेल्या मिलिंद सरांनी रुळलेली वाट सोडली आणि वरील, त्या वेळी अवघड असलेली वाट निवडली. लक्षात घ्या की तो १९७७ नंतरचा काळ आहे आणि त्या काळी ही वाट पकडणे म्हणजे जीवनातील अनिश्चितता स्वीकारणे. आज सामाजिक कार्याला वलय आहे, या 'फील्ड'मधील नोकऱ्यांसाठी job description देताना तुमचा 'सीटीसी', भत्ते, सुट्ट्या, हुद्दा असे सर्व लिहिलेले असते. त्या काळी जेवणखाण आणि राहण्याची व्यवस्था इतके जरी 'कमिट' केले तरी 'सोन्याहून पिवळे' असे. (प्रस्तुत लेखकाने मिलिंद सरांच्या वडिलांना ''तुम्हांला त्यांचा हा निर्णय पचवायला जड गेला असेल ना? तुम्ही विरोध केला का?'' असा प्रश्न विचारला तेव्हा त्यांचे वडील म्हणाले की, आम्ही मध्यम वर्गीय होतो त्यामुळे आमचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यामुळे त्याला समजावून पाहिले. पण तो त्याच्या निर्णयावर ठाम आहे हे कळल्यावर आम्ही विरोध केला नाही. कारण आमचा त्याच्या क्षमतेवर विश्वास होता.) या धारणेतूनच प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या दृष्टीने प्रथम युसुफ मेहेर अली सेंटर आणि नगर जिल्ह्यात त्यांनी कार्य केले आणि त्या अनुभवाला मुंबई व पुणे विद्यापीठांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमातून पुस्तकी ज्ञानाची व संशोधनांची जोड दिली.

आज जवळपास ३५ वर्षे ते विविध व्यक्तिसमूहांवर, त्यांच्या प्रश्नांवर मूलभूत संशोधन आणि दिशादर्शन करत आहेत. त्यांच्या संशोधनाचा आवाका लातूरमधील भूकंपामुळे उद्‌ध्वस्त झालेल्या महिला ते नेदरलँड्‌समधील स्वखुशीने देहविक्री करणाऱ्या महिला इतका प्रचंड आहे. त्यांचा 'कातकरी : विकास की विस्थापन' हा ग्रंथ कोकणातील कातकरी समाजाच्या मानववंशशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने मूलभूत दस्तऐवज मानला जातो. ज्यांना महाराष्ट्राच्या विविध व्यक्तिसमूहांपुढे ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत आणि त्यांच्या जीवनमरणाचा संघर्ष कसा सुरू आहे याचे वस्तुनिष्ठ आकलन करून घ्यायचे आहे त्यांनी मिलिंद सरांचे 'जनाचे अनुभव पुसता' हे पुस्तक वाचावे. त्यांच्या लेखनाची मौज अशी की त्यांचे संशोधनात्मक ग्रंथसुद्धा एखादी गोष्ट वाचावी तसे वाटतात. प्रवाही भाषा, सखोल अभ्यास, सोपी मांडणी आणि पूर्वग्रहांना दूर ठेवत वस्तुनिष्ठ विश्लेषण करताना ज्यांच्याबद्दल आपण लिहितोय त्यांच्याबद्दल असलेली आपुलकी हे त्यामागील गमक असावे. ''तुमच्या 'जनाचे अनुभव पुसता'चे वर्गीकरण संशोधनात्मक ग्रंथ असे न करता 'खऱ्या गोष्टींचे पुस्तक' असे केले पाहिजे'' असे मी त्यांना म्हणालो होतो आणि माझ्या या विधानाचे समर्थन

करण्यासाठी त्यांच्याच 'गोष्ट मेंढा गावाची' आणि 'कहाणी पाचगावची' या संशोधनात्मक पुस्तकांना दिलेल्या शीर्षकांचा संदर्भ दिलेला होता. तेव्हा त्यांच्या नेहमीच्या शैलीत सूक्ष्मपणे हसून ''तुला जे मनापासून योग्य वाटतं ते तू म्हण, ते तू लिही,''असे ते म्हणाले होते.

त्यांच्या पुस्तकांची शीर्षके हा माझ्या कायम आकर्षणाचा विषय राहिला आहे. ते अंकशास्त्र वगैरे निश्चित मानत नसतील, पण त्यांच्या पुस्तकांच्या शीर्षकांत मला एक संगती दिसते. त्यांच्या कादंबऱ्यांची व लघु कादंबऱ्यांची शीर्षके एका शब्दाची असतात. उदा. शाळा, गवत्या, समुद्र, मार्ग, सरोवर, रणदुर्ग (हे पुस्तक एकच असलं तरी त्यात रण व दुर्ग अशा दोन दीर्घ कथा आहेत). त्यांच्या संशोधनात्मक लिखाणाचे शीर्षक तीन शब्दांचे असते आणि बहुतांश वेळा ते संतवाङ्मयातून आलेले असते. उदा., 'जनाचे अनुभव पुसता' (दासबोध), 'ज्ञान ते सांगतो पुन्हा' (गीताई), उदक चालवावे युक्ती (तुकारामाचे अभंग). त्यांची प्रवासवर्णनात्मक पुस्तके दोन शब्दांची असतात (समुद्रापारचे समाज, समुद्रापारच्या संस्कृती). व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकाला ज्ञानेश्वरीतील ओवीमधून दिलेले शीर्षक 'चिद्‌गगनाचे भुवनदिवे'. त्यांचे कथासंग्रह दोनशब्दी शीर्षकाचे असतात. उदा. 'उदकाचिया आर्ती' (ज्ञानेश्वरी), झेन गार्डन. अपवाद म्हणजे नुकताच आलेला कथासंग्रह 'पतंग'.

या शीर्षकांशी जोडलेली आठवण सांगावीशी वाटते. ही आठवण/किस्सा आजपर्यंत तीन लोकांनाच माहीत आहे आणि त्यातील एक आज हयात नाही. मिलिंद सरांचा स्वभाव बघता ते रागावणार नाहीत ह्याची खात्री असल्याने ('हे लिहिणं आवश्यक होत का,' असं ते विचारू शकतील.) लिहीत आहे. त्यांची पहिली कथा 'पुन्हा सूर्य, पुन्हा प्रकाश' सन १९८१ मध्ये 'किर्लोस्कर'मध्ये छापून आली. तर त्यांचा पहिला कथासंग्रह 'उदकाचिया आर्ती' सन १९९४ मध्ये मौज प्रकाशनने प्रकाशित केला. ही आठवण 'उदकाचिया आर्ती'च्या संदर्भाने देत आहे.

कवी ग्रेस त्यांच्या अंतिम काळात पुण्यात दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये कर्करोगावर उपचार घेत असताना प्रस्तुत लेखकाला त्यांना भेटण्याचा योग आला. प्राथमिक बोलण्यानंतर ग्रेस यांनी विचारल्यामुळे 'तुमचा नंबर मिलिंद बोकील यांनी दिला' असे प्रस्तुत लेखकाने सांगताच ग्रेस यांनी मिलिंद सरांची चौकशी केली आणि त्यांना भेटण्याची



इच्छा व्यक्त केली. मिलिंद सरांना ही गोष्ट कळताच आम्ही ग्रेस यांना आगाऊ कल्पना न देता भेटायचे ठरवले. दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलच्या व्ही.आय.पी. कक्ष क्रमांक ८ मध्ये ग्रेस पलंगावर पहुडलेले होते, केमोथेरपीमुळे जर्जर झालेला त्यांचा देह मिलिंद सरांना पाहताच अंगात वीज शिरावी तसा ताडकन उठला, काही काळ त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. ग्रेस यांनी सद्‌गदित होऊन मिलिंद सरांचा हात एका हातात धरून ठेवला आणि दुसऱ्या हाताने त्यावर थोपटत हाताचे चुंबन घेतले आणि ग्रेस यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

मग सुरू झाला एक निखळ संवाद. ग्रेस यांचं एका मुक्त धबधब्याप्रमाणे कोसळणं आणि मिलिंद सरांचं शांत निर्झराप्रमाणे वाहणं. हे दोन्ही प्रकारचं पाणी वाहताना बघण्याचं, त्या पाण्याच्या स्पर्शाचं भाग्य मला लाभलं. त्या संवादात ग्रेस यांनी किमान १० वेळा उल्लेख केला तो 'उदकाचिया आर्ती' या शीर्षकाचा. ते म्हणाले, 'ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी यांचे शब्द वापरलेत. बढिया!' नंतर चहा आला. ग्रेस यांना चहाचा कप उचलणेसुद्धा जमत नव्हते. तेव्हा मिलिंद सरांनी क्षणाचाही विलंब न लावता चहाचा कप धरून त्यांच्या तोंडाला लावला. त्यांचा निरोप घेताना आम्हांला खूप जड गेलं, आयुष्यभर ज्याने साथ केली ते

दुखः ग्रेस यांच्या डोळ्यांतपण दिसत होतं. ही आमची शेवटची भेट आहे हे आम्हां सर्वांनाच कळत होतं. त्यानंतर आठच दिवसांत ग्रेस गेले.

सदर लेखाचा उद्देश मिलिंद बोकील यांच्या लिखाणाची समीक्षा करणे हा नाही. पण त्यांच्या लिखाणातील काही संदर्भ घेऊन त्यांच्या निर्मितिमूल्यांचा/भूमिकेचा आढावा घेण्याचा आहे. सबब त्यांच्या 'वाटा आणि मुक्काम' या सहलेखन प्रकारातील पुस्तकातील पुढील परिच्छेदाचा संदर्भ देणे समयोचित ठरावे.

''तुम्ही जर लेखक असाल तर तुमची मनोभूमी ही लिंगभाव समानतेला अनुकूलच असते. तुम्ही तथाकथित नैतिकतेच्या किंवा परंपरांच्या जोखडाखालून किंवा सामाजिक पूर्वग्रहामधून स्त्री-पुरुष संबंधांकडे बघत नाही. लेखकाला लिंगभाव समानता शिकवावी लागत नाही. किंबहुना तो जे लिहितो त्यातूनच समाजात लिंगभाव समानतेची पायाभरणी होत असते.''

या विवेचनाशी सर्वांनी सहमत असावे अशी खुद्द मिलिंद सरांचीदेखील अपेक्षा नसेल. ज्या प्रामाणिकपणे व सातत्याने त्यांनी लिंगभाव समानता, स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व, स्त्रीच्या आई, बहीण,पत्नी इ. नातेसंबंधांच्या पलीकडल्या जाणिवा यांचा उद्घोष व पाठपुरावा शांतपणे, ठामपणे (समुद्र, एकम, मार्ग, रणदुर्ग या कादंबऱ्यांमध्ये व कथांमध्ये) केला आहे; त्यातून त्यांची अढळ मूल्यनिष्ठा दिसून येते आणि समाजात या निकोप विचाराचे रोपण करण्याची तळमळ दिसून येते.

संशोधनात्मक लिखाणात 'सध्या काय परिस्थिती आहे?' याबद्दल विस्ताराने सांगताना ते अशी परिस्थिती का निर्माण झाली त्याचे वास्तववादी विश्लेषण करतात आणि ही परिस्थिती कशी बदलता येईल याचे दिशादर्शन करतात आणि या संपूर्ण प्रक्रियेत 'अभ्यासोनी प्रकटावे' हे सूत्र कटाक्षाने पाळतात. तसेच कोणत्याही विवेचनाला पूर्वग्रहाची बाधा न झाल्यामुळे त्यांचे लिखाण केवळ वस्तुनिष्ठच नाही तर विश्वासार्हदेखील ठरते, आणि तटस्थता केवळ संशोधन प्रक्रियेत ठेवल्यामुळे संपूर्ण लिखाणाचे मानवीपण उत्कटपणे अबाधित राहते.

हीच भूमिका त्यांच्या कथा, कादंबऱ्या यांना लागू पडते. १९८१ च्या पहिल्या कथेपासून ते आजपर्यंत ते ही भूमिका वठवत आले आहेत.

मिलिंद बोकील हा माणूस आणि मिलिंद बोकील हा लेखक यांच्यामध्ये अद्वैत आहे, त्यांच्यातलं माणूसपण त्यांच्या लेखनात उतरलं आहे त्यामुळे त्याला कसल्याच दांभिकतेचा स्पर्श झालेला नाही. लिंगभाव समानता हे त्यांच्या लेखनातील मुख्य सूत्र. लेखक आणि माणूस यांतील त्यांच्या अद्वैताचा पहिला प्रत्यय येतो तो त्यांच्या घरात शिरताना..! त्यांच्या घराच्या पाटीवर पाहिलं नाव डॉ.नीता बोकील या त्यांच्या सुविद्य पत्नीचं आहे आणि हे केवळ प्रतीकात्मक नाही.

समाजशास्त्र शाखेचे काही विद्यार्थी 'Research Methodology' वर चर्चा करत असताना प्रस्तुत लेखक उपस्थित होता. तेव्हा त्यांना मार्गदर्शन करताना मिलिंद सर म्हणाले Research Methodology वस्तुनिष्ठ संशोधनासाठी आवश्यक आहेच, पण त्याचबरोबर स्वत:ची निरीक्षण शक्ती आणि कॉमन सेन्स तितकाच महत्त्वाचा आहे. उदा., एखाद्या घरात स्त्रीचे स्थान काय आहे किंवा स्त्री-पुरुष समानतेची पातळी काय आहे ह्याचा अंदाज बांधायचा असेल तर एक साधे निरीक्षण करा. त्या घरातील स्त्री बाहेरून आली तर घरातला पुरुष लगेच उठून आपणहून तिला पाणी आणून देतो का?

मिलिंद सरांच्या साहित्याची समीक्षा करणे हा या लेखाचा हेतू नाही. पण काही निरीक्षणे नोंदवतो. त्यांच्या कथा वा लघु कादंबऱ्यांमध्ये घटनावैविध्य आणि पात्रबाहुल्य आढळत नाही. एखाद्या घाटदार नदीप्रमाणे त्या उगमापासून अंतापर्यंत पूररेषा निश्चित केल्याप्रमाणे प्रवाही असतात. 'समुद्र', 'मार्ग' यांमध्ये दोनच मध्यवर्ती पात्रे आहेत. 'एकम'मध्ये तर एकच मध्यवर्ती पात्र आहे. परंतु त्यांच्या कादंबऱ्यांचा पैस इतका विशाल असतो की त्यातीत प्रत्येक पात्र ठाशीवपणे समोर उभे राहते आणि त्या पात्रांच्या भोवतीच्या घटना बेमालूमपणे कादंबरीच्या मुख्य आशयाला येऊन मिळतात.

ज्यांना कलात्मक-लालित्यपूर्ण आस्वाद घ्यायचा असेल त्यांनी 'उदकाचिया आर्ती' आणि 'झेन गार्डन' हे कथासंग्रह वाचावेत. सजीव-निर्जीव यांतील अद्वैत मांडणारी 'यंत्र' ही कथा असो किंवा 'प्रारंभ' ही अणुयुद्धाच्या पार्श्र्भूमीवरची अस्सल विज्ञानकथा असो. या मोठ्या 'कॅनव्हास'मध्ये आपल्याला काही ना काही गवसणार हे नक्की. त्यांच्या कथांतील पात्रे बहुतांश वेळा सामाजिक कार्याची पार्श्वभूमी असणारे असतात. ज्यांना धरणग्रस्त, आदिवासी, धनगर, मच्छीमार, शेतकरी अशा विविध समूहांसमोरील समस्यांचे आकलन करून घ्यायचे

असेल त्यांनी 'जनाचे अनुभव पुसता' वाचावे. ज्यांना (फारसे प्रसिद्ध नसलेल्या) सामाजिक कार्यकर्ते आणि त्यांचे कार्य याविषयी जाणून घ्यायचे आहे त्यांनी 'कार्य आणि कार्यकर्ते' वाचावे. ज्यांना लेखक म्हणून 'बैठक' पक्की करायची आहे त्यांनी लेखन, लेखनप्रक्रिया, निर्मितिमूल्ये यांविषयी गंभीर चिकित्सा व मीमांसा करणारे 'वाटा आणि मुक्काम' वाचावे, परदेशी संस्कृतींशी तोंडओळख करण्यासाठी 'समुद्रापारचे समाज', 'समुद्रापारच्या संस्कृती' वाचावे. आणीबाणीदरम्यान वादग्रस्त ठरलेले व नरहर कुरुंदकर यांच्यासारख्या अस्सल विचारवंताने टीका केलेले विनोबा हे गूढ व्यक्तिमत्व. त्यांचे समग्र विचार एकाच ठिकाणी जाणून घ्यायचे असतील तर 'ज्ञान ते सांगतो पुन्हा' वाचावे. सहभागी लोकशाहीची यशोगाथा जाणून घ्यायची असेल आणि सध्याच्या राजकारण-समाजकारण यांमुळे येणारी निराशा झटकायची असेल तर 'गोष्ट मेंढा गावाची', 'कहाणी पाचगावची', 'मेळघाट शोध स्वराज्याचा' ही प्रवाही भाषेत संशोधनात्मक लिखाण कसे करावे याचा वस्तुपाठ घालून देणारी 'त्रिधारा' वाचावी. स्त्री-पुरुष समानता आणि पर्यायाने निकोप समाजाच्या रचनेचे सूचन करणारी 'समुद्र', 'एकम', 'रणदुर्ग' वाचणे आवश्यक बाब ठरेल. 'समुद्र' ही खऱ्या अर्थाने भास्करच्या आत्मभानाची कथा आहे, हे ज्यांना समजेल त्यांना त्याचे आकलन अधिक चांगल्या प्रकारे होईल. 'एकम'मधील काही वाक्ये वाचून आपण थबकतो, डोळे मिटून विचार करतो आणि मग पुढे जातो. पण ती वाक्ये डोक्यात घोळत राहतात. उदा., 'नवरा तसा परकाच गं! लग्न झालंय म्हणून आपलं नवराबायकोचं नातं कृत्रिम असेल देवकी; पण स्त्री-पुरुषाचे नाही.' मिलिंदसरांच्या आयुष्यातील व्यक्तींचे चित्रण वाचायचे असेल तर काही महिन्यांपूर्वी प्रकाशित झालेले 'चिद्‌गगनाचे भुवनदिवे' वाचनीय ठरते.

'शाळा' आणि 'गवत्या' यांना टाळून त्यांच्या लेखनाबद्दल लिहिता येणे शक्यच नाही. या दोन्ही कादंबऱ्या प्रस्तुत लेखकाच्या मनाजवळच्या आहेत. 'शाळा' वाचून प्रस्तुत लेखक झपाटून गेला आणि दोन-तीन दिवस तो त्या विश्वातून बाहेर येऊ शकला नाही. याच झपाटलेपणातून त्याने मिलिंद बोकिलांना पत्र लिहिले. हा सन २०१०चा काळ आहे, जेव्हा इंटरनेटवर माहितीचा विस्फोट झालेला नव्हता. तरीही 'नेटा'ने प्रयत्न करून सरांचा ईमेल आयडी शोधून त्यावर पत्ता विचारून पहिले पत्र पाठवले, काही दिवसांनी दुसरे पत्र पाठवले. 'भेटायला ये,' असा सरांचा मेसेज आल्यावर त्यांची भेट घेतली व ती आजतागायत होत आहे.

त्यामुळे 'शाळे'शिवाय हा लेख अपूर्ण राहील. 'पौगंडावस्थेतील मुलांच्या भावविश्वाचे वर्णन करणारी कादंबरी' असे 'शाळा'चे सर्रास केले जाणारे वर्णन हे खूपच वरवरचे व उथळ ठरते. 'शाळा' समाजप्रबोधन करत नाही अशी टीका काही समीक्षकांनी केलेली आहे. लक्षात घ्या, मिलिंदसरांना समाजप्रबोधन करायचे असते तर त्यांनी कादंबरी कशाला लिहिली असती ? त्यांनी तसा ग्रंथ लिहिला नसता का ? 'शाळा'साठी त्यांनी प्रथमपुरुषी निवेदन हा 'फॉर्म' निवडला आहे आणि हे निवेदन नववीमधल्या मुलाचे आहे. नववीमधला मुलगा समाजप्रबोधन करू शकेल काय ? असे असले तरी 'शाळा'मधला मुकुंद त्याच्या आजूबाजूचा भवताल निखळपणे मांडतो आणि त्यात समाजकारण, राजकारण, मैत्री, प्रेम, सुख-दुःख, गरीब-मध्यम वर्ग-श्रीमंत यांच्या घरातील परिस्थिती, ताणेबाणे, शिक्षणव्यवस्था, जाती व्यवस्था यांवर भाष्य करतो. यासाठी 'Reading between the lines' येणे गरजेचे आहे. (हेरंब ओक या तरुणाने याविषयी फारच अभ्यासपूर्ण लेखन केलेले आहे. ते त्याच्या ब्लॉगवर वाचता येईल. (http://harkatnay.blogspot.com/2012/08/blog-post28.html) या कादंबरीत मुकुंद त्याच्या प्रेयसी 'शिरोडकर' चे नाव एकदाही घेत नाही. यावरदेखील काही समीक्षकांनी 'हे मनाला पटत नाही' असे लिहिले आहे. प्रस्तुत लेखकाने मिलिंद सरांना हा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, ''अरे, त्याला नाही गरज वाटत शिरोडकरचे नाव घेण्याची आणि तशी गरज निर्माण झाली असती तर त्याने तिचे नाव घेतलेही असते.''

'शाळा' हा तुमचा स्वअनुभव आहे का असेदेखील मिलिंद सरांना अनेक जण विचारतात, त्यावर ते हसून उत्तर देण्याचे टाळतात. पण त्या निमित्ताने त्यांची भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे. त्यांचे प्रतिपादन असे आहे की, लेखकाच्या लिखाणाचा त्याच्या वैयक्तिक आयुष्याशी संदर्भ जोडू नये आणि त्याच्या व्यक्तिगत आयुष्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न करू नये. शाळा वाचणारा प्रत्येक माणूस 'nostalgic' होऊन आपल्या शाळेत मनाने वावरून येतो हे त्या पुस्तकाचे यश आहे. 'शाळा' वाचून अनेक 'मुकुंद', 'शिरोडकर' यांनी एकमेकांचे संपर्क शोधून (लग्न मूल-बाळ

झालं असतानादेखील) निखळ संवाद साधला आणि त्यांत निकोप नातं टिकून राहिलं. एका कलाकृतीच्या यशाची मोजपट्टी आणखी काय असू शकते?

'शाळा' आणि 'गवत्या' ही एक द्विधारा आहे असे प्रकर्षाने जाणवते. गवत्या हे शाळेचे उन्नत स्वरूप आहे. दोन्ही कादंबऱ्यांचा 'फॉर्म' प्रथमपुरुषी निवेदनाचा आहे. 'शाळा'मध्ये 'मुकुंद'ची भूमिका भोवतालाचे निरीक्षण करणे आणि नोंदवणे इतपत मर्यादित राहते. तर 'गवत्या'मध्ये 'आनंद' निरीक्षणे नोंदवतो, त्याची आपल्या अनुभवाशी सांगड घालतो आणि काहीएक निष्कर्ष काढायचा प्रयत्न करतो. सृष्टीशी तादात्म्य पावताना आयुष्याचा अर्थ शोधण्याचा तो प्रयत्न करतो. आनंद-गुरुजी, आनंद-मार्टिन, आनंद-जानकी, आनंद-नागू आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आनंद आणि त्याच्या खिडकीतून दिसणारा गवताळ डोंगर (गवत्या) यांच्या संवादातून मिलिंद बोकील आपल्याला तत्त्वज्ञानाच्या निबिड अरण्यात प्रकाशवाटेने घेऊन जातात. 'गवत्या'चा उद्देश कादंबरीच्या पहिल्याच पानावर स्पष्ट होतो. या पानावर सॉक्रेटीसचं वाक्य दिलेलं आहे. 'ज्याचं परीक्षण केलेलं नाही ते जीवन जगण्यायोग्यच नाही.'

'शाळा'चा शेवट दु:खान्त आहे तर गवत्याचा सुखान्त. गवत्याच्या शेवटच्या पानावरील खालून चौथा परिच्छेद गवत्याचे सार आहे असे प्रस्तुत लेखकास वाटते. तो परिच्छेद असा-

''समजतंय गवत्या, की आपली एक जिंदगी असते. या सभोवतालच्या भव्य सृष्टीत सामावलेली. आणि आपण तिच्याशी शांतपणे भिडायचं असतं. कुणाचाही राग न धरता. कुणाचाही हेवा न करता. सगळ्यांचं कल्याण होवो अशी इच्छा धरत. बाकी आपण काहीच करायचं नसतं. करणारे आपण असलो तरी. आपण नुसतं बघत राहायचं असतं गवत्या. आणि आपल्या भोवतीची परिस्थिती जे करते ते शांतपणे होऊ द्यायचं असतं. तिने दिलेले इशारे समजून घेत आणि तिच्या सुरावटीशी आपला सूर मिळवत.''

इथे 'जिंदगी' हा शब्द वापरला आहे. जीवन, आयुष्य असे शब्ददेखील वापरता आले असते. पण 'जिंदगी' या शब्दाला विशिष्ट आयाम आहे, शब्दांत व्यक्त करता येणार अशी वेगळीच छटा आहे, सगळ्यांविषयी ममत्व बाळगून जगण्याला उत्कट करण्याचा भाव आहे. गवत्या ही कादंबरी 'मैलाचा दगड' ठरते.

मिलिंद सरांना मिळालेल्या पुरस्कारांची यादी देणे येथे टाळतो आहे. कारण ते त्या बाबतीत कमालीचे तटस्थ (उदासीन नव्हे) आहेत. पुरस्कार मिळत नसताना तटस्थ 'होणे' वेगळे आणि 'राष्ट्रपती कथा पुरस्कार'सारखे पुरस्कार मिळालेले असतानादेखील तटस्थ 'असणे' वेगळे. पुरस्कारांबाबत 'तटस्थ' राहणारे मिलिंद बोकील त्यांच्या साहित्यावर आधारित असलेल्या दृकश्राव्य आविष्कारांबाबत मात्र 'इदम् न मम' या सूत्राप्रमाणे अलिप्त राहतात. 'समुद्र'चे ऑडिओ व्हर्जन आले, पुढे त्यावर आलेल्या नाटकाचे २५-३० प्रयोग झाले. 'शाळा'वर 'ग म भ न' हे नाटुकलं, 'हमने जीना सीख लिया' आणि राष्ट्रीय पुरस्कारापर्यंत मजल मारलेला 'शाळा' असे चित्रपट येऊन गेले. त्यावर प्रेक्षकांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. 'फेसबुक'वर 'लाइक-डिसलाइक'च्या लढाया झाल्या. पण मिलिंदसरांनी कोणाचीही टीका वा स्तुती केलेली दिसले नाही. या बाबत त्यांची भूमिका अशी की पुस्तक वाचून प्रत्येकाच्या मनात प्रतिमा तयार होते आणि स्वत:च्या आकलनाअनुसार त्याची कलाकृती बनते. ''माझं काम पुस्तक लिहिण्याचं आहे आणि ते पूर्ण झालेलं आहे. त्यामुळे त्या पुस्तकावर आधारित कलाकृतीच्या यशाचे श्रेय हे संबंधित दिग्दर्शक-कलाकारांचे आहे आणि अपश्रेयदेखील त्यांचेच आहे.''

प्रस्तुत लेखकाने सरांची आणि त्यांच्या साहित्याची विविध रूपे अनुभवली आहेत. कधी वादळात भरकटणाऱ्या गलबताला दिशा दाखवणारे दीपगृह, कुंद आभाळात अचानक दिसणारे इंद्रधनुष्य, तृष्णेने जीव व्याकूळ झालेला असताना दिसणारा निर्मळ झरा, दिग्मूढ झालेलं असताना दिसणारी बाणाची खूण, आधार देणारी आणि पाठीस मऊसुद्धा वाटणारी शिळा, विभ्रमातून वास्तवात आणणारी हलकेच टोचलेली टाचणी, एखाद्या मंदिरात शांतपणे तेवत असलेला नंदादीप आणि शब्दांत सांगता न येणारं सर्व काही.

मिलिंद सरांना वाढदिवसाच्या मनापासून अनंत शुभेच्छा!

**मकरंद ग. दीक्षित**, पुणे
Mob. 86050 41800
meetmak23@gmail.com
(लेखक संगणक अभियंता असून 'स्पार्क फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून आदिवासी भागात शिक्षण, रोजगार व जलसंवर्धन क्षेत्रात कार्यरत आहेत.)

स्वाती राजे

# ‘कोबॉल्ड’, ‘नोम्स’ आणि ‘यक्ष’!

युरोपीय लोकसाहित्यातून परीकथेत प्रकटलेल्या अतिमानवी मंडळींमध्ये ‘एल्फ’ हे प्रकरण एकंदर बहुरंगीच! विविध आकारांच्या, प्रकारांच्या या कलंदर बुटक्यांतील एका खास ‘प्रकरणा’ची नोंद केल्याशिवाय या जमातीची ओळख पुरी होत नाही. कधी एल्व्हज जमातीची टोपी चढवणाऱ्या, तर कधी सोयीनं स्वतःचं स्वतंत्र संस्थान थाटणाऱ्या या महाखटाटोपी प्रकाराचं नाव, कोबॉल्ड. प्रामुख्याने जर्मन लोकसाहित्यात याचा वावर.

‘कोबॉल्ड’ हे मायावी प्रकरण. कोणतंही रूप तो अंगीकारू शकतो. स्वतःच्या मूळ रूपात तो सामोरा येईल किंवा एखाद्या प्राण्याच्या किंवा अगदी एखाद्या वस्तूच्या... म्हणजे अगदी मेणबत्तीच्यासुद्धा! हा माणसाच्या घरात राहणं पसंत करणारा. ‘नॉर्मल’ वागायची लहर आली तर शेतकऱ्याचा वेश घेणारा.

कोबाल्डचं मूळ अस्तित्व प्राचीन ग्रीक मिथकांमध्ये आढळतं. पुढे युरोपच्या रोमन कॅथॉलिकीकरणानंतर तिथला मूळच्या पेगन - बहुदैवतवादी श्रद्धांच्या खुणा कोबाल्डच्या रूपाने शिल्लक राहिलेल्या दिसतात असं समाजशास्त्रज्ञांचं मत. कोबॉल्डच्या कथा युरोपीय समाजात घराघरांत रोजच्या जगण्यात विणलेल्या होत्या. कोबॉल्डच्या मूर्ती घडवणं हा तत्कालीन समाजजीवनातला एक भाग होता. विशिष्ट लाकडापासून ह्या मूर्ती कोरल्या जात. त्यांना रंगीत कपडे दिले जात. शिवाय त्यांचा चेहरा नेहमी हसरा राखला जाई. म्हणजे अगदी तोंड उघडून हसण्याची हौस असलेले कोबॉल्ड घरोघरी दिसत. सतराव्या शतकात प्रचलित झालेला 'to laugh like Kobold' हा वाक्प्रचार यातूनच आलेला!

तर ‘कोबॉल्ड’ हा ज्या लॅटिन आणि नंतर ग्रीक शब्दाचा अपभ्रंश होत युरोपीय साहित्यात स्थिरावला. त्याचा मूळ अर्थ होता ‘ठगोबा’ किंवा ‘गुंडोबा’! तोच विशेष घेऊन कोबॉल्ड सर्वदूर वावरला. कधी चार वर्षांच्या मुलाच्या इतकी उंची असलेला, कधी डोक्यावर टोपी घातलेला, कधी सोनेरी कुरळे केस खांद्यापर्यंत रुळत असलेला, कधी लाल रेशमी कोट घालणारा- तर कधी मेंढपाळाच्या वेशातला कोबॉल्ड साहित्यातून प्रकटला. आकार बदलण्यात माहीर कोबॉल्ड कधी मांजर, कधी कोंबडा, कधी साप, तर कधी

‘द क्रॉनिकल्स ऑफ नार्निया’, या सी.एस.लुईसच्या गाजलेल्या पुस्तकात नोम्सना ‘भूमिपुत्र’ म्हटलं गेलंय. ते माणसासारखे दिसतात. पण वेगवेगळ्या रंगांचे असतात. नार्नियातली दुष्ट राणी - ‘द लेडी ऑफ द ग्रीन कर्टल’ नोम्सना आपले गुलाम म्हणून वागवत असते. तिच्या पाडावानंतर नोम्स आपल्या खऱ्या घरी जमिनीत खोल खोल परत गेलेले दिसतात. हॅरी पॉटरमध्ये हॅरीचा मित्र वीझली नोम्सशी फार कनवाळूपणे वागताना आपल्याला दिसतो. अशी अतिमानवी योनी असलेले कल्पनाबंध जगात अनेक संस्कृतींतील लोकसाहित्यात आढळतात. जर्मनीत ‘रुबेझॉल’ हा डोंगरातला नोम्स सापडतो. डच कथांतला ‘कबाउतार’ हा ठेंगू बाबा तिथल्या लोकांना लाकडी बूट बनवायला शिकवतो. तर स्वीडिश खुजा ‘टॉमटे’ हा नोम्सचा जवळचा भाईबंद शोभतो!


कोबॉल्ड


यक्ष

वटवाघळाच्या रूपातही दिसला. ‘फायर कोबॉल्ड’ तर घराच्या चिमणीतूनच ये-जा करायचा म्हणे!

‘ट्रूपिंग फेअरीज’चं म्हणजे, राजघराण्यातल्या पऱ्यांचं राज्य जसं समुद्राच्या तळाशी किंवा जमिनीच्या पोटात पसरलेलं, तशी ‘कोबाल्ड’ची वस्ती घरात किंवा कडेकपारीत. त्याचं राहण्याचं एक खास आवडतं ठिकाण म्हणजे खाणी! खाणीत राहणारे कोबॉल्ड पाठीवर कुबड असलेले, विद्रूप. मध्ययुगीन खाणकामगार कोबॉल्डचं अस्तित्व अगदी पुरेपूर मानणारा. खाणींमध्ये अपघात होणं, गुहा ढासळणं, दरड कोसळणं या साऱ्यांना कोबॉल्ड जबाबदार आहे असं मानलं जाई. जमिनीखाली मिणमिणत्या दिव्यांच्या उजेडात खाणकाम करणारे खाणकामगार काम नीट पूर्णत्वाला जाण्यासाठी कोबॉल्डची प्रार्थना करत. जमिनीखाली आपल्या जिवाच्या सुरक्षिततेसाठी त्याचं स्मरण करत. त्याचा कोप होऊ नये म्हणून करुणा भाकत.

आपण जीव धोक्यात घालून जे मौलिक धातू म्हणून खणतोय ते अखेर हिणकस खनिज निघणं ही केवळ ‘कोबॉल्ड’ची अवकृपा आहे, यावर मध्ययुगीन खाणकामगारांचा गाढा विश्वास असे! मग त्याला प्रसन्न करण्यासाठी सोनं-चांदी अर्पण केलं जाई!

कोबॉल्ड खाणीत जसा उपस्थित तसा समुद्रावर खलाश्यांच्या अध्येमध्येही हजर असे. काही वेळा काही स्टाइलिश कोबॉल्ड खलाश्यांच्या वेशात बोटीवर पाइपचे झुरके घेतानाही आढळणारे! त्यातला ‘क्लाबुतरमान’ हा भडक माथ्याचा कोबॉल्ड जहाजबांधणीच्या लाकडातून आत शिरे आणि जहाज बुडायला आलं तर जहाज सोडणारा तो शेवटचा प्राणी असे! जोपर्यंत खलाशी आणि कप्तान त्याचं आदरातिथ्य चांगलं करत, तोवर तो खूश! नाहीतर भर समुद्रावर जहाजाची आणि खलाश्यांची काही धडगत नसे!

जमिनीच्या पोटातल्या खजिन्याशी, खाणकामगारांच्या आयुष्याशी संबंधित कोबॉल्डप्रमाणे या भूमिगत खजिन्याचे राखणदार म्हणजे नोम्स! आपल्याला युरोपीय लोकसाहित्यात भेटणारे हे ‘नोम्स’ही परीकथेत एल्फबरोबर नांदणारी- पण त्यांच्यापेक्षा वेगळी असणारी जमात. काही वेळा नोम्सना एल्व्हज (Elves) ची उपजात मानली जाते. पण ‘नोम्स‘ हे आपल्या काही खास गुणवैशिष्ट्यांनी युरोपीय लोकसाहित्यात आपलं खास स्थान टिकवून राहिले. Gnomes ही एल्व्हजसारखीच आकाराने खुजी मंडळी. अगदी अलीकडची त्यांची ओळख द्यायची झाली तर जे.के. रोलिंगच्या ‘हॅरी पॉटर’ मधून हे नोम्स आपल्याला भेटतात. बहुतांश वेळा त्रिकोणी लाल टोपीचे हे नोम्स बुटक्या म्हाताऱ्या दाढीवाल्यांच्या रूपात दिसतात. उपद्रव देण्यापेक्षा ते चांगुलपणासाठी अधिक प्रसिद्ध. एल्व्हज जसे खोडसाळ, नाठाळ तसे नोम्स मदतीला तत्पर! एल्व्हजचा वावर सर्वत्र. तर नोम्स बहुतांश वेळा जमिनीच्या पोटात. प्रकाशापासून दूर! वाटलीच जर प्रकाशाची गरज तर हळूच बाहेर काढणार पावलं आणि घेणार थोडासा प्रकाश पावलांनी पिऊन!

अशा गिरिकुहराशी नातं असलेल्या ‘नोम्स’चा उल्लेख आढळतो तो रेनेसान्स काळाच्या अलीकडे-पलीकडे चौदा-पंधराव्या शतकात प्रचलित असलेल्या नव्या लॅटिन

भाषेत– 'gnomus' असा. ग्रीक 'gnosis' मधूनही तो शब्द आल्याचं म्हटलं जातं. याचा अर्थ 'knowledge'. तर हे 'ज्ञानी' नोम्स 'genomos' – म्हणजे मातीशी – भूमीशी संबंधित असल्याचंही म्हटलं जातं. जर्मन रेनेसान्सच्या काळचा तत्त्वज्ञ आणि तेथील वैद्यकीय क्रांतीचा प्रणेता समजल्या जाणाऱ्या पॅरासेल्सस या विद्वानाच्या सोळाव्या शतकात प्रसिद्ध झालेल्या 'A Book on Nymphs, Sulphs, Pygmies and Salamanders and on the other spirits' या ग्रंथात नोम्सची पहिली लिखित नोंद आढळते. दोन वीत उंचीचे, माणसाच्या वस्तीपासून दूर राहणारे हे दिवाभीत नोम्स. एल्व्हज जसे माणसाच्या वस्तीशी सहज लगटून राहतात, अगदी घरातही लुडबुड करायला मागेपुढे पाहत नाहीत, तसे नोम्स मात्र बुजरे. मानवजातीपासून दूर फटकून राहणारे. त्यांना माणसाच्या दृष्टीआड राहणं आवडतं. त्यांच्या डोक्यावरच्या त्रिकोणी टोपीच्या लाल रंगामागचं कारणही बहुधा हेच असावं, असं सांगितलं जातं. ही टोपी त्यांनी खलाशांच्या वेशापासून प्रेरित होऊन घेतली म्हणे! समुद्रावर काळोखात उठून दिसण्यासाठी खलाशी पांढरी टोपी वापरत आणि दिसू नये म्हणून लाल. तर या आपल्या 'नोम्स'नी आपण कुणाच्या दृष्टीला पडू नये म्हणून लाल टोपीचा स्वीकार केला.

नोम्सचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे माणूस जसा सहजी हवेतून चालतो किंवा मासे जसे पाण्यातून सुळ्कन पोहतात, तितक्या सहजपणे नोम्स जमिनीतून आरपार चालू शकतात. जमिनीच्या पोटातलं अगदी केंद्रभागापर्यंत त्यांचं राज्य!

स्वित्झर्लंडच्या लोकसाहित्यात नोम्सबद्दलची एक खास कहाणी प्रसृत आहे. सन १६१८ मध्ये इटली आणि स्वित्झर्लंडच्या सीमेवर पियर्स गावावर दरड कोसळली आणि हे गाव पूर्ण नष्ट झालं. असं म्हटलं जातं की, पूर्वी या गावच्या रक्षणकर्त्या नोम्सनी या गावकऱ्यांच्या कल्याणासाठी जमिनीच्या भेगांभेगांतून आपल्या खजिन्यातील सोन्याचा रस ओतला. गावकऱ्यांनी सोन्याच्या खाणी खोदल्या. लोक धनवंत झाले. पण धनाबरोबर आढ्यता, अहंकार आणि भ्रष्टाचारही आला. आपल्या या देणगीचा दुरुपयोग होताना पाहून नोम्स संतापले. गावकऱ्यांना अद्दल घडवण्यासाठी त्यांनी दरड कोसळवून हे गाव नष्ट करण्याचा निर्णय घेतला... आणि तसं केलंही!

भलेपणाच्या मूल्याशी जवळचा संबंध असलेले नोम्स हे




भूमिगत खजिन्याचे, रत्नांचे राखणदार. मानवजातीशी मित्रत्वाचं नातं राखणारी, किंबहुना माणसाला त्रास न देणारी ही उद्योगी जमात. सज्जन माणसांच्या मुलांना ते भरभरून धन देतात आणि कधीही आपल्या उपकारांच्या परतफेडीची अपेक्षा करत नाहीत अशी त्यांची ख्याती.

नोम्स आधुनिक साहित्यात अनेक ठिकाणी दृष्टोत्पत्तीस पडतात. प्रामुख्याने फँटसी साहित्यात त्यांनी मोठी जागा व्यापली आहे. काळाच्या ओघात त्यांची वैशिष्ट्यं आणि कामं प्रत्येक लेखकाने आपापल्या कल्पनेने बदलली. बाउम्सच्या 'विझर्ड ऑफ ओझ'मध्ये या नोम्सचा राजा 'ओझ' लोकांचा सल्लागार बनलेला दिसतो. काही गोष्टींत जमिनीखाली राहाणारे रत्नांच्या साठ्याचे रक्षणकर्ते नोम्स लांब दाढीचे, गोलमटोल, भडक माथ्याचे 'अमर' दाखवले आहेत. टॉल्किनच्या समग्र साहित्यात– 'लिजेंडेरियन' मध्ये नोम्सना महत्त्वाचं स्थान आहेच. त्याने चितारलेले नोम्स पारंपरिक नोम्सपेक्षा वेगळे, उंच, सुंदर, काळ्या केसांचे, सुज्ञ, ज्ञानी दिसतात. या नोम्सचा दुरभिमानही काही वेळा दृष्टीस पडतो!

'द क्रॉनिकल्स ऑफ नार्निया', या सी.एस.लुईसच्या गाजलेल्या पुस्तकात नोम्सना 'भूमिपुत्र' म्हटलं गेलंय. ते माणसासारखे दिसतात. पण वेगवेगळ्या रंगांचे असतात. नार्नियातली दुष्ट राणी – 'द लेडी ऑफ द ग्रीन कर्टल' नोम्सना आपले गुलाम म्हणून वागवत असते. तिच्या पाडावानंतर नोम्स आपल्या खऱ्या घरी जमिनीत खोल खोल परत गेलेले दिसतात. हॅरी पॉटरमध्ये हॅरीचा मित्र वीझली नोम्सशी फार कनवाळूपणे वागताना आपल्याला दिसतो.

अशी अतिमानवी योनी असलेले कल्पनाबंध जगात अनेक संस्कृतींतील लोकसाहित्यात आढळतात. जर्मनीत 'रुबेझॉल' हा डोंगरातला नोम्स सापडतो. डच कथांतला 'कबाउतार' हा ठेंगू बाबा तिथल्या लोकांना लाकडी बूट बनवायला शिकवतो. तर स्वीडिश खुजा 'टॉमटे' हा नोम्सचा जवळचा भाईबंद शोभतो!

आपल्याकडे, भारतीय उपखंडात या 'नोम्स'च्या किंवा एल्व्हजच्या जवळ जाणारी एक व्यक्तिरेखा प्राचीन साहित्यात आढळते ती म्हणजे यक्ष!

बऱ्याचदा पौर्वात्य साहित्यात यक्ष हे बुटके, जाडे, ढेरपोटे रंगवले जातात. यक्षिणी सुंदर, सौष्ठवपूर्ण. सामान्यतः यक्ष हे पाण्याशी संबंधित शक्ती असल्याचं दिसतं. त्यांचं वाहन बऱ्याचदा मगर किंवा माशाच्या शेपटीचा प्राणी असल्याचं प्रतीकात्मकरीत्या दाखवलं जातं. यक्षांची व्यक्तिरेखा 'आयरिश परीकथा किंवा मिथककथांतील 'Lords of Life' समजल्या जाणाऱ्या 'तुआथा दी दनान' या व्यक्तिरेखेच्या जवळ जाणारी ठरू शकेल.

तुआथा दी दनान हीसुद्धा पाण्याशी संबंधित शक्ती. पण ते राहतात जमिनीवर. तर यक्ष तळ्यात! यक्ष ही 'जल' किंवा 'रसा'चं नियंत्रण करणारी शक्ती. त्यांचं हे काम केवळ तलाव, विहिरी, पाणवठ्यांपुरतं मर्यादित नाही तर झाडापानांतील आंतरसालातील रसांचा स्रावही ते नियंत्रित करतात अशी प्राचीन लोकसंस्कृतीची धारणा. जलाशय हे यक्षाला स्वतःचं हक्काचं राज्य वाटतं, याचे उल्लेख प्राचीन साहित्यात आपल्याला दिसतात!

बौद्ध जातकांत यक्ष हा वैश्रवणाचा मदतनीस असल्याचं सांगितलं जातं. वैश्रवणाने नेमून दिलेल्या तळ्यात एक यक्ष राहत असे. त्याला तळ्यातल्या प्राण्यांना खाण्याची मुभा होती. परंतु हा यक्ष पाणी प्यायला येणाऱ्या माणसांना प्रश्न विचारत असे आणि त्यांना उत्तर देता आलं नाही तर कोंडून ठेवून मारत असे. बोधिसत्त्वाने त्याच्या कूट प्रश्नांची यथायोग्य उत्तरं देऊन आपल्या सग्यासोयऱ्यांची सुटका केली अशी कथा जातकांत आढळते. पाणी प्यायला येणाऱ्यांना प्रश्न विचारण्याचा आपला हक्क यक्ष महाभारतातही बजावताना दिसतोच.

कुबेरासारखे यक्ष जसे कल्याणकारी, तसे दुष्ट यक्षही दिसतात. धनाचे, दिशांचे रक्षण करणारे यक्ष जसे आढळतात तसे वाटमारी करणारे, लुबाडणारे अगदी दोघा यक्षांच्या सीमेवर पडणारे प्रेत कुणाच्या वाटणीचे यावरून भांडणारे यक्षही जातकांत दिसतात.

यक्षांना जादूई शक्ती असतात. मनुष्याला बंद दरवाजातून कुठेही नेण्याची विद्या त्यांना अवगत असते.

संध्याकाळपासून रात्रीपर्यंत त्यांच्या संचाराचा हक्काचा काळ. स्मशान हे यक्षांचे, विशेषतः यक्षिणींचे आवडते ठिकाण. एका संन्याशाने यक्षिणीला प्रसन्न करण्यासाठी स्मशानात होम केला. तेव्हा विद्युन्माला नावाची यक्षीण अवतरली असा उल्लेख कथासरित्सागरात आढळतो. यातही यक्षिणींची 'श्रेणी' दिसते! विद्युन्माला, चंद्रलेखा आणि सुलोचना या यक्षिणी या 'यक्षपंथात' श्रेष्ठ– असाही उल्लेख या कथेत आढळतो.

यक्ष हा अतिमानवी शक्तींमधला गुंतागुंतीचा, सुष्ट–दुष्ट अशा दोन्ही बाजू असलेला, विविध प्रकारची भली–बुरी कामं करणारा, विलासप्रिय, चंचल वृत्तीचा आणि पिशाच किंवा राक्षसाच्या जवळ जाणारा प्रकार समजला जातो. त्याच्या या गडद–रोचक स्वरूपामुळे तो अन्य अभ्यासकांना जवळचा वाटला असावा. ज्येष्ठ संशोधक डॉ.आनंदा कुमारस्वामी यांनी या यक्षाचा तपशीलवार अभ्यास करून ग्रंथ सिद्ध केला आहे. आणखीही काही संशोधकांचं लक्ष यक्षानं वेधल्याचं दिसतं. मात्र प्राचीन साहित्यातला अद्भुताचं परिमाण लाभलेला यक्ष भारतीय परीकथेत तितकासा रमलेला – रुळलेला दिसत नाही.

एल्व्हज, नोम्स आणि यक्षासारखाच जादूई, पण जरा गडद छटेने रंगलेला एक कल्पनाबंध पाश्चिमात्य परीकथेत अतिशय जोरकसपणे आपलं अस्तित्व दाखवताना आढळतो. तो म्हणजे ''चेटकीण''!

**स्वाती राजे**, पुणे
swatijraje@gmail.com
Mob. 98224 01876

धोका : ४

आनंद करंदीकर

# वाहनांचे बनावट सुटे भाग : प्रवाशांना धोका (भाग १)

व्यक्तिगत निवेदन

वाहनांच्या बनावट सुट्या भागांविरुद्ध काम करण्याची संधी मला टाटा मोटर्समध्ये मिळाली आणि काही यशही प्राप्त झाले. त्यामुळे या प्रकरणात वैयक्तिक अनुभवाचे संदर्भ येतील. माझी स्वतःची थोरवी सांगण्यासाठी ते मी दिलेले नाहीत, तर हकिकतीला विश्वासार्हता यावी म्हणून दिलेले आहेत. शिवाय, संघटितपणे आणि पद्धतशीरपणे बनावटांविरुद्ध कारवाई केली, तर ती यशस्वी होऊ शकते, हे आशावादी चित्रही मला या लेखात मांडायचे आहे.

वाचक हे समजून घेतील, अशी मी आशा करतो.

जानेवारी, २०१४, बातमीदार : 'आळेफाट्याहून अर्नाळ्याकडे जात असलेली एसटी बस आज (गुरुवार) सकाळी साडेनऊच्या सुमारास माळशेज घाटात कोसळून झालेल्या अपघातात एसटीतील २७ प्रवाशांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये १९ महिला आणि ८ पुरुषांचा समावेश आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीअनुसार, माळशेज घाटात टोकावडे येथे हा अपघात झाला. ठाणे आगाराची ही बस असून, ती अर्नाळ्याकडे जात असताना एसटी चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने खोल दरीत कोसळली. या बसमधून सुमारे ४० प्रवासी प्रवास करत होते. घाटात एका वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्यानेच हा अपघात झाला. घटनास्थळी ओतूर पोलिस ठाण्याचे पोलिस आणि प्रशासकीय अधिकारी दाखल झाले. त्यांनी दरीतून मृतदेह बाहेर काढत, जखमींना मुरबाड आणि टोकावडे येथील रुग्णालयात दाखल केले आहे. जुन्नरच्या सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेच्या गिर्यारोहकांनीही बचावकार्यात मदत केली.' (खबरबात) **(बातमीतील अधोरेखीकरण आणि 'च'चा जाड ठसा हे मी केलं आहे.)**

वरच्यासारख्या बातम्या वेळोवेळी आपल्या वाचनात येतात. मेलेल्या प्रवाशांबद्दल आपण हळहळ व्यक्त करतो, वाहनाच्या चालकाला मनातल्या मनात दोष देतो आणि पुढील बातमी वाचायला लागतो. वाहन-चालकाच्या म्हणजे ड्रायव्हरच्या चुकीमुळे अपघात झाला, असे आपण गृहीत धरून टाकतो. कारण, बातमी देताना आपला तसा

आता दोष चालकाचा होता की दोष गाडीत होता, हे बातमीदाराला किंवा तिथे पोहोचलेल्या एसटीच्या अधिकाऱ्यांना किंवा पोलिसांना लगेच कसे कळते? ते कळण्यासाठी फॉरेन्सिक सायन्स म्हणजे गुन्हे अन्वेषण पद्धतीने अपघाताचे कारण शोधले पाहिजे. असे अपघाताचे कारण शोधून जर त्यातून असे निष्पन्न झाले की बसगाडीमध्ये बिघाड होता, तर तसे सांगितले पाहिजे. असे का केले जात नाही? रस्त्यावर होणाऱ्या अपघातात गाडीतील दोष हे किती वेळा कारणीभूत असतात? गाडीत दोष निर्माण होण्याचे मुख्य कारण काय असते? दुरुस्ती आणि देखभाल करताना तिच्यात खोटे बनावट सुटे भाग बसवले जातात, हे वाहनांना अपघात होण्याचे आणि प्रवाशांचे आणि वाहन-चालकांचे मृत्यू होण्याचे महत्त्वाचे कारण किती वेळा असते?

समज व्हावा अशा प्रकारे ती बातमी दिलेली असते. म्हणजे, वरील बातमीत चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले हे वाक्य दोनदा आले आहे आणि दुसऱ्यांदा तर त्यामुळेच हा अपघात झाला, असे जोरकसपणे सांगितले आहे. मग, सर्वसामान्य वाचकाचा असा समज झाला की, हा अपघात ड्रायव्हरच्या चुकीमुळे झाला तर यात वाचकाचा दोष नाही.

पण थोडा अधिक विचार केला तर असा प्रश्न पडला पाहिजे की, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले? की बस चालकाच्या नियंत्रणात राहिली नाही? या दोन प्रश्नांतील फरक वरकरणी अगदी थोडासा असला, तरी अर्थाच्या दृष्टीने खूप मोठा आहे. गाडीवर चालकाचे नियंत्रण राहिले नाही, हा चालकाचा दोष आहे; तर, गाडी चालकाच्या नियंत्रणात राहिली नाही, यातून दोष गाडीत होता असे सूचित होते.

आता दोष चालकाचा होता की दोष गाडीत होता, हे बातमीदाराला किंवा तिथे पोहोचलेल्या एसटीच्या अधिकाऱ्यांना किंवा पोलिसांना लगेच कसे कळते? ते कळण्यासाठी फॉरेन्सिक सायन्स म्हणजे गुन्हे अन्वेषण पद्धतीने अपघाताचे कारण शोधले पाहिजे. असे अपघाताचे कारण शोधून जर त्यातून असे निष्पन्न झाले की बसगाडीमध्ये बिघाड होता, तर तसे सांगितले पाहिजे. असे का केले जात नाही? रस्त्यावर होणाऱ्या अपघातात गाडीतील दोष हे किती वेळा कारणीभूत असतात? गाडीत दोष निर्माण होण्याचे मुख्य कारण काय असते? दुरुस्ती आणि देखभाल करताना तिच्यात खोटे बनावट सुटे भाग बसवले जातात, हे वाहनांना अपघात होण्याचे आणि प्रवाशांचे आणि वाहन-चालकांचे मृत्यू होण्याचे महत्त्वाचे कारण किती वेळा असते?

या आणि अशासारख्या प्रश्नांचा ऊहापोह मी या लेखात करणार आहे. कारण, वाहनांच्या बनावट खोट्या सुट्या भागामुळे दरवर्षी भारतात तीस हजारांहून, हो... तीस हजारांहून अधिक प्रवासी मृत्युमुखी पडतात, असा अंदाज आहे.

या प्रकरणातील मांडणी चार उपविषयांत क्रमवार पद्धतीने केली आहे. हे चार उपविषय आहेत :

१. विषयाचे महत्त्व : वाहनांच्या सुट्या बनावट भागामुळे किती मोठ्या प्रमाणावर अपघात होतात? त्याबद्दलची माहिती का गोळा केली जात नाही? ड्रायव्हर जबाबदार असण्याचे प्रमाण कमी का असते? बनावट सुटे भाग बनवणाऱ्या निर्लज्ज नफेखोरीकडे दुर्लक्ष करून कष्टाळू- पण गरीब असलेल्या ड्रायव्हरला का दोषी धरले जाते?

२. वाहनांच्या सुट्या बनावट भागांमुळे अपघात का घडतात?

३. वाहनांच्या बनावट सुट्या भागांचा काळा धंदा किती मोठा आहे आणि तो केवढ्या वेगाने का वाढतो आहे?

४. काय केले पाहिजे? भांडवलशाहीच्या चौकटीत राहूनही दूरदृष्टी असलेल्या एका जबाबदार कंपनीने बनावट भागांविरुद्धची लढाई कशी जिंकली? अजून काय करता येईल?

१. विषयाचे महत्त्व : वाहनांचे बनावट सुटे भाग हा प्रश्न सर्वसामान्यांच्या दृष्टीने कितपत महत्त्वाचा आहे? हा प्रश्न वाहनकंपन्या, वाहनदुरुस्ती करणारी गॅरेजेस, ट्रक आणि बस यांच्या साहाय्याने वाहतूक करणाऱ्या कंपन्या, वाहनांचे चालक आणि वाहनांचे मालक यांच्या दृष्टीने तर महत्त्वाचा आहेच. अगदी दुचाकीच्या मालकाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. पण सर्वसामान्य नागरिकांसाठीही हा प्रश्न महत्त्वाचा आहे; कारण, बनावट सुट्या भागांमुळे मोठे अपघात घडतात आणि त्यामुळे ड्रायव्हर, बसमधील प्रवासी किंवा रस्त्यावरून चालणारे नागरिकही मरण पावतात.

वाहनांना होणाऱ्या अपघातांना कारणीभूत वाहनात असलेले दोष असतात याचे किती प्रमाण असते? वाहनातले दोष किती प्रमाणात वाहनात बसवल्या जाणाऱ्या कमी प्रतीच्या बनावट सुट्या भागांमुळे निर्माण झालेले असतात? या प्रश्नांकडे भारतात सामान्यतः पूर्णपणे दुर्लक्ष करण्याची प्रथा आहे. या बाबतचा अलीकडचा आणि शेवटचा उपलब्ध अभ्यास हा पंचवीस वर्षांपूर्वीचा १९९७-९८ सालचा आहे.

Automotive Component Manufacturers Association of India, (ACMA) यांनी केलेल्या या अभ्यासानुसार १९९७-९८ सालात एका वर्षात वाहनांच्या बनावट सुट्या भागांमुळे ६६,३३० अपघात घडले. (ACMA, https://www.livemint.com/Companies/YrbpLFkdIbdg6joFcmKy8I/Fake-auto-parts-take-toll-of-lives-deprive-govt-industry-o.html)

या अपघातात १३,१८० लोकांचे प्राण गेले आणि ६५,५५० लोकांना गंभीर शारीरिक इजा झाली. (ACMA) त्या वेळी भारतात ३८ लाख वाहने होती. आता ती एक कोटीपेक्षा जास्त आहेत. एकूण विकल्या जाणाऱ्या सुट्या भागांमध्ये बनावट सुट्या भागांचे प्रमाणही वाढले आहे. त्याचा परिणाम बाजूला सोडला आणि निव्वळ वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे अपघात आणि मृत्यू वाढले आहेत, असे गृहीत धरले, तर साध्या गुणोत्तरानुसार २०२१ मध्ये एका वर्षात बनावट सुट्या भागांमुळे झालेल्या वाहनांच्या १,७४,५५३ अपघातांत ३४,६८४ मृत्यू आणि १,७२,५०० व्यक्तींना जबर इजा झाली असावी, असा अंदाज करता येतो.

केंद्रीय वाहतूक मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार २०१८ मध्ये भारतातील रस्त्यांवर एकूण ४,६७,०४४ अपघात झाले आणि त्यामध्ये १,५१,४१७ लोक मृत्युमुखी पडले. अजून एका अंदाजानुसार भारताच्या एकूण सकल राष्ट्रीय उत्पन्नापैकी ३ ते ५टक्के वाटा रस्त्यांवरील अपघातात वाया जातो. अजून एका अंदाजानुसार भारतातील २०टक्के अपघात हे बनावट सुट्या भागांमुळे होतात. हे विविध स्रोतांतून उपलब्ध झालेले अंदाज एकत्रितपणे लक्षात घेतले की, वाहनांच्या बनावट सुट्या भागांमुळे २०२१ या एका वर्षात, बनावट सुट्या भागांमुळे वाहनांचे एक लाखाहून अधिक अपघात झाले, आणि त्यात चौतीस हजार लोक मरण पावले, हे विश्वसनीय वाटते.

अर्थात, वाहनांच्या बनावट भागामुळे हे अपघात झाले, याची नोंद सरकारी दफ्तरात केली जात नाही. सामान्यत: हे अपघात 'वाहनचालकांची चूक' या सदराखाली नोंद केले जातात. याची दोन मुख्य कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे अपघाताची गुन्हा म्हणून चौकशी करण्याची कुवत पोलीस यंत्रणेत नाही. त्यासाठी ज्या प्रकारचे तांत्रिक ज्ञान आणि शोध घेण्याची क्षमता आवश्यक आहे ती अपघातांची नोंद घेणाऱ्या आणि चौकशी करणाऱ्या पोलिसांमध्ये नसते, असे अभ्यासकांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. दुसरे कारण म्हणजे जर अपघात बनावट भागामुळे झाला याची नोंद केली, तर तो बनावट भाग ज्यांनी बनवला आणि ज्यांनी बसवला त्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाला कारणीभूत झाल्याचा गुन्हा नोंदवावा लागेल. एकदा वाहनचालकाची चूक असे म्हटले की, पुढची चौकशी टळते, आणि तपासयंत्रणेचे काम फार सोपे होते!

ड्रायव्हर दारू प्यायलेला होता असेही कारण बऱ्याच वेळा नोंदवले जाते. ट्रक आणि बस ड्रायव्हर उपजीविकेचे साधन म्हणून वाहन चालवतात. त्यांच्यापैकी कोणीही दारू पिऊन वाहन चालवले तर इतर ड्रायव्हरांचा जीव धोक्यात येतो. त्यामुळे सर्व ड्रायव्हर आपल्यापैकी कोणी दारू पिऊन गाडी चालवत नाही, याबद्दल सजग असतात. हायवेच्या धाब्यावर जर चुकून एखादा, दारू प्यायलेला ड्रायव्हर (ड्युटीवर नसलेलासुद्धा) सापडला, तर इतर ड्रायव्हर त्याचे काय हाल करतात, हे मी स्वतः पाहिले आहे. रात्री पार्टी केल्यावर दारूच्या नशेत गाडी चालवणे हा शहरातील उच्च-मध्यम वर्गीयांतर्फे केला जाणारा गुन्हा आहे; ट्रक आणि बसचे व्यावसायिक ड्रायव्हर तो गुन्हा करतात असे गृहीत धरणे या उच्च-मध्यम वर्गीयांना सोयीचे असते.

ट्रक आणि बस ड्रायव्हर हे रोजच दूर पल्ल्याची गाडी हाकत असतात. त्यांच्यात गाडी चालवण्याचे पुरेसे कसब आणि सावधानता नसेल, तर ते वर्षानुवर्षे अपघात न करता गाडी चालवू शकणार नाहीत. त्यामुळे ड्रायव्हरची चूक हे कारण निव्वळ अधिक चौकशी करायला नको, म्हणून दिलेली सबब असते. म्हणून मग, बनावट सुट्या भागामुळे अपघात झाले, अशी नोंद कागदोपत्री होत नाही.

२. वाहनांच्या सुट्या बनावट भागांमुळे अपघात का घडतात? कुठले बनावट भाग अपघातांना जास्त कारणीभूत होतात?

वाहने रस्त्यावर वेगाने धावत असतात. एका वाहनामध्ये १८०० हून जास्त भाग असतात. यातील कुठलाही भाग अचानक काम करेनासा झाला, तर वाहन चालकाच्या नियंत्रणात राहत नाही आणि वाहन दरीत कोसळू शकते, समोरच्या वाहनावर आदळू शकते, किंवा बाजूने चालणाऱ्या पादचाऱ्यांना धडकू शकते.

बनावट भाग हे निकृष्ट दर्जाचे असतात. त्यांच्यामध्ये वापरलेला कच्चा माल हलक्या प्रतीचा असतो. ते तयार झाल्यावर त्यांच्या दर्जाची तपासणी केली जात नाही.

वाहनातल्या प्रत्येक भागाला जबरदस्त धक्के (Shocks) हे सतत बसत असतात. खूप ताण (Load) सहन करावा लागतो, हा ताण एकसारखा कमी-जास्त होत असतो. (Cyclical Load). हे धक्के, ताण सहन करण्याची बनावट

भागाची क्षमता फारच कमी असते.

शिवाय, वाहनातील भागांचे एकमेकांशी सातत्याने घर्षण होत असते, त्यामुळे त्यांची झीज होत असते. बनावट भाग फार लवकर झिजतात आणि कमजोर होतात. याची काही उदाहरणे खालीलप्रमाणे :

– बनावट टायर रस्त्यांवरची पकड सोडतात.

– इंजिनाला आग लागते.

– सीटबेल्ट ताण बसल्यावर आपोआप निघून येतो.

– वाहनाला धडक बसली की डोक्यावरचे छत आतल्या बाजूला वाकते आणि खाली बसलेल्या प्रवाशाचे डोके फुटते.

– बनावट काचा फुटल्यावर त्यांचे लहान गोल गोळे होत नाहीत, तर त्यांचे टणक आणि अणकुचीदार तुकडे होतात. ते प्रवाशांच्या डोळ्यांत घुसून त्यांना आंधळे करतात.

– रात्री काळोखात गाडी चालवत असताना अचानक समोरचे दिवे काम करेनासे होतात आणि वाहनचालकासमोर फक्त अंधार पसरतो. गाडीचे बनावट व कमी क्षमतेचे समोरचे दिवे हे रात्री गाड्यांना होणाऱ्या अपघातांचे ५० टक्के कारण आहे, असे अमेरिकेतील एका पोलिसप्रमुखाने आवर्जून सांगितले आहे. गाडीची नियमित देखभाल करताना समोरच्या दिव्यांची क्षमता तपासली जात नाही, ती नियमितपणे तपासावी असेही त्याने सांगितले आहे.

– ऐन वेळी वाहनाचे ब्रेक लागत नाहीत आणि वाहन दरीत कोसळते.

– वाहनाची वळवण्याची यंत्रणा अचानक तुटते, चालक वेगात असलेली गाडी वळवू शकत नाही. मग, गाडी समोरच्या गाडीवर आदळते किंवा दरीत कोसळते. इ.

बनावट सुट्या भागांमुळे झालेल्या अपघातात भारतात दर वर्षी चौतीस हजारांहून जास्त लोक मरतात आणि अंदाजे एका लाख सत्तर हजार लोक जबर जखमी होतात. तेव्हा, वाहनातील बनावट सुटे भाग, त्यांच्यापासून असलेला धोका हा विषय सर्वसामान्यांच्या दृष्टीने गंभीर आहे, महत्त्वाचा आहे.

३. वाहनांच्या बनावट सुट्या भागांचा काळा धंदा किती मोठा आहे आणि तो एवढ्या जोमाने का फोफावतो आहे?

वाहनांच्या बनावट सुट्या भागांचा धंदा हा जागतिक स्वरूपाचा प्रश्न आहे. लवकरच, म्हणजे या वर्षात, जगभरातील हा काळा धंदा २.३ ट्रिलियन डॉलर्स एवढा होईल, असा अंदाज आहे. तुलनाच करायची झाली तर, हा काळा धंदा कॅनडा, ब्राझील किंवा इटली यांच्या वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त असेल.

भारतात वाहनांच्या बनावट भागांचा हा काळा धंदा २०१८मध्येच बावीस हजार कोटी रुपयांपर्यंत वाढला होता. हा धंदा ट्रक, मोटारी आणि दुचाकी यांच्यातील विक्रीमध्ये होणाऱ्या वाढीपेक्षा वेगाने वाढतो आहे; २०१४ ते २०१८ या काळात त्यामध्ये १०० टक्क्यांनी वाढ झाली. चालू वर्षात हा धंदा वाढून तीस हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असेल. (तुलना करायची झाली तर, २०२०-२१ या आर्थिक वर्षात टाटा मोटर्स या भारतातील वाहनक्षेत्रातील सर्वांत मोठ्या कंपनीची विक्री ही सत्तेचाळीस हजार कोटी रुपये होती.)

बनावट सुट्या भागांचा हा विषय इथेच संपलेला नाही. पुढील लेखात आपण बनावट सुट्या भागांचा काळा धंदा फोफावण्याची कारणे आणि काय केले पाहिजे हे जाणून घेऊ या.

**आनंद करंदीकर**, पुणे
anandkarandikar49jgmail.com
Mob. 96045 18539

हे पुस्तकही वाचा...

**वैचारिक घुसळण**

लेखक : आनंद करंदीकर

पृष्ठे ३३६, किंमत ३०० रुपये

संपर्क

साधना प्रकाशन, पुणे

Ph. 020 24459635

Mob. 7058286753

sadhana.prakashan@gmail.com

नवे पुस्तक

नीलिमा जाधव-बंडेलु

# नकोसा स्पर्श नकोच : आपलीशी वाटणारी पुस्तिका

भर उन्हाळ्याची टळटळीत दुपार. जुन्या शहरातल्या मध्यवर्ती भागात दोन सिमेंटच्या भिंतींमधून जाणारा चिंचोळा रस्ता... आत गेलो तर विस्तीर्ण वस्ती. गरिबांची, कष्टकऱ्यांची, सर्व जातिधर्मांच्या समाजाची ही मिश्र वस्ती. अनेक संस्कृती एकत्र नांदताना पाहण्याचा अनुभव वेगळा होता. एका अशासकीय संस्थेच्या वतीने आयोजित एनजीओच्या कार्यक्रमासाठी येथे आलेली. समोर खूप सारी चिलीपिली पोरं. नेहरू जयंतीचा कार्यक्रम घ्यावयाचा होता. सगळे औपचारिक सोपस्कार पार पडले. मी संस्थेच्या कार्यकर्त्यांना विनंती केली की, आम्हांला एकांतात बोलायचंय मुलांशी. ते दूर गेले. सारी मुलं ४ ते १६ वर्षे वयोगटातील. मागच्या बाजूला वस्तीतली टगी पोरं, काय चाललंय पहायला आलेली. ती ही १६ ते २० या वयोगटातली. आम्ही एकमेकांशी गप्पा मारायला सुरुवात केली. हळूहळू मी माझ्या मनातल्या विषयांकडे वळले. एका मुलीला व मुलाला जवळ बोलावलं, त्यांना दोघांनाही जवळ घेतलं, विचारलं- 'काय वाटतंय तुम्हांला माझ्या सोबत जवळ असताना?' मुलं सुरुवातीला बिचकली, मग म्हणाली, 'मॅडम, छान वाटतयं.' मुलगी म्हणाली, 'आईजवळ असल्यासारखं वाटतंय...' मुलगा हळूच म्हणाला, 'मॅडम, माझी मुंबईची मावशी तुमच्यासारखी दिसती. ती माझा खूप लाड करती.' मग हळूहळू सगळीच मुलं जवळ आली, घेरून बसली... मी हळूच विषयाला हात घातला. 'असं होतं का की तुम्हांला काही लोकांनी जवळ घेतलेलं, स्पर्श केलेलं आवडत नाही, राग येतो, रडायला येतं, संताप येतो...' आणि मुलं धडाधडा बोलायला लागली. मुलांचे अनुभव थरारक होते. वस्तीतल्या बाहेरच्या पोरांनी येता-जाता मागून चिमटे घेण्यापासून, समोरून हात लावल्यापासून ते बलात्कार करण्याच्या प्रयत्नांपर्यंत फारच मुलं-मुली सांगू लागली. घरातले नातेवाईक, बाहेरचे शेजारचे, गर्दीत असताना कार्यक्रम करत असताना, एकटं असताना- कधीही कुठलाही प्रसंग अपवाद नव्हता. मुलं बोलताना घाबरत होती, मुली तर अपराधी भावनेनं सांगत होत्या. मध्येच डोळ्यांत पाणी, रडू, तर कधी संताप, क्रोध... संमिश्र भावनांचा दबलेला उद्रेक होता. त्यांच्याशी जे होत होतं ते

वैचारिक भूमिकांचं नातं रोजच्या जगण्याच्या चळवळीशी जोडून काम करणाऱ्या लेखिका कार्यकर्त्या दिवंगत कमला भसीन यांच्या 'काश किसने मुझे बताया होता' या पुस्तिकेचं 'नकोसा स्पर्श नकोच' ही अत्यंत साध्या, सोप्या-सरळ भाषेतली पुस्तिका 'मुक्ता प्रकाशन'ने नुकतीच प्रकाशित केली. कवयित्री सारिका उबाळे यांनी हे भाषांतर केलंय. लिंगभाव, पितृसत्ता व लैंगिक शोषण या विरोधात कायम सक्रिय काम करणाऱ्या कमला भसीन यांनी बालकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांबाबतचे अनेक प्रश्न यात उभे केले आहेत, उद्धृत केले आहेत. आजच्या अरिष्टाच्या परिस्थितीत लैंगिक अत्याचाराचा मुद्दा ऐरणीवर असताना अल्प किमतीत उपलब्ध असलेली ही पुस्तिका शिक्षक, विद्यार्थी, पालक व कार्यकर्ते यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. या पुस्तिकेची व एकंदरच लैंगिक शोषणाच्या विषयासंदर्भातील काही निरीक्षणे.

नक्की काय हे त्यांना कळत नव्हतं, याला लैंगिक शोषण म्हणतात, हे तर मुळीच माहीत नव्हतं. परंतु हा घाणेरड्या, किळसवाण्या, नकोशा स्पर्शाचा 'पाशवी खेळ' होत होता. रोज ही लहान मुलं-मुली सहन करीत होती. मनात भावना दाबून ठेवीत होती... आज कदाचित पहिल्यांदा व्यक्त होत होती. आम्ही दोन तास बोललो. खूप... 'काही घरच्यांना, आई-वडिलांना सांगू शकत नाही. कारण एक तर ते लक्ष देत नाहीत किंवा आम्हीच चुकीच वागतो, असं त्यांना वाटतं. आपल्याकडूनच काही चुकतंय ही भावना तर खूप तीव्र होती.' दोन-तीन मुलींवर बलात्काराचा प्रयत्नही झाला होता, भर दुपारी वस्तीतली मोठी माणसं कामावर असताना. थोडक्यात वाचल्या होत्या आणि हे करणारी मुलं वस्तीबाहेरची होती. चुकीच्या जागी स्पर्श करणं, दाबणं, शरीरावर शरीर घासणं, येता-जाता नको तिथे नेमका स्पर्श करणं, लगट करणं, धमक्या देऊन अंगावर पडून स्वत:ला 'मोकळं' करून घेणं. असे अनेक अनुभव मुलं सांगत होती. मला जे बोलायचं होतं त्याला वाट मोकळी झाली होती. मी त्यांना नकोसा व वाईट स्पर्श व चांगला स्पर्श यांतला फरक समजावला. अर्थात बऱ्याच जणांना अनुभव होता; पण काही मुलं अद्याप या अनुभवातून गेली नव्हती. त्यांच्याशी गप्पा मारल्या. असं घडल्यावर कोणाला सांगावं व सांगू नये याबद्दल बोललो. शेवटी निघताना एकच सांगितलं, 'असं काही घडलं तर ओरडा.' त्यांना ओरडायला, व्यक्त व्हायला शिकवलं. 'कसं ओरडाल?' असं विचारलं तर मुलांनी ओरडून दाखवलं. व्यक्त होणं, सांगणं, हा अनुभव जवळच्या खात्रीच्या माणसाशी शेअर करणं हा पहिला धडा मुलं शिकली. ओरडायला शिकली. हा अनुभव १५ वर्षांपूर्वीचा.

त्यानंतर मधल्या काळात यांसारखे अनेक विषय खाजगीत व कधी कार्यक्रमात हाताळले. कालच सोशल मीडियावरचा एका व्हिडिओ कार्यक्रमात एका उच्चभ्रू घरातल्या मुलीची कैफियत ऐकली. ती सांगत होती, 'माझ्यावर ओळखीच्या म्हाताऱ्या आजोबापासून लग्नात नातेवाईक व वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत सख्ख्या मामाने लैंगिक अत्याचार केले.' ही सारी माणसं आजही रोजरोज तिच्या घरी येतात. मामा तर अश्लील बोलतोही कुणी नसताना... आई आणि बहिणीला सांगितलं तर त्यांनी गप्प बसायला लावलं.

कमला भसीन यांनी अनेक वर्षांपूर्वी 'काश किसने मुझे बताया होता' या पुस्तिकेत स्वतःचे, मैत्रिणींचे अनुभव लिहिलेले. यांचा अनुवाद 'नकोसा स्पर्श नकोच' या पुस्तिकेत आहे. वर दिलेल्या दोन्ही घरांमध्ये वयापैकी वर्षाचे अंतर आहे. पण प्रश्नांची तीव्रता तीच आहे. फरक इतकाच आहे, ती मुलगी कॅमेऱ्यासमोर धाडधाड बोलते पण मध्येच रडतेही, मध्येच अस्वस्थ होते, नंतर म्हणते की, 'आपण दुसऱ्या विषयावर बोलू या का?'

या पुस्तिकेत कथनरूपाने मुलींवर कोण, कोठे, कुठच्या स्वरूपांचे लैंगिक शोषण करतात, यांचे अनुभव आहेत. आता या काळात मुलांच्या बाबतीही असं घडतं.

कमला भसीन यांनी नमूद केलं की लैंगिक शोषण करणारे कुंटुबातील जवळची माणसं, नातेवाईक, भाऊ, समारंभात-कार्यक्रमात जमणारे सगेसोयरे, शाळेमध्ये शिक्षक, विकृत खाजगी शिकवण्या घेणारे, वाहन चालक, शाळेच्या दारावर असणारे वॉचमन, शेजारील वृद्ध माणसं, घरी येणारे बहीण-भावांच्या मित्रमैत्रिणी, दूरचे नातेवाईक,



काही वेळी घरातले सख्खे नातेवाईक ही सगळीच माणसं- याबद्दल लिहिलं आहे. ही माणसं रोजच्या रोज सहवासात येणारी आहेत. कुटुंबातील सदस्यांना वाटतं की, ही माणसं 'सुरक्षित व विश्वासार्ह' आहेत. आणि नेमकी हीच माणसं लहान मुलामुलींच्या अशक्त वयाचा फायदा घेऊन लैंगिक शोषण करताना दिसतात. याबाबत मुलं ना आरडाआरोडा करू शकत ना कोणाला काही सांगू शकत. या लैंगिक शोषणाच्या घटनांचे संपूर्ण वर्णन कमला भसीन यांनी या पुस्तिकेत केले आहे. या वयोगटातील बहुतांश सर्वच मुलामुलींना या प्रकारच्या अनुभवांना कधी न कधी सामोरे जावे लागतेच, अगदी अतिसुरक्षित वाटणाऱ्या कुटुंबातही. केवळ या प्रकारांची वाच्यता होत नाही, यावर बोललं जात नाही म्हणून हे समोर येत नाही. परंतु या प्रकारच्या लैंगिक शोषणाचे दूरगामी परिणाम मुलांच्या भावी आयुष्यावर वैवाहिक आयुष्य तसेच, स्त्री-पुरुष नातेसंबंधावर कायमस्वरूपी होतात. याचे मूळ लहान वयातील शोषणात असू शकते, याचा विचारही कोणी करू शकत नाहीत.

मुलं या विषयाबाबत बोलत नाहीत, याला अनेक कारणे आहेत. एक तर जेव्हा धैर्य करून हे सांगण्याचा प्रयत्न मुलं करतात, तेव्हा ती लहान आहेत म्हणून त्यांच्याकडे पालक किंवा मोठी माणसं दुर्लक्ष करतात. तर कधी ही माणसं जवळच्या नात्यातली असल्यामुळे याबाबत जाणीवपूर्वक गुप्तता पाळली जाते. अनेकदा मुलांना आपल्याबरोबर काय होतंय हे समजत नाही, त्यामुळे ती भांबावतात, गोंधळतात व या गोष्टी सहन करीत राहतात. खूपदा मुलांना असंही वाटतं की आपल्याशी जे होतं त्याबद्दल आपण बोललो तर आपल्याला दोषी ठरवलं जाईल. म्हणून व भीतीपोटी या गोष्टी मुलं बोलत नाहीत. यामध्ये सगळ्यात धोक्याची व चिंतेची ही बाब आहे की, शोषण करणारी माणसं जवळची आप्तस्वकीय व पुन:पुन्हा संपर्कात येणारी असतात व या गोष्टी जाहीर होत नाहीत. म्हणून सातत्याने ही दुष्कृत्यं करण्यास त्यांना संपूर्ण मोकळीक व वाव मिळत राहतो. मुलं यापासून दूर जाण्याचा व वळण्याचा प्रयत्न करतात; परंतु ती तसं का करतात हे समजावून न घेतल्याने मुलांची कुचंबणा होते व ती रोज नव्याने वाढत जाते.

खरं तर या विषयावर सातत्याने उघडपणे बोललं गेलं पाहिजे, चर्चा झाली पाहिजे. काही व्यवहार्य बाबींकडे पालकांनी, शिक्षकांनी बारकाईने लक्ष दिले पाहिजे. आपलं मूल एखाद्या व्यक्तीला, शिक्षकाला, नातेवाइकाला घाबरतंय का? काही विशिष्ट लोकाच्या जवळ जायला तयार नाही, शाळेत जायला अकारण नकार देतंय काय? मुलं अचानक गप्प, शांत, अबोल, चिडचिडे होतात का? अशा प्रकारच्या मुलांच्या वर्तवणुकीवर थोडं लक्ष ठेवलं तर त्याच्या मुळाशी जाता येऊ शकतं, अनेक अनर्थ यामुळे टळू शकतात. मुलं शरीराने-मनाने सक्षम, स्वावलंबी व स्वसंरक्षण करण्यास तयार होईपर्यंत ही काळजी घेणं गरजेचं आहे. मुलांना या गोष्टी व्यवस्थित समजवता याव्यात, त्यांना मोकळपणाने याबाबत बोलता यावं, आधार वाटावा, संरक्षण मिळावं; यासाठी काही उपायांबाबत पुस्तिकेत चर्चा केलेली आहे. उदा., मुलांना स्वत:च्या शरीराची ओळख करून देणे, खाजगी भागांची ओळख करून देणे, चांगले व वाईट स्पर्श यांचे ज्ञान देणे, आपल्या घरी येणाऱ्या परिसरातल्या तसेच, शाळेतील व्यक्तींची माहिती ठेवणं, त्यांच्या संपर्कात राहणं, मुलांबरोबर याविषयी विचारणा करणं अशा अनेक स्तरांवर हे उपाय करता येऊ शकतील.

'नकोसा स्पर्श नकोच' ही पुस्तिका अधिकाधिक मुले, पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्यापर्यंत पोहोचवता आली तर याचे गटागटात वाचन, चर्चा, खाजगी स्वरूपांची प्रश्नोत्तरे, पालकांचे प्रबोधन या पद्धतीने मार्ग शोधता येतील. पुस्तिकेची किंमत अल्प असून यामध्ये अनेक चित्रे आहेत. त्यामुळे मुलांना ही पुस्तिका आपलीशी वाटेल असा आमचा विश्वास आहे.

चला तर, साखळी पद्धतीने या कामाला लागू या व पुन्हा आव्हानात्मक काळात आपल्या तरुण पिढीला आतापासूनच सक्षम, स्वावलंबी व स्वरसंरक्षणासाठी मानसिक व शारिरिकरीत्या तयार करण्यासाठी मोट बांधू या.

**नीलिमा जाधव-बंडेलु**, अहमदनगर
neelima.bandellu@gmail.com
Mob. 8605807377

**'नकोसा' स्पर्श नकोच**
मूळ लेखिका : कमला भसीन,
अनुवाद : सारिका उबाळे
मुक्ता प्रकाशन, यशोदानगर चौक, अमरावती
Mob. 94221 70623
मूल्य : ५०/- रु.

kartavyasadhana.in

# रि पो र्ता ज

१ ते १५ मे २०२२ या काळात
**'कर्तव्य साधना'वर**
प्रसिद्ध होणार



उत्तर कर्नाटकातील

# सिद्दी समाज

सातशे वर्षांपूर्वी आफ्रिकेतून गुलाम म्हणून आणलेले हबशी किंवा सिद्दी समाजातील लोक भारताच्या पूर्व व पश्चिम समुद्र किनाऱ्यावरील काही ठिकाणी उतरवले गेले.
त्यातील काही लोक महाराष्ट्र-गोवा-कर्नाटक या राज्यांच्या सीमावर्ती भागांत स्थायिक झाले.
त्यांचा इतिहास, त्यांचे वर्तमान आणि त्यांची स्थिती-गती यांचा अभ्यास करण्याची इच्छा प्रवीण खुंटे, प्रवीण राठोड, ज्योती भालेराव, सूरज निर्मळे, चंदनसिंग या पाच तरुणांनी व्यक्त केली. त्यासाठी साधना ट्रस्टने त्यांना फेलोशिप दिली. मग त्यांनी अभ्यास केला आणि प्रत्यक्ष त्या भागात दोन वेळा भेट देऊन तिथल्या लोकांशी संवाद साधला.
त्यातून आकाराला आलेले लेख आणि ऑडिओ-व्हिडिओ असा हा दीर्घ रिपोर्ताज सादर करीत आहोत,
१ ते १५ मे २०२२ या काळात
kartavyasadhana.in वर

अधिक माहितीसाठी संपर्क
**'कर्तव्य साधना' डिजिटल पोर्टल**
४३१, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph 02024451725 ■ Mob. 7058286750 ■ kartavyasadhana@gmail.com


Date of Publication : 2-5-2022


Ring in the
Festive Spirit!
PREMIUM BREAD
WHOLE WHEAT BREAD
PIZZA BASE
monginis
Let's Celebrate!
Gateaux, Pastries, Savouries, Chocolates,
Cookies and lots more
monginisgoa
monginis.goa

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting: 2-5-2022/ Date of Publication : 2-5-2022

